सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ०८ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २८५ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तिबेटमध्ये ७.१ तिव्रतेचा भूकंप, ५४ जणांचा मृत्यू
## नेपाळ आणि भारतात देखील बसले भूकंपाचे हादरे

नवी दिल्ली, ०७ जानेवारी : तिबेटमध्ये आज, मंगळवारी सकाळी ९.०५ वाजता भूकंपाचे जोरदार हादरे बसले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ७.१ इतकी मोजली गेली. यात आतापर्यंत ५४ जणांचा मृत्यू झाला असून शेकडो लोक जखमी झाले आहेत. यासोबतच नेपाळ आणि भारतातही या भूकंपाचे हादरे बसले आहेत.

यासंदर्भात चीनच्या अर्थक्केक नेटवर्क सेंटरने (सीईएनसी) दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी ९:०५ वाजता झालेल्या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ७.१ इतकी मोजली गेली. तिबेटच्या शिजांग शहरातील डिंगरी काउंटीमध्ये ७.१ तीव्रतेच्या भूकंपात ५४ जणांचा मृत्यू झाला असून ६२ हून अधिक जण जखमी झाल्याचं सांगण्यात येत आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू २८.५ अंश उत्तर अक्षांश आणि ८७.४५ अंश पूर्व रेखांशावर १० किलोमीटर खोलीवर होता. तत्पूर्वी, नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने



सांगितले की, मंगळवारी सकाळी ६ वाजेपासून तिबेटच्या शिजांगमध्ये भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. येथे सकाळी ६.३० वाजता १० किमी खोलीवर ७.१ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. त्यानंतर ७ वाजून २ मिनीटांनी ४.७ रिश्टर स्केलचा भूकंप आला. तर ७.०७ वाजता ४.९ रिश्टर स्केल आणि ७ वाजून १३ मिनीटांनी ५ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. त्यामुळे लोकांनी घाबरून आपली घरे सोडून मोकळ्या जागेकडे धाव घेतली. यासोबतच नेपळमध्येही सकाळी ६ वाजेपासून भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. भारतातील अनेक राज्यांमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. याचा सर्वाधिक फटका बिहारला देखील बसला. यासोबतच आसाम, सिक्कीम आणि पश्चिम बंगालच्या काही भागातही भूकंपाचे धक्के जाणवले. यावेळी घाबरलेले लोक घराबाहेर पडले. यूएसजीएस भूकंपशास्त्रानुसार, भूकंपाचे केंद्र लोबुचेच्या ९३ किमी ईशान्येकडे होते.

पृथ्वीच्या आत ७ प्लेट्स आहेत, ज्या सतत फिरत असतात. ज्या भागात या प्लेट्स आदळतात त्याला फॉल्ट लाइन म्हणतात. प्लेट्सचे कोपरे वारंवार टक्कर झाल्यामुळे वाकतात. जेव्हा जास्त दाब तयार होतो, तेव्हा प्लेट्स तुटू लागतात. खालील उर्जा बाहेर पडण्याचा मार्ग शोधते आणि गडबड झाल्यानंतर भूकंप होतो.

## सलमानच्या सुरक्षेत वाढ! घराला बुलेटप्रूफ काच तर भिंतीवर काटेरी तार

मुंबई : राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणात मोठा खुलासा झाल्यानंतर लॉरेन्स बिश्नोई गँगकडून सलमान खानला जीवेमारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. त्यामुळे सलमान खानच्या सुरक्षेबाबत सातत्याने पावले उचलली जात आहेत. अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यानंतर आता सलमान खानच्या गॅलेक्सी अपाट्रमेंटच्या बाल्कनीमध्ये बुलेट प्रूफ काच लावण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सलमान खान आणि त्याच्या कुटुंबाच्या सुरक्षेला लक्षात घेता सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. सलमान खानच्या घराला बुलेट प्रूफ काच लावण्यात आली आहे. तसेच गॅलेक्सी अपार्टमेंटच्या सीमा भिंतीवर काटेरी तारही टाकण्यात येत आहे. ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरेही लावण्यात आले आहेत. एवढंच नाही तर अत्याधुनिक सुरक्षा उपकरणंही याठिकाणी तैनात करण्यात आली आहेत.

## राज्यात राबविले जाणार 'ई - कॅबीनेट'

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ७ जानेवारी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्या कारभारात जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शकता आणि गतीमानता आणण्यावर भर दिला असून त्याचाच एक भाग म्हणून ई-कॅबीनेटचा निर्णय घेतला आहे. एनआयसीने विकसित केलेल्या ई-कॅबिनेट ह्या प्रणालीचे सादरीकरण आज मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी मंत्रिमंडळ बैठकीत केले.

मंत्रिमंडळ बैठकीसाठी कागदांचा मोठ्या प्रमाणावर होणारा वापर कमी करण्यासाठी हे संपूर्ण आयसीटी सोल्यूशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रणालीमुळे मा. मंत्र्यांसाठी अत्यंत सुलभ डॅशबोर्ड उपलब्ध होईल. त्याचबरोबर आवश्यक संदर्भ शोधणे, कृती बिंदू (ॲक्शन पॉइंट) पाहणे आणि घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत पुनरावलोकन करणे सोपे होईल. ई-कॅबिनेटमुळे मंत्रिमंडळ बैठकांचे, निर्णयांचे व त्यासंबंधीच्या दस्तऐवजांचे जतन होईल. मंत्रिमंडळ निर्णय आणि त्यासंबंधीचे संदर्भ शोधणे सहज शक्य होईल.आतापर्यंत होत आलेल्या पारंपरिक मंत्रिमंडळ बैठकांमध्ये येणाऱ्या विविध अडचणींवर या प्रणालीमुळे मात करता येईल. मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणारा प्रस्ताव ऑनलाईन अपलोड करणे, तो मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी आणि निर्णयासाठी सादर करणे, त्यावर अंतिम निर्णय व त्याबाबतच्या सर्व नोंदी ठेवणे ह्या सर्व प्रक्रिया सहजरित्या पार पडणार आहेत. हा सुशासनाच्या पूर्ततेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रणालीमुळे मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी कागदपत्रांच्या वितरणासाठी शेवटच्या क्षणी होणारी धावपळ टळून या प्रक्रियेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा तसेच मंत्रिमंडळाचा मोठा वेळ वाचणार आहे.

# दिल्ली विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेऊन हा कार्यक्रम जाहीर केला. दिल्लीत विधानसभेच्या ७० जागा आहे. या सर्व जागांसाठी एका टप्प्यात मतदान होणार आहे. निवडणूक आयोगाच्या नियोजनानुसार दिल्लीत बुधवार ५ फेब्रुवारी २०२५ रोजी विधानसभेच्या ७० जागांसाठी एका टप्प्यात मतदान होणार आहे. मतमोजणी शनिवार ८ फेब्रुवारी २०२५ रोजी आहे.

याआधी दिल्ली विधानसभेच्या २०२० च्या निवडणुकीसाठी ८ फेब्रुवारी २०२० रोजी मतदान झाले आणि मतमोजणी ११ फेब्रुवारी २०२० रोजी पार पडली. या निवडणुकीत आम आदमी पार्टीने ६२ आणि भारतीय जनता पार्टीने आठ जागा जिंकल्या.

**निवडणुकीचा कार्यक्रम**

**अधिसूचना : शुक्रवार १० जानेवारी २०२५**
**उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस : शुक्रवार १७ जानेवारी २०२५**
**उमेदवारी अर्जांची छाननी : शनिवार १८ जानेवारी २०२५**
**उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस : सोमवार २० जानेवारी २०२५**
**मतदान : बुधवार ५ फेब्रुवारी २०२५**
**मतमोजणी : शनिवार ८ फेब्रुवारी २०२५**
**निवडणूक प्रक्रिया 'या' तारखेपर्यंत पूर्ण करणार : सोमवार १० फेब्रुवारी २०२५.**

बहुमताच्या जोरावर आम आदमी पार्टीने सरकार स्थापन केले. या सरकारचे मुख्यमंत्री म्हणून आधी अरविंद केजरीवाल यांनी शपथ घेतली होती. पण भ्रष्टाचाराच्या प्रकरणात तुरुंगात जावे लागल्यामुळे नंतर केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. यानंतर आम आदमी पार्टीच्याच आतिशी मार्लेना सिंग या दिल्लीच्या मुख्यमंत्री झाल्या. आतिशी यांनी २१ सप्टेंबर २०२४ पासून मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. दिल्लीत विकासकामं, भ्रष्टाचार आणि सत्ताधाऱ्यांनी दिलेली पण पूर्ण न केलेली आश्वासने हे निवडणुकीतले प्रमुख मुद्दे आहेत. यंदाच्या निवडणुकीत आम आदमी पार्टी, काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी अशी तिहेरी लढत होणार असल्याचे चित्र आहे.

## सर्व वाहनांसाठी फास्टॅग अनिवार्य

मुंबई : महाराष्ट्रातील चार चाकी वाहन धारकांना एक एप्रिल २०२५ पासून फास्टॅग अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेतल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. राज्यात १ एप्रिल २०२५ पासून फास्टॅग बाबतच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयाची अंमलबजावणी होईल. या निर्णयामुळे वाहतूक कोंडी टळून इंधनाची आणि वेळेची देखील बचत होणार आहे. फास्टॅग कार्यरत नसेल तर वाहन धारकाला पथकर शुल्काच्या दुप्पट शुल्क भरावे लागेल. त्याचप्रमाणे रोख रक्कम स्मार्ट कार्ड, क्रेडिट वा डेबिट कार्ड किंवा क्यू आर कोड किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे पथकर शुल्क भरायचे असेल तरी देखील दुप्पट पथकर शुल्क भरावे लागेल. एमएसआरडीसीच्या अखत्यारीत ५० टोलनाके असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यात २३ टोल नाके आहेत.

## बलात्कार प्रकरणातील दोषी आसाराम बापूला अंतरिम जामीन मंजूर, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

नवी दिल्ली : एका महिला अनुयायीवर बलात्काराच्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूला सर्वोच्च न्यायालयाने प्रकृतीच्या कारणास्तव ३१ मार्चपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला आहे. मात्र, या कालावधीत त्यांना अनुयायांशी संपर्क साधण्यास मनाई करण्यात आली आहे. सध्या त्यांच्यावर जोधपूरच्या आरोग्य मेडिकल सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत.



आसाराम बापू हृदयाशी संबंधित आजारांनी ग्रस्त असून यापूर्वी त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. अंतरिम जामीन मंजूर करताना सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या सुरक्षेसाठी विशेष व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. याआधी, १८ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने त्यांना १८ दिवसांचा पॅरोल मंजूर केला होता. १ जानेवारीला कारागृहात परतल्यानंतर पुन्हा एकदा त्यांना जामीन देण्यात आला आहे. याआधीही, २०२३ मध्ये राजस्थान उच्च न्यायालयाने त्यांना वैद्यकीय उपचारांसाठी सात दिवसांचा पॅरोल मंजूर केला होता.

फेब्रुवारी २०२३ मध्ये गांधीनगर सत्र न्यायालयाने आसाराम बापूला एका बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

## इक्बाल मिर्चीचा गिरगावातील कोट्यावधीचा भूखंड ईडीकडून जप्त

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई , दि.७ जानेवारी : कुख्यात गुंड दाऊद इब्राहिमचा हस्तक इक्बाल मिर्चीची मुंबईतील गिरगाव येथील सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) गिरगावातील एक भूखंड जप्त केला आहे. त्याची किंमत कोट्यवधीच्या घरात असल्याचे सांगण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, काही वर्षांपूर्वी मृत्यू पावलेल्या इक्बाल मिर्चीच्या काही साथीदारांनी सिंगल स्क्रीन सिनेमा हॉलची नासधूस केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. ईडीने गिरगावातील न्यू रोशन टॉकीजचा भूखंड ताब्यात घेतला. सीआरपीएफच्या जवानांच्या बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली.

जप्त केलेल्या मालमत्तांमध्ये मुंबईतील पट्टे बापूराव मार्गावरील दिल्ली दरबार हॉटेलच्या समोरचा प्लॉट नंबर ९९८ चा समावेश आहे. ही मालमत्ता मुंबईच्या खेतवाडी परिसरात आहे. ईडीच्या कारवाईपासून वाचण्यासाठी ही मालमत्ता तिसऱ्याला विकण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. इकबाल मिर्ची आणि इतर आरोपींविरुद्ध आयपीसी, आर्म्स क्ट, एनडीपीएस क्ट यांसह अनेक कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले होते. याच आधारे पीएमएलए अंतर्गत चौकशी सुरू करण्यात आली होती.

मिर्ची कुटुंबाशी संबंधित एका व्यक्तीने तपास एजन्सीला सांगितले की, सिनेमा हॉल त्याच्या मालकीचा आहे. त्याने मुंबई महानगरपालिकेची परवानगी घेतल्यानंतर ही इमारत पाडली होती. मात्र ईडीच्या अधिकाऱ्यांनी त्याचा दावा फेटाळून लावला आणि त्याच्याविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल करण्याआधी तपशीलांचा आढावा घेतला आहे.

२०१९ मध्ये ईडीने मिर्ची आणि त्याच्या सहकाऱ्यांविरुद्ध मनी लॉंड्रिंगचा तपास सुरू केला होता. यावेळी न्यू रोशन टॉकीजसह अनेक मालमत्ता जप्त केल्या होत्या. त्यानंतर ईडीला या मालमत्तेचा ताबा घ्यायचा होता, परंतु मिर्चीच्या नातेवाईकांनी अपीलीय न्यायाधिकरणाकडून त्यावर स्थगिती मिळवली. त्यानंतर हा मुद्दा प्रलंबित ठेवण्यात आला. आता गेल्या महिन्यात इक्बाल मिर्ची याच्या साथीदारांनी एका सिंगल स्क्रीन सिनेमा हॉलची नासधूस केली होती. तसेच मिर्चीच्या कुटुंबाकडून ही मालमत्ता तिसऱ्या व्यक्तीला विकण्याचे प्रयत्न सुरु होती. यानंतर आता तपास यंत्रणेने यावर स्थगिती आणत ती रिकामी करण्यासाठी न्यायाधिकरणाशी संपर्क साधला आणि त्यानंतर भूखंडाचा ताबा घेतला.

## काय आहे BHARATPOL PORTAL? कसे काम करणार भारतपोल पोर्टल ?

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सीबीआयच्या भारतपोल या पोर्टलचे लॉंचिंग केले. इंटरपोलच्या धर्तीवर केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अखत्यारित सीबीआय भारतपोल हे पोर्टल हाताळणार आहे. भारतातील सर्व राज्यांची पोलीस यंत्रणा या पोर्टलच्या माध्यमातून थेट सीबीआय आणि देशातील इतर राज्यांच्या पोलिसांच्या यंत्रणेच्या संपर्कात राहणार आहे. एखाद्या 'वाँटेड' आरोपीची माहिती आणि फोटो पोलीस भारतपोल या पोर्टलवर अपलोड करतील. ही माहिती बघून कोणत्याही राज्याचे पोलीस संबंधित आरोपी आपल्या राज्यात आहे की नाही याची पडताळणी करून योग्य ती कारवाई करू शकतील. तसेच पोर्टलवर अपलोड केलेल्या माहितीद्वारे राज्यांचे पोलीस ऑनलाईन पद्धतीने इंटरपोलचीही मदत घेऊ शकतील. या प्रक्रियेत सीबीआय आणि केंद्रीय गृहमंत्रालय यांना पोलिसांनी इंटरपोलकडून कोणती मदत मागितली आहे आणि त्याला इंटरपोलकडून मिळालेला प्रतिसाद याबाबतची ताजी माहिती भारतपोल या पोर्टलवर मिळेल. भारतपोल या पोर्टलमुळे फरार आरोपींना शोधून पकडण्यासाठी मोलाची मदत मिळणार आहे. तसेच भारतपोल या पोर्टलमुळे सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, संघटीत गुन्हे, मानवी तस्करी यांना आळा घालण्यास मदत होईल. राज्यातून अथवा देशातून फरार झालेल्यांना शोधून पकडण्याची कारवाई सोपी होण्यास मदत होईल. सीबीआयच्या भारतपोल या पोर्टलद्वारे केंद्रीय गृहमंत्रालय तसेच सीबीआय, एनआयए, ईडी आदी गुन्हे अन्वेषण करणाऱ्या सर्व केंद्रीय तपास यंत्रणा तसेच राज्यांच्या पोलीस यंत्रणा यांना एकमेकांच्या संपर्कात राहणे आणि आवश्यकतेनुसार इंटरपोलची मदत घेणे सोपे होणार आहे.

इंटरपोल म्हणजे इंटरनॅशनल क्रिमिनल पोलीस ऑर्गनायझेशन किंवा इंटरनॅशनल पोलीस. ही संस्था सदस्य देशांच्या सर्व सुरक्षा संस्थांना गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मदत करते. यासाठी आवश्यक तो समन्वय इंटरपोल साधते. इंटरपोलची स्थापना १९२३ मध्ये झाली आणि भारत १९४९ पासून या संघटनेचा सदस्य आहे. सध्या १९६ देश इंटरपोलचे सदस्य आहेत.



**हिंगोलीचे भाजपाचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांची सदिच्छा भेट घेतली व 'तरुण भारत'च्या वतीने तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, मुंबई प्रतिनीधी जमीर शेख यांनी शुभेच्छा दिल्या.**

## गायीला राष्ट्रमातेच्या दर्जासाठी महाकुंभमेळ्यात होणार 'महायज्ञ'

प्रयागराज : उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे १३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या महाकुंभ मेळ्यात गायीला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा म्हणून महायज्ञ होणार आहे. जगद्गुरू शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्याकडून या महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रयागराज येथे १३जानेवारी ते २६ फेब्रुवारी कालावधीत महाकुंभमेळा होणार आहे. यादरम्यान गायीला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा यासाठी महायज्ञाचे आयोजन करण्यात येणार आहे. जगद्गुरू शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्या शिबिरात आयोजित करण्यात आलेल्या या मंडपात ३२४ 'कुंडे' आणि ९ 'शिखर' आहेत. हा यज्ञ दररोज ९ तास याप्रमाणे महिनाभर चालणार आहे. या महायज्ञात ११०० पुरोहित सहभागी होणार आहेत. महाकुंभमेळा दर १२ वर्षांनी येत असतो. जानेवारी २०२५ मध्ये कुंभमेळा आला आहे. त्यापूर्वी २०१३ मध्ये कुंभमेळा पार पडला होता. प्रयागराज शहरात महाकुंभमेळा २०२५ ची तयारी पूर्ण क्षमतेने सुरू आहे.

## एचएमपीव्ही विषाणू संदर्भात घाबरण्याचे कारण नाही; काळजी घ्यावी : हसन मुश्रीफ

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.७ जानेवारी : जगातील अनेक देशांमध्ये हयुमन मेटा न्युमोनिया व्हायरस ( एचएमपीव्ही ) विषाणूचा प्रभाव दिसून येत आहे. आपल्या देशात आज पर्यंत एकून पाच रुग्ण कर्नाटक, तामिळनाडू व गुजरात या राज्यात आढळून आले. त्या पैकी एक रुग्ण पुर्णपणे बरा होवून घरी गेलेला आहे. उर्वरित रुग्ण बरे होत आहेत. हा आजार गंभीर नसून लहान मुलं, वृद्ध आणि इतर गंभीर आजर असणाऱ्यांनी काळजी घ्यावी ,असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

मंत्रालयीन दालनात एचएमपीव्ही विषाणू संदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव दिनेश वाघमारे, आयुक्त राजीव निवतकर, संचालक डॉ अजय चंदनवाले, आयुष विभागाचे संचालक डॉ रमन घुंगराळकर याबरोबरच राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयचे अधिष्ठाता दुरदृष्य प्रणालीव्दारे उपस्थित होते.

मंत्री मुश्रीफ म्हणाले, राज्यात सद्यस्थितीत एकही एचएमपीव्हीचा रुग्ण आढळला नाही. सर्व अधिष्ठातांनी संभाव्य प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी औषधांसह ऑक्सिजन व आवश्यकता वाटल्यास विलगीकरण या साठी तयारीत रहावे. अतिरिक्त व मुबलक औषधीसाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे संपर्क करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. हा रोग राज्यात पसरु नये यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करावे व अधिष्ठातांनी सतर्क राहून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द कराव्या अशा सूचनाही मंत्री मुश्रीफ यांनी दिल्या.

या रोगासंबंधी मोठया प्रमाणावर जनजागृती करून नागरिकांना मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. प्रतिबंधात्मक उपाय व सतर्कतेचा एक भाग म्हणून नागरिकांना खोकताना किंवा शिंकताना तोंड व नाक रुमालाने नाक व तोंड झाकण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. साबण आणि पाण्याने किंवा सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुणे, ताप व खोकला आणि शिंका अथवा सर्दी पडश्या सारखे लक्षणे असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन रुग्णांनी सार्वजनिक ठिकाणांपासून दूर रहावे व वैद्यकीय सल्यानुसार औषधी, भरपूर पाणी पिणे आणि पौष्टिक आहाराचे सेवन केल्यामुळे या रोगाचा प्रसार कमी होण्यास मदत होईल. वैद्यकीय शिक्षण विभागाने विशेष करून संशयित रुग्णांपासून दूर राहून सदर रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होईल.



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कै. पंढरीनाथ पाटील भाऊ पुण्यतिथीनिमित्त श्रीनाथ हायस्कूल येथे तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धा

तभा वृत्तसेवा पैठण दि ०७ : सहकार तसेच शिक्षण महर्षी कै. पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ ढाकेफळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्रीनाथ हायस्कूल, पैठण येथे तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. आधुनिक महाराष्ट्राचा शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय ऱ्हास होत आहे/ नाही या विषयावर विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण विचारांनी आणि प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाची सुरुवात कै. पंढरीनाथ पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण आणि दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष तुषार भाऊ शिसोदे आणि तहसीलदार सारंग चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती. श्रीनाथ हायस्कूलचे प्राचार्य शिवाजी पठाडे यांनी अध्यक्षस्थान भूषवले. तसेच व्यासपीठावर इतर मान्यवर खराद सर (मुख्याध्यापक, श्रीनाथ प्राथमिक विद्यालय), सुनील चितळे (मिडल विभाग पर्यवेक्षक), जगताप सर (श्रीनाथ ज्युनियर कॉलेज पर्यवेक्षक),पवन खराद सचिव श्रीमती काळे मॅडम (हायस्कूल विभाग पर्यवेक्षिका), प्रा संतोष गव्हाणे, गोर्डे सर यांची यावेळी उपस्थिती होती

वादविवाद स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा सहभाग व विजेते याप्रमाणे

वादविवाद स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून शिक्षण, समाज




आणि राजकारणातील स्थितीचे अचूक विश्लेषण सादर केले.

**प्रथम** – कु. दहिभाते गौरी पुरुषोत्तम (आर्य चाणक्य विद्या मंदिर, पैठण)

**द्वितीय क्रमांक:** चि. राजगुरू सिद्धांत कृष्णा (चांगदेव विद्यालय, चांगतपुरी) कु. कबाडी सोनल भाऊसाहेब (श्रीनाथ हायस्कूल, पैठण)

**तृतीय** – कु. शेख आयेशा सलीम (श्रीनाथ हायस्कूल, पैठण)

**उत्तेजनार्थ पारितोषिक** – कु. गरड अंकिता शिवाजी (श्रीनाथ हायस्कूल, पैठण)

**सांघिक व विशेष बक्षिसे :** श्रीनाथ हायस्कूल, पैठण कु. सोनल कबाडी व कु. अंकिता गरड यांना विशेष सन्मान प्रदान करण्यात आला.

स्पर्धेच्या परीक्षक म्हणून अ‍ॅड. संदीप जाधव (सत्र न्यायालय, पैठण), श्रीमती उज्वला कुटे (आर्य चाणक्य विद्यामंदिर, पैठण), बजरंग काळे (माजी मुख्याध्यापक, कन्या प्रशाला, पैठण), आणि आशुतोष पानगे स(आर्य चाणक्य विद्यामंदिर, पैठण) यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे परीक्षण करून निकाल जाहीर केले.

हा कार्यक्रम केवळ वादविवाद स्पर्धा न राहता, विद्यार्थ्यांमध्ये विचारमंथन, तर्कसंगत चर्चा, आणि सामाजिक जाणीव जागृत करण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरला.

कै. पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ ढाकेफळकर यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा दृढ निश्चय यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीनाथ हायस्कूलच्या मिडल, एमसीव्हीसी, आर्ट, सायन्स आणि माध्यमिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व विशेष सहकार एनसीसी विभागप्रमुख श्री. कानडे सर व एनसीसी कॅडेट विद्यार्थ्यांनी अतिशय परिश्रम घेतले. विजेत्यांना कै. पंढरीनाथ पाटील स्मृती पुरस्कार, प्रमाणपत्रे आणि आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

## मार्शल आर्ट्स प्रशिक्षक पवन घुगे यांना पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ७ जानेवारी दि २ जानेवारी रोजी मार्शल आर्ट्स प्रशिक्षक पवन घुगे यांना पोलीस आयुक्त मा. प्रवीण पवार व पोलीस उपायुक्त मा. नांदेडकर यांच्या हस्ते मार्शल आर्टस उत्कृष्ट प्रशिक्षक प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले . छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तलय परेड ग्राउंड येथे हा कार्यक्रम पार पडला , दि २१ डिसेंबर २०२४ ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये जालना जिल्हा येथे तायक्वांदो , वूशू, बॉक्सिंग,आयोजित झालेल्या पोलीस परीक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर पोलीस खेळाडूंनी विजय प्राप्त करत प्रथम स्थान मिळवले मार्शल आर्टस प्रशिक्षक पवन घुगे यांनी खेळाडूंना प्रशिक्षण दिले व मार्गदर्शन केले. या विजयाबद्दल मा. पोलीस आयुक्त प्रवीण पवार , उपायुक्त नांदेडकर . प्रल्हाद राठोड, आसिफ शेख, व पोलीस खेळाडू यांच्या उपस्थितीमध्ये उत्कृष्ट मार्शल आर्टस प्रशिक्षक पवन घुगे यांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले , याबद्दल मिशन मार्शल आर्टस संघटनेचे सचिव प्रवीण घुगे, प्रशिक्षिका राधा घुगे, नंदा घुगे, कोमल राठोड, ऋतुजा रनवळकर, गौरव टोकटे राम बुधवंत, श्याम बुधवंत, राम चौरे, सोमया कुमार,तसेच क्रीडाक्षेत्र, मित्र मंडळ शैक्षणिकक्षेत्र सर्व स्तरातून शुभेच्छा देण्यात आल्या.

# पीक बाजारात येताच पडतात दर!

## सोयगाव तालुक्यात रब्बी पिकांच्या क्षेत्रात वाढ; मात्र यंदा शेतमालाला चांगला भाव मिळेल का?



सोयगाव,दि.७ जानेवारी : यावर्षी काही प्रमाणात सिंचनाची सोय असलेल्या शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात गहू,हरभरा,कांदा,मका, भाजीपाला,आदी पिकांची सोयगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात लागवड केली;मात्र पीक बाजारात आले की,भाव पडत असल्याने रब्बी हंगामातील पिकांना चांगला भाव मिळेल काय,अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. सोयगाव परिसरातील गलवाडा,वेताळवाडी, कंकराळा,माळेगाव,जरंडी,निंबायती,बनोटी,येथे खरीप हंगामातील कपाशी,सोयाबीन,तूर,आदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते;मात्र यावर्षी सुरुवातीपासूनच निसर्गाने शेतकऱ्यांना साथ दिली नाही. खरीप हंगामातील पेरणी केल्यानंतर काही दिवसांपासून सततच्या पावसामुळे व नंतर अतिवृष्टीने खरीप हंगामातील कपाशी, सोयाबीन,तूर,आदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.यातून कसेबसे पीक हाती आले,तर बाजारपेठेत विक्रीला नेल्यावर योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले.त्यामुळे खरीप हंगामात झालेल्या पीक नुकसानीची भरपाई रब्बी हंगामातील पिकांतून भरून निघेल,अशी आशा शेतकऱ्यांना आहे. सिंचनाची सोय उपलब्ध असलेले काही शेतकरी रब्बी हंगामातील पिकांमधून आर्थिक आधार शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत.

शेतकऱ्यांच्या अडचणींकडे लक्ष द्या!

निसर्गाचे दरवर्षी येणारे संकट यासह शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतकरी विकासाच्या फक्त बोलबाला व मोठ्या प्रमाणात गाजावाजा आहे,तसेच बाजारपेठेत शेतमालाला पाहिजे तसा भाव मिळत नाही. शासन दरवर्षी हमीभावात काही ना काही वाढ करतेच; मात्र बाजारात भाव कमीच होत असतानाचे चित्र दिसते. यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या असलेल्या अडचणीकडे लक्ष द्यावे, अशी अपेक्षा शेतकरी वर्ग करीत आहेत,तसेच शासनाने जाहीर केलेल्या हमीभावाने शेतकऱ्यांचा माल खरेदी करावा,अशी मागणी आहे.त्यामध्येही अनेक प्रकारच्या समस्या शेतकऱ्यांना समोर उभा राहिला आहेत.कधी अवकाळी पाऊस,तर कधी ढगाळ वातावरण त्यातच पहाटेचे दाट धुके अशा निसर्गाच्या लहरीपणाचा फटका रब्बी हंगामातील पिकांना बसत आहे.यामुळे गहू,हरभरा, कांदा,मका,भाजीपाला,आदी पिकांना पूरक असलेला गारवासुद्धा मिळत नाही व पिकांना पूरक पोषणवाढ पाहिजे,त्या प्रमाणात होत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

# सुवर्णकार समाजाच्या वधू-वर मेळाव्यात जुळल्या रेशीमगाठी – प्रकाश थोरात

## नाशिक येथे जिल्हा अहिर सुवर्णकार समाजाचा समाजाचा २६ वा राज्यस्तरीय वधु वर मेळावा

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.७ जानेवारी:

नाशिक येथे जिल्हा अहिर सुवर्णकार समाज हरिओम सांस्कृतिक संस्थेतर्फे २६ वा राज्यस्तरीय वधू वर पालक परिचय मेळावा बालाजी रिसॉर्ट आणि लॉन्स गंगापूर रोड येथे उत्साहात पार पडला. यावेळी समाजात वाढणारे घटस्फोट तसेच कौटुंबिक कमी होण्याकरिता येणारे पिढी संस्कारी व समाजाच्या आदर्शाचे पालन करणारी घडण्याची गरज असल्याचे संस्थेचे अध्यक्ष प्रकाश थोरात यांनी सांगितले. विशेष म्हणजे या मेळाव्यात काही वधू-वरांच्या लग्नाच्या रेशीमगाठी देखील जुळल्या सुवर्णकार समाजाचा हा मेळावा तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून घेतला आहे. मेळाव्याच्या स्मरणिकेचे मुखपृष्ठ जाई थोरात यांच्या संकल्पनेतून खूप छान झाले.



व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून अनिल बागुल अध्यक्ष प्रकाश थोरात मेळावा प्रमुख शशिकांत अहिरराव वर्षा दंडगव्हाळ किरण दुसाने योगेश दुसानीस मनोज जानोरकर संतोष सोनार चालू आज बोडके प्रसन्न इंदूरकर सुनील बाविस्कर अनिल दुसाने महेश घोडके शाम सोनार वृंदा जाधव पुनम वानखेडे सुवर्णा घोडके उपस्थित होते. यावेळी बोलताना अनिल बागुल म्हणाले आपल्या संस्कृतीत पैशाला नक्कीच महत्त्व आहे परंतु संस्काराची जागा पैसा देऊ शकत नाही याची जाणीव आपल्या युवा पिढीला असायला हवी.

मिळवण्यास महाराष्ट्रासह गुजरात मध्यप्रदेश मधील वधू-वरांनी ही उपस्थिती लावली संस्थेचे अध्यक्ष प्रकाश थोरात यांनी समाजात विवाह होणारा वास्तव खर्च टाळून समाजातील आर्थिक दुर्बल वधू-वरांना मदतीचा हात देण्याचे आवाहन केले सामूहिक व्यवहारातून अनेक नाते संबंध जोडले जातात तसेच आर्थिक फटका ही सहकार लागत नाही यापूर्वी केलेला आव्हान प्रमाणे आर्थिक दुर्बल घटकातील वधूवरांच्या व्यवहाराचा खर्च संस्था उतरणार असल्याचे सांगितले.

यावेळी राजेंद्र आहेर डॉक्टर राजेंद्र दिंडोरकर विजया पवार बबन दुसाने राजेंद्र खालपकर गजू घोडके प्रकाश वडनेरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यानंतर मान्यवरांचे हस्ते वधू वर सूची चे प्रकाशित करण्यात आले मेळाव्यात सुमारे ४०० हून अधिक वधू-वरांनी सहभागी होत आपल्या जोडीदाराची निवड करण्यासाठी शोध घेतला जोडीदाराच्या निवडीसाठी शुभेच्छा देत लग्न समारंभात पैशाची उधळण कमी करण्याचा सल्ला शशिकांत अहिरराव यांनी दिला यावेळी बोलताना ते म्हणाले हरिओम संस्थेत तंत्रज्ञानाचा वापर करून मेळावा कसा चांगला होईल व समाज बांधवांना त्याचा जास्तीत जास्त कसा उपयोग होईल याची काळजी घेतली आहे

मेळाव्यात वधू वरांच्या पालकांनी एकमेकाचा परिचय करून घेतला तसेच वधू-वरांनी जोडीदाराच्या अपेक्षा व्यक्त करत एकमेकांसोबत मनमोकळा संवाद साधला आपल्या जोडीदाराच्या शोधात आलेल्या वधू-वरांच्या चेहऱ्यावर उत्साह दिसत होता या मेळाव्याचा आयोजनासाठी राजेश दुसनिस विनोद खरोटे रवींद्र जाधव अशोक विभाग संतोष विसपुते योगेश विसपुते आदींनी परिश्रम घेतले.

## एपीएल शेतकरी रेशनकार्ड लाभार्थ्यांना कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर तालुक्यात ग्रामीण भागातील थेट हस्तांतरण लाभापासून वंचित असलेल्या एपीएल (शेतकरी) रेशनकार्ड धारकांनी आपले कागदपत्रे पुरवठा विभाग तहसिल कार्यालय छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे दि.१५ पर्यंत जमा करण्याचे आवाहन तहसिलदार रमेश मुंडलोड यांनी केले आहे. तालुक्यातील एपीएल शेतकरी लाभार्थी योजनेतील लाभार्थ्यांना अन्नधान्य ऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरण योजना प्रती व्यक्ती १७० रुपये प्रतीमाह प्रमाणे सुरु करण्यात आली असून त्याअनुषंगाने शासन निर्देशानुसार वेळोवेळी एपीएल शेतकरी योजनेतील लाभार्थ्यांना एपीएल डिबीटी योजनेचा लाभ मिळण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज सादर करण्याबाबत सर्व रास्तभाव दुकानदारांमार्फत सुचित करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील एकूण ५२३४ एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारकांपैकी १४३६ शिधापत्रिकाधारकांना आजपर्यंत थेट लाभ मिळालेला असून, आज ही तालुक्यातील ३७९८ शिधापत्रिकाधारक हे थेट रोख रक्कम हस्तांतरण योजनेपासून वंचित आहेत. एपीएल डिबीटी कामकाज लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी लाभापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांची यादी संबंधित रास्तभाव दुकानदार तसेच ग्राम महसूल अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

## पत्रकार दिनानिमित्त राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार सोयगाव शहरातील कृषीभूषण अरुण सोहनी यांना सन्मानित



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.७ जानेवारी

सोयगाव शहरातील कृषीभूषण शेतकरी अरुण सोहनी यांना नाशिक येथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघातर्फे नाशिक रोटरी क्लब अध्यक्ष ओमप्रकाश रावत,मॉडेल व मिसेस मलेशिया इंटरनॅशनल डॉ.ज्योती केदार-शिंदे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. अरुण सोहनी हे गेल्या पंधरा ते वीस वर्षापासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत तसेच कृषीभूषण शेतकरी माध्यमातून त्यांची सोयगाव शहरात ओळख आहे.याप्रसंगी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.महेंद्र देशपांडे,अध्यक्ष कृतिका देशपांडे-मराठे, आदीं मान्यवर उपस्थित होते.

त्यांना या पुरस्काराबद्दल सोयगाव शहराच्या वतीने विविध पक्षाचे पदाधिकारी,पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते,व्यापारी, शेतकरी बंधू,मित्रपरिवार फुल गुच्छ देऊन त्यांना शुभेच्छा देत आहे.

# सोयगाव न्यायालयात तालुका बार असोसिएशनचे पेन डाउन आंदोलन; न्यायाधीश यांना निवेदन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.७ जानेवारी

जिल्ह्यातील छत्रपती संभाजीनगर येथील अ‍ॅड. सिद्धार्थ बनसोडे व अ‍ॅड. किशोर वैष्णव यांच्या बाबतीत सातारा पोलीस ठाणे छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस निरीक्षक संग्राम ताठे यांनी केलेल्या बेकायदेशीर कृत्याबद्दल तालुका वकील संघ व बार असोसिएशनच्या वतीने निषेध व्यक्त करत पेन डाऊन आंदोलन केले व न्यायाधीश रोहित पाठक यांना तालुका बार असोसिएशनच्या वतीने निवेदन दिले.

दिलेल्या निवेदनात नमूद आहे की,संबंधित प्रकरणात अ‍ॅड. सिद्धार्थ बनसोडे, अ‍ॅड. किशोर वैष्णव यांच्या विरुद्ध डव्हर्स ऑर्डर



देण्यात येऊ नये या मागणीसाठी पेन डाऊन आंदोलन करण्यात आले.निवेदनावर तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. राजेश गिरी, उपाध्यक्ष अ‍ॅड. योगेश जावळे, सचिव अ‍ॅड. सचिन गिरी, अ‍ॅड. प्रकाश चौधरी, अ‍ॅड. धर्मराज सुर्यवंशी, अ‍ॅड. रामदास महाजन, अ‍ॅड. प्रसन्न फासे, अ‍ॅड. स्वप्निल सुरळकर, अ‍ॅड. शुभम आगे, अ‍ॅड. सतिष सुर्यवंशी, अ‍ॅड. अंबादास जाधव, अ‍ॅड. शशी महाजन, अ‍ॅड. पुरुषोत्तम महाजन, अ‍ॅड. देवा जाधव, अ‍ॅड. शरयु धंतुरे, अ‍ॅड. भाग्यश्री गोसावी,आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पत्रकार दिनानिमित्त विजय चौधरी यांचा सत्कार



खुलताबाद : प्रतिनिधी येथील वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार प्राप्त पत्रकार विजय चौधरी यांचा पत्रकार दिनानिमित्त तालुकास्तरीय शेतकरी सल्लागार समितीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. खुलताबाद तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तालुकास्तरीय शेतकरी सल्लागार समितीची बैठक सहा जानेवारी रोजी पार पडली. यावेळी आत्मा चे तालुका व्यवस्थापक प्रदीप पाठक यांनी मागील बैठकीचा इति वृत्तांत वाचून तो सर्वांनुमते संमत करण्यात आला. कृषी क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच पोखरा योजनेत निवड करण्यात आलेल्या गावांचे निवड करण्याबाबत काय निकष आहेत, त्याबाबत सर्व सदस्यांना माहिती देण्यात यावी अशी मागणी प्रकाश वाकळे यांनी बैठकीत केली. यावेळी तालुक्यातील शेतकऱ्यांनी अभ्यास दौऱ्याद्वारे दुग्धविकास दुग्ध व्यवसाय सुरू करून यशस्वी वाटचाल सुरू केली आहे, त्याबद्दल तालुक्यातील शेतकऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी कृष्णा पांडव, संतोष जोशी, राजेश इंगळे, प्रकाश वाकळे, ज्ञानेश्वर नलावडे,दत्तू धोत्रे, पुंजाराम धोत्रे . अतिक पटेल, वाजेद पटेल, राजेंद्र जाधव, सुरेश जाधव, रामेश्वर जाधव, राजू आवारे, अविनाश वेताळ, आतिश देवगिरीकर, किसन महेर, आर के गायकवाड उपस्थित होते. पल्लवी गायकवाड यांनी आभार मानले.

# दर्पण पत्रकार दिनानिमित्त पीएमश्री जि प के प्रा शा केऱ्हाळा येथील विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप

## तर येथील आदर्श मुख्याध्यापक रामचंद्र मोरे यांनी केला पत्रकार दिनी उपस्थित पत्रकारांचा सन्मान

सिल्लोड प्रतिनिधी

दिनांक ०६/०१/२०२५ रोजी पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा के-हाळा तालुका सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथील शाळेत बाळकृष्ण जांभेकर यांच्या जयंतीची औचित्य साधून अखिल भारतीय ग्राहक पंचायत व तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पण पत्रकार दिनी विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.

सर्वप्रथम राजमाता जिजाऊ, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले व दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या उपस्थितीत पूजन करून पुष्पमाला अर्पण करण्यात आली

या कार्यक्रमाचे नियोजन मराठी



पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा दैनिक देशोन्नतीचे तालुका प्रतिनिधी संजय कुलकर्णी यांनी केले होते आणि त्यांच्या संकल्पनेतून हा मिठाई वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला

सर्वप्रथम या शाळेचे आदर्श मुख्याध्यापक रामचंद्र मोरे यांनी उपस्थित पत्रकार संजय कुलकर्णी, पत्रकार दशरथ सुरडकर, पत्रकार जावेद सौदागर, गजानन मरकड, राजू वैष्णव, रवींद्र सोनवणे, निलेश सोनटक्के, दत्तात्रय ढोरमारे यांचा शाल पुष्प व पेन भेट देऊन सन्मान केला.

खऱ्या अर्थाने ६ जानेवारी हा पत्रकाराच्या सन्मानाचा दिवस असल्यामुळे वेगवेगळी संस्था, वेगवेगळे कार्यालय, प्रमुख राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, पदाधिकारी हे पत्रकारांचा आदरपूर्वक सन्मान करतात पण तो सन्मान पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय आदर्श प्राथमिक शाळा के-हाळा येथील आदर्श मुख्याध्यापक रामचंद्र मोरे यांनी सर्वप्रथम केला.

पत्रकार दशरथ सुरडकर यांनी सुद्धा आपलं मनोगत व्यक्त करत सर्वांना दर्पण पत्रकार दिनाच्या शुभेच्छा देत बाळ शास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ मध्ये पहिलं मराठी दर्पण हे वृत्तपत्र सुरू केलं तो दिवस म्हणजे बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिवस असून जन्मदिवस साजरा न करता दर्पण पत्रकार दिन साजरा करता यावा व त्या दिवशी पत्रकारांचा सन्मान व्हावा म्हणून तो दिवस साजरा केला जातो आणि खऱ्या अर्थाने आम्हा पत्रकारांचा हा सन्मानाचा दिवस असल्यामुळे या शाळेचे मुख्याध्यापक रामचंद्र मोरे यांनी जो सन्मान केला त्यांचे आम्ही पत्रकार बांधव मनापासून आभार मानतो असे दशरथ सुरडकर यांनी आपल्या कवितेच्या दोन ओळीने आदर्श मुख्याध्यापक रामचंद्र मोरे व त्यांचे सर्व सहकारी यांचे आभार मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय समिती अध्यक्ष शेख नाजेम, मुख्याध्यापक रामचंद्र मोरे,शेख चांद, राजेंद्र बोडखे, माणिकराव काकडे,रमेश पवार, संभाजी पाटील, मोहम्मद झाहिरोद्दीन,मोहम्मद एजाजोद्दीन, शेख नासिर, जुबेर अहमद,मोईन खान, संजय सोनकांबळे, सुरेंद्र बबीरवाल, नानासाहेब शिंदे,अतुल कासारे,श्रीमती महानंदा राजपूत, रत्नकाला इंगळे,रत्नमाला वाघ,अश्विनी जंजाळ,कविता तेली, अर्चना लोंढे, शारदा गुठे, यशोदा दुबेले,विभा मेश्राम, सदफ देशमुख, बुशरा सुलताना, अनुराधा चव्हाण, श्रीकृष्ण बडक, गोपालसिंग राजपूत, नरेश गुरव, राहुल चटलावार,धीरज खोकड, विठ्ठल गोराडे, संतोष एंडोले, गणेश शिंदे यांनी प्रयत्न केले

## श्री.स.भु.बिडकीन मध्ये पत्रकार दिन उत्साहात साजरा

बिडकीन दि ७ जानेवारी – पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे मराठी पत्रकारितेचे जनक, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती पत्रकार दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला, शालेय समितीचे सदस्य मच्छिंद्र पाटील हाडे,नंदकुमार वैद्य, मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले , प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे यांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन दिपप्रज्वलन करण्यात आले.यावेळी प्रशालेच्या वतीने जेष्ठ पत्रकार नंदकुमार वैद्य, अरुण देविदास हसन चाऊस, विजय



शेजूळ , गणेश सोनवणे, रविंद्र गायकवाड,अली इनामदार,अलिम शेख,किरण औटी,फेरोज मिर्झा, विष्णू लघाने आदी.

पत्रकारांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार हसन चाऊस, रविंद्र गायकवाड,अली इनामदार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशालेचे शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला यांनी पत्रकारांच्या कार्याचा गौरव करुन पुढील काळात सहकार्याची अपेक्षा व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्ञानेश्वर चाटुपळे व आभारप्रदर्शन राजू शिंदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मच्छिंद्र पाटील, छाया डुबे सह सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

## शिवसेना भवन येथे दर्पण दिन साजरा



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.६, दर्पणकार, आचार्य बाळशास्त्री जांभेकर तसेच तमाम शिवसैनिकांच्या माँ साहेब स्व. मीनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त सिल्लोड शहरातील लोकनेते आ. अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय शिवसेना भवन येथे अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर तसेच माँ साहेब स्व. मीनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, विठ्ठल सपकाळ सयाजी वाघ , शेख सलीम हुसेन, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल यांच्यासह शहरातील पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.

## दर्पणदिन साजरा करून पैठण तालुका पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

तभा वृत्तसेवा पैठण दि ०७ :-

दर्पण दिनानिमित्त, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पैठण तालुका पत्रकार संघाची नवीन कार्यकारणीची निवड करण्यात आली. यावेळी चंदन लक्कडहार यांची अध्यक्षपदी तर मंगलसिंग भवरे यांची उपाध्यक्ष पदी एकमताने निवड करण्यात आली.

शहरातील पैठण तालुका पत्रकार संघाच्या कार्यालयात दर्पण दिन साजरा करण्यात आला यावेळी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर पत्रकार संघाची कार्यकारणी निवडण्यात आली. सर्वप्रथम पैठण तालुका पत्रकार संघाचे



मावळते अध्यक्ष शकील खलिफा यांनी अध्यक्षपदासाठी चंदन लक्कडहार यांच्या नावाची घोषणा केली. तर उपाध्यक्ष पदी मंगलसिंग भवरे यांच्या ही नावाची घोषणा यावेळी करण्यात आली. सध्या ग्रामीण भागात पत्रकारिता करणे कठीण झाले असून ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी आपण काम करू असे यावेळी पैठण तालुका पत्रकार संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष चंदन लक्कडहार म्हणाले.

या प्रसंगी मावळते अध्यक्ष शकील खलिफा, पत्रकार माऊली बावणे, अश्विन लक्कडहार, सुनील हिंगे, संजय कस्तुरे,अविनाश पल्लोड, वसंतराव भोसले, करीम अजीज शेख, किसन नवगिरे. विजय आचार्य, आशुतोष पाणगे, सुनील कुंभार,निलेश पानपट आदी उपस्थित होते.

# माध्यमांनी सत्य मांडायला हवे : ज्येष्ठ पत्रकार प्रगती बाणखेले

## एमजीएममध्ये मंगला विंचुर्णे-बर्दापूरकर स्मृती पारितोषिकाचे वितरण संपन्न, एमजीएममध्ये साजरा करण्यात आला दर्पण दिन



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ : जगभरातल्या सर्व माध्यमांनी सत्य मांडायला हवे. सत्य हे व्यक्ती परत्वे वेगळे असू शकते मात्र, त्यातला एक मध्यम मार्ग म्हणून माध्यमांनी सत्य मांडणे अपेक्षित असते. 'पोस्ट ट्रूथ इरा' नंतर यामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात बदल झालेला आपणास पहावयास मिळतो. जे खरे आहे ते न मांडता कल्पनेतील गोष्टींना भावनिक करत खऱ्यासारखे मांडण्याला 'पोस्ट ट्रूथ' असे म्हणतात. हे राजकारणात सुरू झाले मात्र, हे आता माध्यमात आले असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रगती बाणखेले यांनी यावेळी केले.

एमजीएम विद्यापीठाच्या विनोबा भावे सभागृहात मंगला विंचुर्णे-बर्दापूरकर स्मृती पारितोषिकाचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. पुरस्कार वितरणानंतर राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त प्रगती बाणखेले यांनी 'माध्यमांची नैतिकता' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी, एमजीएम विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमाच्या पदवी परीक्षेत सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या वैभवी रामानंद आठवले या विद्यार्थिनीला मंगला विंचुर्णे-बर्दापूरकर स्मृती पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आहे. यावेळी कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर,अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके व सर्व संबंधित उपस्थित होते.

पुढे बोलताना ज्येष्ठ पत्रकार प्रगती बाणखेले म्हणाल्या, माध्यमात काम करणाऱ्या सर्वांनी सत्य, अचूकता, निष्पक्षता, स्वातंत्र्य, सचोटी, सन्मान ही नैतिकमुल्ये जपत या क्षेत्रात कार्यरत असणे ही काळाची गरज आहे. वर्ल्ड प्रेस फ्रिडम इंडेक्सकडून दरवर्षी माध्यमांना किती स्वातंत्र्य आहे, या संदर्भात दरवर्षी एक अहवाल प्रसिद्ध केला जातो. मे २०२४ मध्ये हा अहवाल प्रसिद्ध झाला असून एकूण १८० देशांमध्ये आपल्या भारत देशाचा १५९ वा क्रमांक आहे. यावरून आपण नक्की कुठे आहोत, हे समजते.

माध्यमात जे काही चालू आहे ते स्वीकारत त्यामध्ये जे काही उत्कृष्ट करता येईल, ते आपण करणे आवश्यक आहे. माध्यमामध्ये काम करत असताना अचुकतेबद्दल गांभीर्यपूर्ण काम करायला हवे. ब्रेकिंगच्या नावाखाली चुकीची माहिती प्रसिद्ध होऊ नये, हे पण पत्रकाराने काळजीपूर्वक पाहिले पाहिजे. माध्यमे ही समाजाचा भाग असून समाज म्हणून आपण पत्रकारांचा सन्मान करणे आवश्यक असल्याचे ज्येष्ठ पत्रकार प्रगती बाणखेले यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ.विलास सपकाळ म्हणाले, प्रतिमा तयार करण्यासाठी माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांनी दररोज एखादा संपादकीय लेख वाचणे आवश्यक असून या माध्यमातून आपल्याला समकालीन बाबींसंदर्भात माहिती मिळत असते. नीतिमूल्ये जपत माध्यम क्षेत्रात विद्यार्थ्यांनी कार्यरत असायला हवे.

आई वडिलांच्या मार्गदर्शनाखाली मी माझा आजपर्यंतचा प्रवास यशस्वीपणे पूर्ण करू शकले. विद्यार्थ्यांनी एमजीएममध्ये उपलब्ध असलेल्या सर्व संसाधनांचा पुरेपूर वापर करत आपला प्रवास यशस्वी करावा. हा पुरस्कार मला मिळाला याचा आनंद झाला असल्याचे पुरस्कार प्राप्त विद्यार्थिनी वैभवी आठवले म्हणाली.

मंगला विंचुर्णे-बर्दापूरकर स्मृती पारितोषिक देण्यामागची भूमिका ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर यांनी मांडली. यावेळी वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दर्पण दिनानिमित्त तयार केलेल्या 'एमजीएम संवाद' अंकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ.रेखा शेळके यांनी केले तर आभार डॉ. आशा देशपांडे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री देशमुख यांनी केले.

## संघ हीच जीवनगाथा

अलक (७)

### चतु:सूत्री



१९०६ च्या डिसेंबर महिन्यात कलकत्याला काँग्रेसचे अधिवेशन पार पडले, लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने १) स्वराज्यर) स्वदेशी ३) बहिष्कार ४) राष्ट्रीय शिक्षण ही प्रत्यक्ष क्रियात्मक चळवळीची चतु:सूत्री घेऊन लोक प्रांतोप्रांती परतले होते. नंतर लोकमान्य नागपूरला थांबले होते. तेव्हा केशव त्यांना भेटायला जात असे. केशव व त्यांच्या मित्रांच्या राष्ट्रीय भावना उद्दीपित करणारे लोकमान्यांचे विचार होते हे निश्चित. लोकनायक बापूजी अणे लिहितात वंदे मातरम् म्हणणे, शिवाजी उत्सवात, गणपती उत्सवात, रामदासनवमी उत्सवात भाग घेणे म्हणजे वाघाच्या जबड्यात हात घालणेच ठरत असे. आणि या सर्व उत्सवात सहभागी होणे, वंदे मातरम् म्हणणे केशवला मनापासून आवडत होतं. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## ग्लोबल सेन्सेशन नेटफ्लिक्सच्या स्क्विड गेम सीझन २ सोबत सहयोगासाठी भागीदारी

छत्रपती संभाजीनगर - सीग्राम्स रॉयल स्टॅग ने नेटफ्लिक्सची विक्रमी लोकप्रिय मालिका 'स्क्विड गेम' च्या दुसऱ्या सीझनसाठी भागीदारी केली आहे. या सहयोगामुळे रॉयल स्टॅग च्या 'लाइव्ह इट लार्ज' तत्त्वज्ञानाचा समावेश सहजपणे केला गेला आहे, ज्यामुळे प्रेक्षकांना एका भव्य अनुभवाचा भाग बनण्याची संधी मिळेल. ही मालिका संपूर्ण जगभरातील कोट्यवधी प्रेक्षकांना मोहून टाकत आहे. के-ड्रामा युवकांमध्ये विशेष लोकप्रिय असल्याने, ही भागीदारी ब्रँडसाठी सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या युवा प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्याची संधी निर्माण करते, ज्यामुळे त्याचा आकर्षण आणि प्रासंगिकता आणखी वाढते.या सहयोगाबाबत बोलताना पर्नोड रिकार्ड इंडिया चे जनरल मॅनेजर - मार्केटिंग जॉयदीप बसुरॉय म्हणाले, नेटफ्लिक्सच्या 'स्क्विड गेम' सोबत रॉयल स्टॅगची भागीदारी ब्रँडला युवा पिढीच्या के-कल्चरच्या क्रेझला जोडण्याची संधी देते, ज्यामुळे भावनिक संबंध वाढतो आणि ब्रँडचा युवा कल्चर उंचावतो. रॉयल स्टॅग ब्रँड नेहमीच मोठी स्वप्ने पाहणाऱ्या आणि उत्कटतेने व उद्देशपूर्ण जीवन जगणाऱ्या लोकांसाठी उभा राहिला आहे, जे या शोच्या संकल्पनेशी जुळते. 'स्क्विड गेम' सीझन २ सोबतची ही भागीदारी आम्हाला आमच्या प्रेक्षकांना 'लाइव्ह-इट-लार्ज' अनुभव आणि ठोस सामाजिक महत्त्व देण्याची संधी देते - अर्थात 'जनरेशन लार्ज' साठी!

## जैन समाज हा सदैव आपली संस्कृती जपण्यास व इतरांची मदत करण्यास सदैव तत्पर : हरीभाऊ बागडे



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे आज छत्रपती संभाजीनगर चे भुमीपुत्र व राजस्थान राज्याचे राज्यपाल महामहीम हरीभाऊ बागडे नाना यांचा सत्कार समारंभाचा कार्यकम आयोजीत करण्यात आला होता. सकाळी ठिक ९ वाजता श्री.हरीभाऊ बागडे नाना यांचे राजाबजार जैन मंदिरात आगमन झाले असता सर्व प्रथम त्यांनी श्री.भगवान शांतीनाथांच्या चरणी श्रीफळ अर्पण करुन भगवंताचे आर्शिवाद घेतले. तदनंतर पंचायत चे अध्यक्ष महावीर पाटणी स्वागत पर उदबोधन दिले तसेच संजय पापडीवाल यांनी केले। माहावीर पाटनी यानी आपल्या वक्तव्यात हारीभाऊ बागड़े यांचे जीवन परिचय सर्वाना करुन दिले. त्यांचा एक सामान्य शेतकरी ते राज्यपाल पर्यतचा प्रवास सर्वाच्या नजरेत आणुन दिला तसेच त्यांची संघाच्या प्रति व भाजपा पक्षाच्या प्रति एकनिष्ठता असल्यामुळेच त्यांना आज सर्वोच्च राज्यपाल पदी पक्षाने काम करण्याची संधी दिली. श्री.नाना हे अत्यंत मन मिळावु व शांतप्रिय आहे असेही त्यांनी सांगीतले तसेच संजय पापडीवाल यांनी नाना यांनी श्री.क्षेत्र मांगीतुगीं ही या क्षेत्राची पायी वंदना केली असल्याची आवर्जुन सांगीतले. तदनंतर राजाबजार जैन पंचायत, श्री.क्षेत्र कचनेर, श्री.क्षेत्र मांगीतुंगी, श्री.क्षेत्र गजपंथा (नाशिक), श्री.चंद्रसागर दिगंबर जैन धर्मशाळाला, यांच्यासह अनेक संस्था संघटनांनी नानांचा स्मृतिचिन्ह शाल, श्रीफळ देवुन यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, विश्वस्थ ललीत पाटणी, महावीर ठोले, चंदा कासलीवाल, निता ठोले, श्री.क्षेत्र कचनेरचे अध्यक्ष सुरेश कासलीवाल, व्यवस्थापकीय संचालक भरत ठोल, महामंत्री विनोद लोहाडे, एम.आर.बडजाते, तिर्थरक्षा कमिटीचे माजी अध्यक्ष संजय पापडीवाल, किरण गंगवाल ,डॉ.रमेश बडजाते, डॉ.शैलेश चांदीवाल, प्रमोद पाटणी, सचिन बडजाते, सुनिल पाटणी, ॲड.अनिल कासलीवाल, नरेंद्र अजमेरा, भाजपाचे राजेश मेहता, प्रकाश कासलीवाल, बाजार समितीचे निलेश सेठी, आनंद सेठी,शाऊ पाटणी जयकुमार कासलीवाल, भिकचंद लोहाडे,रमेश पाटणी, रमेश कासलीवाल, दिलीप छाबडा, संतोष बाकलीवाल महिला मंडळाच्या अध्यक्षा सुरेखा पाटणी, डी.बी.पहाडे, केतन ठोले प्रमोद ठोले विनोद कासलीवाल चद्शेकर पहाडे सुनिल पाडे निरज पाङे इंदरंद से ठी यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती.

# सिटीआर चा हिरक महोत्सव साजरा



छत्रपती संभाजीनगर - चिकलठाणा व शेंद्रा औद्योगिक वसाहतीतील नामांकित कंपनी सिटीआर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड ने आपल्या १८ डिसेंबर २०२४ रोजी पुर्ण झालेल्या गौरवशाली षष्ट्यब्दी पूर्ती निमीत्त हिरक महोत्सव सोहळ्याचे शनिवार दिनांक ०४ जानेवारी २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजन केले होते.

१८ डिसेंबर १९६४ रोजी पुणे येथे कंपनीचे संस्थापक स्व. श्री. प्रताप कुमार यांनी त्यांच्या दूरदृष्टिकोनातून कंपनीची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत विद्यमान उपाध्यक्ष अनिल कुमार व संचालिका सौ. प्राजक्ता कुमार यांनी कल्पक बुद्धिमत्तेतून व अथक परिश्रमातून या रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर केले. वर्षागणिक यशाची उत्तुंग शिखरे गाठीत असताना संशोधन व अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करीत जागतिक दर्जाच्या उत्पादनांची भर घालून प्रारंभी पुण्यात सुरु झालेल्या कंपनीचा उत्तरोत्तर विस्तार चिकलठाणा, नाशिक व शेंद्रा येथे कारखाने उभारून केला. याकामी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. व्ही. के. वाकचौरे व संचालक श्री. आर. व्ही. तळेगावकर यांनी मोलाचे योगदान दिले.

महोत्सवाचा प्रारंभ अनिल कुमार, सौ. प्राजक्ता कुमार व छत्रपती संभाजीनगर स्थित महाव्यवस्थापक प्रणव शंकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाला. याप्रसंगी व्यवस्थापनातर्फे १० ते ४९ वर्षे कंपनीची अखंड सेवा केलेल्या व कंपनीच्या ६० वर्षांच्या दैदिप्यमान वाटचालीत सहभागी असलेल्या १२६ कामगार, कर्मचारी व अधिकाऱ्यांचा कृतज्ञ भावनेतून प्रशस्तीपत्र व यथोचित भेट देऊन सन्मान करण्यात आला. प्रणव शंकर यांनी कंपनीच्या ६० वर्षांच्या आजवरच्या प्रवासाचा लेखाजोखा तसेच मुकीम खान यांनी अनिल कुमार यांच्या योगदानाविषयी उपस्थितांना त्यांच्या ओघवत्या शैलीत अवगत केले. कार्यक्रमादरम्यान दिल्लीस्थित नामांकित आर्केस्ट्रा दमसाज यांनी सादर केलेल्या सुफी गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. रवींद्र क्षीरसागर यांच्या खुमासदार शैलीतील सूत्रसंचालनाने कार्यक्रमात रंगत आली. संपूर्ण कार्यक्रमात स्वादिष्ट खाद्यपदार्थांची रेलचेल होती. शहरातील नामांकित व उच्चपदस्थांनी हजेरी लावून कंपनीच्या विस्तारीकरणाच्या उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.

# गोविंदपुरा येथे गुरु गोविंद सिंग यांची ३५८ वी जयंती उत्साहात साजरी

## आ.संग्राम जगताप, जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांनी गुरुद्वाराला दिली भेट



अहिल्यानगर : गोविंदपुरा गुरुद्वाराभाई दयासिंगजी येथे शीख, पंजाबी, सिंधी समाजाने एकत्र येऊन विविध धार्मिक कार्यक्रमाने दहावे गुरु, गुरु गोविंद सिंग यांच्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यानिमित्त जगाच्या शांततेसाठी प्रार्थना केली व धार्मिक गीत गायन, अखंड पाठ, भजन किर्तन, कथा आयोजित करण्यात आले होते. यावेळी गुरुगोविंद सिंग यांच्या जीवन संदर्भात माहिती दिली व गुरुगोविंद सिंग कोण होते यासंदर्भात त्यांच्या वडिलांचे नाव गुरु तेग बहादुर होते आणि ते शीखांचे नववे गुरु होते. त्यांच्या मृत्यूनंतर गुरु गोविंद सिंग शीख धर्माचे दहावे गुरु बनले. गोविंद सिंग यांचा जन्म २२ डिसेंबर १६६६ मध्ये पटना बिहार मध्ये झाला. त्यांचा जन्मदिवस गुरुंच्या जन्मोत्सव नानकशाही कॅलेंडरवर आधारित आहे. या वर्षी गुरु गोबिंद सिंग जयती ६ जानेवारी म्हणजेच आज सर्वत्र साजरी केली जात आहे. गुरु गोबिंद सिंह नी संत-सैनिकांच्या खालसा दलाची स्थापना १६९९ मध्ये केली होती. ते जातिवाद आणि अंधविश्वास यांच्यावर विश्वास ठेवत नसे आणि कोणी यावर विश्वास ठेवू नये असे त्यांचे म्हणणे होते. गुरुगोविंद सिंग यांच्या जयंतीनिमित्त महाप्रसादचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आ. संग्राम जगताप, जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांनी गुरुद्वाराला भेट देत दर्शन घेतले, व समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान गुरुद्वाराचे हेड ग्रंथीभाई गुरुभेदसिंग हजुरी, जयाभाई समरथसिंगजी व अमृतसरचे भाई सुखप्रीत सिंग साज यांनी भाविकांना कीर्तनाने मंत्रमुग्ध केले, बोले सो निहाल, सतसीअकाल व वाहे गुरुजी का खालसा, वाहे गुरुजी कि फतेहच्या गर्जनाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

## क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनने बायर एजी कडून इथॉक्सिसल्फ्युरॉन अधिग्रहण; भातावरील तणनाशकांमधील आपलं नेतृत्व भक्कम केलं

नवी दिल्ली : क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेड, ही कृषी नवकल्पनातील अग्रगण्य कंपनी असून, तिने काही आशियाई देशांमध्ये विक्रीसाठी बायर एजीकडून सक्रिय घटक एींहुींश्रषीप च्या जागतिक संपादनाची घोषणा केली. २०२१ मध्ये भारतीय कापूस, बाजरी आणि मोहरी बियाणे पोर्टफोलिओच्या संपादनानंतर क्रिस्टलचा १३वा धोरणात्मक व्यवहार आणि बायरकडून दुसरे संपादन याद्वारे पूर्ण झाले आहे.इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन द्वारे समर्थित, क्रिस्टल क्रॉप ही आर एंड डी-आधारित पिक उपाय पुरविणारी कंपनी आहे जी ४ दशकांहून अधिक काळ प्रगत, शेतकरी-केंद्रित उपाय पुरवत आली आहे. हे क्रिस्टलच्या सर्वात मोठ्या अधिग्रहणांपैकी एक असून, भातावरील तणनाशकांच्या बाजारात कंपनीचे नेतृत्व वाढवताना त्यांचा एबीआयटीडीए २०% वाढवेल. या व्यवहारामुळे सर्व नोंदणींसह विश्वसनीय सनराईस ट्रेडमार्क आणि इथॉक्सिसल्फुरॉन असलेले मिश्रण उत्पादन एकत्र आले आहे. इथॉक्सिसल्फ्युरॉन हे धान आणि तृणधान्य पिकांमधील रुंद-पानांचे तण आणि लव्हाळा वर्गीय तणाचे प्रभावीपणे नियंत्रित करण्यासाठी ओळखले जाते, ज्यामुळे ते क्रिस्टलच्या पोर्टफोलिओमध्ये एक महत्त्वाची भर घालणारे आहे. स्थानिक पातळीवर उत्पादन तयार करून खर्च-प्रभावी, शाश्वत उपाय प्रदान करण्याचे लक्ष्य ठेवते. परिणामी भारत, दक्षिण आशिया आणि दक्षिण-पूर्व आशियातील (व्हिएतनाम, बांगलादेश, थायलंड आणि पाकिस्तानसह) शेतकऱ्यांसाठी वाढीव किमतीचा समन्वय आणि उपलब्धता झाली आहे.


INVITATION TO THE REMAINING PUBLIC SHAREHOLDERS TO AVAIL THE EXIT OPPORTUNITY UNDER EXIT OFFER

**TCI DEVELOPERS LIMITED**

**Corporate Identification Number (CIN):** L70102TG2008PLC059173
**Registered Office:** Flat No. 306-307, 1-8-271 to 273, 3rd Floor, Ashoka Bhoopal Chambers, S. P. Road, Secunderabad, Telangana - 500003 | **Tel. No.:** +91- 40-27840104 | **Fax. No.:** +91- 40-27840163
**Contact Person:** Ms. Saloni Gupta, Company Secretary & Compliance Officer
**Email id:** secretarial@tcidevelopers.com | **Website:** www.tcidevelopers.com

**Dear Residual Public Shareholder,**

(This public invitation shall be read in continuation of and read in conjunction with and all capitalized terms used in this public invitation shall have the same meaning as ascribed to it in Detailed Public Announcement dated September 02, 2022 published on September 05, 2022 ("**DPA**"), the Letter of Offer dated September 05, 2022 ("**LOF**"), Post Offer PA dated September 21, 2022 ("**Post Offer PA**"), Exit Offer Public Announcement dated November 03, 2022 ("**Exit Offer PA**"), Exit Letter of Offer dated November 11, 2022 ("**ELOF**") and Corrigendum to the public announcement dated November 17, 2023 and May 31, 2024.

This invitation of the Company is being issued for and on behalf of TDL Real Estate Holdings Limited ("**Promoter Acquirer**"), and other members of promoter and promoter group of TCI Developers Limited to the remaining Public Shareholders ("**Residual Public Shareholders**") of TCI Developers Limited (the "**Company**") in adherence with Regulation 27(1)(a) and all other applicable regulations of the Delisting Regulations.

This is to inform to all Residual Public Shareholders that the Equity Shares of the Company have been delisted and trading in the Equity Shares of the Company has been discontinued trading w.e.f. November 11, 2022 ("**BSE and NSE Date of Discontinuance of Trading**") and the above referred security symbol will be delisted from BSE and NSE with effect from November 18, 2022 ("**BSE and NSE Date of Delisting**").

In terms of Regulation 27(1)(a) read with Regulation 26 and all other applicable Regulations of the Delisting Regulations, the Promoter Acquirer is inviting the Remaining Public Shareholders to avail the exit opportunity during the one-year exit window after delisting of Equity Shares.

The Residual Public Shareholders who have still not tendered their Equity Shares, can tender their Equity Shares to the Promoter Acquirer at the **Exit Price of Rs. 400/-** (Indian Rupees Four Hundred Only) during the extended period from **June 01, 2024 till May 31, 2025** (both days inclusive) (the "**Exit Window**") subject to the terms and conditions provided in ELOF.

The Residual Public Shareholders are required to ensure that their Exit Application Form, together with the necessary enclosures, as per ELOF, is received by the Registrar to the **Exit Offer on or before May 31, 2025**.

In case of non-receipt of said Exit Application Form / ELOF or if the same has been misplaced, the Residual Public Shareholders may obtain a copy of the same by writing to the Registrar to the Exit Offer. Copy of the ELOF can also be downloaded from the websites of the BSE at www.bseindia.com, NSE at www.nseindia.com and Company at www.tcidevelopers.com.

**A follow-up email for the quarter ended December 2024,** has been sent to all the remaining Residual Public Shareholders in compliance with Regulation 27(1)(b) of the Delisting Regulations.

The Promoter Acquirer will make the payment by way of electronic credit to Residual Public Shareholders who have validly tendered their Equity Shares in Exit Offer following the receipt and verification of duly filled Exit Applications Form(s) (together with necessary enclosures, if any and receipt of the Equity Share(s) in the Special Depository Account / receipt of physical share certificate(s) (along with duly filled in transfer deed(s) as applicable) by the Registrar to the Exit Offer.

Any Residual Public Shareholders seeking any other assistance in connection with their shareholding like issue of duplicate share certificate, rectification of name, transmission of shares, deletion of name of a shareholder in case of joint shareholding, etc. may contact the Registrar to the Exit Offer.

**The Promoter Acquirer accept full responsibility for the information contained in this Public Invitation and confirms that such information is true, fair and adequate in all material aspects.**

| MANAGER TO THE OFFER | REGISTRAR TO THE EXIT OFFER |
|---|---|
| SAFFRON energising ideas<br>**SAFFRON CAPITAL ADVISORS PRIVATE LIMITED**<br>605, 6th floor, Centre Point, Andheri Kurla Road, J.B. Nagar, Andheri (East) Mumbai - 400 059, Maharashtra, India.<br>**Telephone:** +91 22 4973 0394 \| **Fax:** NA<br>**E-mail:** delistings@saffronadvisor.com<br>**Website**: www.saffronadvisor.com<br>**Investor grievance:** investorgrievance@saffronadvisor.com<br>**SEBI Registration Number:** INM 000011211<br>**Validity of Registration:** Permanent<br>**Contact Person:** Amit Wagle / Gaurav Khandelwal | KFINTECH<br>**KFIN TECHNOLOGIES LIMITED**<br>Selenium Tower – B, Plot 31 & 32, Gachibowli, Financial District, Nanakramguda, Serilingampally, Hyderabad - 500 032, Telangana, India.<br>**Telephone:** +91 40 6716 2222/ / +91 40 7961 1000<br>**Toll Free No:** 1-800-3094-001 \| **Fax:** + 91 40-23001153<br>**Email:** tci.delistingoffer@kfintech.com<br>**Website:** www.kfintech.com<br>**Investor Grievance Email:** einward.ris@kfintech.com<br>**Contact Person:** Mr. Murali Krishna M<br>**SEBI Registration Number:** INR000000221 |

*For and on behalf of the Board of Directors of TDL Real Estate Holdings Limited (the Promoter Acquirer)*

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| Urmila Agarwal | Karanjit Singh | Ishwar Singh Sigar |

**Place:** Gurugram
**Date:** January 08, 2025

AdBaaz


## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ०७/२०२५.

अर्जदार : १. संजय बबन संसारे, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. तिडका, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २. राजु बबन संसारे, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. तिडका, ता. सोयगांव, जि. छ, संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अशोक आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत बबन सखाराम संसारे यांचा दिनांक ११/०८/२०२१ रोजी तिडका, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत बबन सखाराम संसारे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०३/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ११/०२/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क, स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ०५/२०२५.

अर्जदार : १. अरुण तुकाराम पाटील, वय ४५ वर्षे, धंदा मजुरी, रा. गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर ह. मु. एन-८, सी-२, ७१ सिदेश्वर कॉलनी, सिडको, नाशिक.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत दुर्गाबाई तुकाराम पाटील यांचा दिनांक १३/११/२०२४ रोजी गोंदेगांव, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ हे मयत दुर्गाबाई तुकाराम पाटील यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०३/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ११/०२/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र: २१९/२०२४.

अर्जदार : १) सुगंधाबाई पिता छैलाजी चनाल, वय ७० वर्षे, धंदाः शेती, रा. साईबाबा मंदीर जवळ, विश्वास नगर, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद २) सुरेश छैलाजी चनाल, वयः औरंगाबाद. ६८ वर्षे, धंदा शेती, रा. जरंडी ता. सोयगांव जि. ३) सुभाष छैलाजी चनाल, वयः ६५ वर्षे, धंदाः शेती, रा. जरंडी ता. सोयगांव जि औरंगाबाद. ४) मंगलाबाई प्रकाश कंडारे, वयः ६० वर्षे, धंदाः शेती, रा. सांगवी बु. ता. यावल जि जळगांव. ५) मिराबाई रमेशसिंग खोडे, वयः ५७ वर्षे, धंदाः शेती, रा. मकानं नं. ४० गल्ली नं ०४ वीर राणी दुर्गावती वार्ड सिंघाड तलाई, वार्ड नं. ३४, लालू किराणा दुकान जवळ, खंडवा ता. व जि. खंडवा (मध्य प्रदेश).

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. कस्तुराबाई छैलाजी चनाल हे दिनांकः १०/१०/२०२१ ला मौजे, जरंडी ता. सोयगांव जि. औरगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणप्रत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक:- २७/०१/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक: ०६/०१/२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ६१०/२०२४

अर्जदार : १) राधाकिसन वंडु उर्फ वंडेराव तोडकर, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. तुर्कावाद खराडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) भाऊसाहेव वंडु उर्फ वंडेराव तोडकर, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. तुर्कावाद खराडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) हिरावाई भ्र. जम्मन तोडकर, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. तुर्काबाद ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) अनिल जम्मन तोडकर, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. तुर्कावाद ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) अमोल जम्मन तोडकर, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. तुर्कावाद ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ६) सौ सुनिता रविंद्र शिंदे, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम रा. गणपती गल्ली गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ७) सौ. नम्रता संतोष गायकवाड, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम रा. कासोडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. रविराज वी. दारुंटे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, वंडेराव गणपतराव तोडकर व लक्ष्मीवाई चंडेराव तोडकर हे आपसांत नात्याने पती पत्नी असुन ते मौजे तुर्कावाद खराडी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते, त्यापैकी वंडेराव गणपतराव तोडकर हे दिनांक २३/०२/२००७ रोजी मौजे तुर्कावाद खराडी ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे व त्यांची पत्नी लक्ष्मीवाई वंडेराव तोडकर ह्या दिनांक ०१/०६/२०१२ रोजी मयत झालेल्या आहे. मयत वंडेराव गणपतराव तोडकर व मयत लक्ष्मीवाई चंडेराव तोडकर यांना तीन मुले नामे १) जम्मनराव वंडु उर्फ बंडेराव तोडकर, अर्जदार क्र.१ राधाकिसन बंडु उर्फ बंडेराव तोडकर व अर्जदार क्र.२ भाऊसाहेव बंडु उर्फ वंडेराव तोडकर असे होते, त्यापैकी जम्मनराव बंडु उर्फ खंडेराव तोडकर हे दिनांक २९/०५/२०२१ रोजी मयत झाले असुन मयत जम्मनराव बंडु उर्फ चंडेराव तोडकर यांना अर्जदार क्र.३ ही पत्नी व अर्जदार क्र.४ ते ७ हे मुले व मुली असे कायदेशीर वारसदार आहेत. येणे प्रमाणे मयत बंडेराव गणपतराव तोडकर व मयत लक्ष्मीबाई वंडेराव तोडकर यांना अर्जदार क्र.१ ते ७ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप- उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०६/०१/२०२५ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०४/०२/२०२५ रोजीची आहे.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## अग्रलेख...

# सातत्य न राखणाऱ्या खेळाडूंना घरी बसवा

भारतीय क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलियात खेळताना हाराकिरी केली. १४० कोटी लोकसंख्येच्या देशातून ११ खेळाडू निवडले जातात आणि ते लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जातात, तेव्हा सामान्य क्रिकेट रसिकाला राग अनावर होतो. स्वाभाविकही आहे. खेळ म्हटला की जय-पराजय होणारच. परंतु, पराभव हा लाजिरवाणा असेल आणि खेळाडूंच्या बेफिकीर वृत्तीमुळे झालेला असेल तर तो रसिकांच्या जिव्हारी लागणार आणि त्यामुळे संतापाचाही उद्रेक होणार. हारण्यासाठीच ऑस्ट्रेलियासारख्या देशात जायचे असेल तर रोहित शर्मा, विराट कोहली यांच्यासारख्या प्रचंड मानधन घेऊन खेळणाऱ्या क्रिकेटपटूंची गरज काय? त्यासाठी एखाद्या मोठ्या शहरातील क्लबचे खेळाडूही पाठविले जाऊ शकतात. रोहित शर्मा हा कर्णधार असूनही बॉर्डर-गावस्कर चषकाच्या शेवटच्या कसोटी सामन्यात खेळला नाही. अशी जर भारतीय संघाची स्थिती असेल तर कामगिरीवर नाराज असलेल्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. भारतीय खेळाडूंच्या कामगिरीवर नियामक मंडळ नाराज असल्याच्या वार्ता आहेत. खेळाडूंवर प्रचंड मानधनाचा वर्षाव करणाऱ्या नियामक मंडळाने खेळाडूंसाठी कठोर अशी आचारसंहिता तयार करण्याची गरज या पराभवाने अधोरेखित केली आहे. भारतीय संघात स्थान असलेल्या खेळाडूंनी वर्षभर सराव हा केलाच पाहिजे, स्वत:ला तंदुरुस्त ठेवण्यासाठी परिश्रम घेतले पाहिजेत, देशांतर्गत स्पर्धांमध्ये गंभीरपणे सहभाग नोंदविला पाहिजे, प्रथम श्रेणी क्रिकेटमधील त्यांच्या कामगिरीच्या आधारेच त्यांची भारतीय संघात निवड व्हायला पाहिजे. संघातील खेळाडूंचा जोपर्यंत नियामक मंडळाशी करार आहे, तोपर्यंत या खेळाडूंवर काही बंधने लादणेही आवश्यक आहे. पदार्पणातच अनेक खेळाडू जाहिरातींमध्ये मॉडेल म्हणून काम करणार नाहीत, हे पहिले बंधन घालणे अत्यावश्यक आहे. जो नवीन येतो, त्याला कुठल्या ना कुठल्या कंपनीच्या जाहिरातीत काम मिळतेच मिळते. त्यामुळे अशा खेळाडूंचे खेळावरील लक्ष कमी होते आणि त्याचा परिणाम कामगिरीवर होतो. परिणामत: संघाची कामगिरीही खराब होते. या सगळ्या बाबींचा विचार करता, ज्यांना भारतीय संघात निवडले जाते आणि निवडलेल्यांची खेळण्याची तयारी असते, त्या सगळ्यांना नियमांचे पालन करण्याची सक्ती ही केलीच पाहिजे. क्रिकेटमध्ये भारतीय संघाने चांगली कामगिरी केलीच नाही, असे आम्हाला अजिबात म्हणायचे नाही. अनेकदा ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशाच्या मजबूत संघांना पराभूत करण्याची दमदार कामगिरी भारतीय खेळाडूंनी केली आहे. त्यासाठी ते निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. पण, सध्याच्या संघातील काही खेळाडूंच्या कामगिरीची समीक्षा करणे गरजेचे आहे. ऋषभ पंत हा यष्टिरक्षक आहे. फलंदाजी करताना अनेकदा तो अनावश्यक फटके मारतो आणि बाद होतो. त्याच्या अशा वागण्यावर संघाचा कर्णधार आणि प्रशिक्षक यांनी नियंत्रण मिळविले पाहिजे. ताकीद देऊनही खेळाडू ऐकत नसतील तर बाहेरचा रस्ताही दाखविता आला पाहिजे. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशातून सामना खेळण्यासाठी फक्त ११ खेळाडू निवडले जातात, ही बाब लक्षात घेता खेळाडूंची निवड ही नि:पक्षपातीपणे झाली पाहिजे, ज्यांची योग्यता आहे, त्यांनाच निवडले पाहिजे, संधी दिल्यानंतर त्यांच्या खेळाचा आढावा नियमितपणे घेतला गेला पाहिजे आणि प्रत्येक वेळी संघाची कामगिरी तपासून पुढल्या मालिकेसाठी अनुभवी खेळाडूंसह नव्या दमाचा संघ तयार ठेवला पाहिजे. प्रचंड लोकसंख्येतून जेव्हा ११ खेळाडू निवडले जातात, तेव्हा क्रिकेट रसिकांच्या त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा वाढलेल्या असतात. स्वाभाविकही आहे. अपेक्षा १०० टक्के पूर्ण करता येणे खेळाडूंसाठी शक्य नसले, तरी चांगला खेळ करून रसिकांना खूश करणे निश्चितच कठीण नाही. जे खेळाडू वारंवार संधी देऊनही चांगला खेळ करत नाहीत, त्यांचे लाड केले जाऊ नयेत. आयपीएल सुरू झाल्यापासून खेळाडूंवर पैशांचा पाऊस पडतो आहे. त्यामुळे अनेक खेळाडू संपूर्ण लक्ष तिकडे केंद्रित करताना दिसतात. आयपीएलमध्ये दीर्घकाळ खेळल्याने अनेकदा ते थकून जातात आणि भारतीय संघात खेळताना त्यांची कामगिरी सुमार राहते, हेही दिसून आले आहे. सध्या भारतीय संघात रोहित शर्मा आणि विराट कोहली हे दीर्घ अनुभव असलेले दिग्गज खेळाडू खेळत असले, तरी त्यांच्यावरील अवलंबित्व कमी करण्याच्या दृष्टीनेही क्रिकेट नियामक मंडळाला प्रयत्न करावे लागणार आहेत. अनेक पर्याय आहेत. ते पडताळून पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. भारतात प्रतिभेची काहीही कमतरता नाही. अनेक स्पर्धांमधून आपल्याला चांगले खेळाडू शोधून काढता येतात. भाईभतिजावाद बाजूला सारत प्रामाणिक प्रयत्न केले गेलेत तर प्रतिभावान खेळाडू शोधून त्यांना संधी दिली जाऊ शकते. नव्या खेळाडूंना प्रशिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणता येऊ शकते. ज्यांची एकदा संघात निवड होते, त्या सगळ्यांसाठी नियमित सराव हा सक्तीचाच असला पाहिजे. अन्यथा, नियमित व्यायामाअभावी पोलिस खात्यात जसे अनेक ढेरपोटे तयार होतात, तसे आळशी खेळाडू भारतीय संघातही दिसू शकतात. हे टाळता येणे अशक्य नाही. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या निर्णायक पाचव्या सामन्यातील पराभवामुळे प्रतिष्ठेचा बॉर्डर-गावस्कर चषक गमावण्यासह भारताचे जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेतील आव्हानही संपुष्टात आले, हे फार दुर्दैवी होय. प्रतिभेची कमतरता नसलेल्या भारतीय संघाचा ऑस्ट्रेलियात झालेला पराभव क्रिकेट रसिकांच्या जिव्हारी लागला आहे. नसता लागला तरच नवल! 'डब्ल्यूटीसी'ची अंतिम फेरी गाठण्याच्या आशा कायम राखण्यासाठी भारताला शेवटच्या सामन्यात विजय मिळविणे अनिवार्य होते. मात्र, सिडनी येथील क्रिकेटच्या मैदानावर गोलंदाजांसाठी अनुकूल खेळपट्टीवर भारतीय संघाला चांगली कामगिरी करता आली नाही, हे वास्तव आहे. रोहित शर्मा, विराट कोहलीसारखे फलंदाज अपयशी ठरले. पंत, यशस्वी जयस्वाल यांना सातत्य राखता आले नाही. बेजबाबदार फटके मारणाऱ्या पंतला समज देणे गरजेचे आहे. ऑस्ट्रेलियाने पाच सामन्यांची मालिका ३-१ अशा फरकाने जिंकताना दशकभरानंतर बॉर्डर-गावस्कर करंडक उंचावला. यासह ऑस्ट्रेलियाने ११ ते १५ जून या कालावधीत इंग्लंडमधील ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर होणाऱ्या 'डब्ल्यूटीसी'च्या अंतिम सामन्यासाठीही पात्रता मिळविली. ऑस्ट्रेलियाचा संघ या स्पर्धेतील गतविजेता असून, यंदा त्यांच्यासमोर दक्षिण आफ्रिकेचे आव्हान असेल. 'डब्ल्यूटीसी'मध्ये दक्षिण आफ्रिकेची गुणांची टक्केवारी ६६.६७ अशी असून ते अग्रस्थानी आहेत. ऑस्ट्रेलियाचा संघ ६३.७३ टक्क्यांसह दुसऱ्या स्थानी आहे. सिडनीतील पराभवामुळे भारतीय संघाचे गुणांकन ५० टक्क्यांवर घसरले, ही बाब मनाला वेदना देणारी आहे. गतवर्षीच्या अखेरीस मायदेशात न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेपूर्वी भारतीय संघ 'डब्ल्यूटीसी'ची अंतिम फेरी गाठण्यासाठी सुस्थितीत होता. मात्र, न्यूझीलंडने भारताला ०-३ अशी धूळ चारली. त्यामुळे अन्य संघांच्या निकालांवर अवलंबून न राहता अंतिम फेरी गाठण्यासाठी भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत किमान चार सामने जिंकावे लागणार होते. भारताने या मालिकेची विजयासह सुरुवात जरूर केली, पण भारतीय संघातील खेळाडूंना कामगिरीत सातत्य राखता आले नाही. भारतीय संघाने पुढील चारपैकी तीन सामने गमावले, तर एक सामना अनिर्णीत राहिला होता. त्यामुळे सलग तिसऱ्यांदा 'डब्ल्यूटीसी'ची अंतिम फेरी गाठण्याचे भारतीय संघाचे स्वप्न अधुरेच राहिले. गेल्या दोन पर्वांत भारताला अनुक्रमे न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाकडून पराभूत झाल्याने उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. आता जूनमध्ये होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेने भारतीय संघ 'डब्ल्यूटीसी'च्या नव्या पर्वाला सुरुवात करेल, तेव्हा संघात दमदार, सातत्य राखू शकतील अशाच खेळाडूंचा समावेश करण्यावर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भर द्यावा, असा क्रिकेट रसिकांचा असलेला आग्रह अनाठायी नाहीच!

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

# चीनच्या चतुरतेला भारताचे उत्तर

(उत्तरार्ध)

चीन जुनेपुराणे ऐतिहासिक दाखले देऊन वाद उकरून काढतो, असे अनेकदा आढळून आले आहे.

**उत्तर कोरिया :** सध्या जरी उत्तर कोरिया प्रत्येक प्रश्नी चीनची री ओढताना दिसत असला, तरी चीनने बिडू पर्वत व जिअँदोवर अधिकार सांगितला आहे. १२७१ ते १३६८ या काळात उत्तर कोरियावर युवान घराण्याचे साम्राज्य होते. त्यामुळे खरे तर (?) सर्व उत्तर कोरियाच आपल्या आधिपत्याखाली आला पाहिजे, अशी चीनची भूमिका आहे.

**रशिया :** चीनने रशियालाही सोडलेले नाही. रशियामधील १ लक्ष ६० हजार चौरस किमी जागेवर चीनने दावा ठोकला आहे. या संभाव्य घुसखोरीमुळे रशियात तीव्र संताप व्यक्त झाला आहे. रशियाचा पूर्व किनारा विरळ लोकवस्ती असलेला पण खनिज विपुल आहे. येथील बंदर व्हलाडिव्होस्टॉकचा शब्दश: अर्थ आहे पूर्वेचा शास्ता किंवा शासनकर्ता. १८६० मध्ये हा एका तहान्वये रशियाचा भाग झाला. चीनला आज तो परत हवा आहे. पण हे प्रकरण तापताच चीनने भूमिका बदलली. आमचा उद्देश फक्त ऐतिहासिक सत्य घटना सांगण्याचा होता, अशी मखलाशी चीनने केली. पण एका तहान्वये व्हलाडिव्होस्टॉक आज हे रशियाचे प्रचंड मोठे बंदर असून त्यामुळे रशियाला पॅसिफिक महासागरात (जपानी समुद्र) प्रवेश करता येतो.

**सिंगापूर :** दक्षिण चिनी उपसागराच्या भागावर सिंगापूर व चीन या दोन्ही देशांनी आपला अधिकार सांगितला आहे. इतिहास काळातील दाखल्यांच्या आधारे संपूर्ण देशावरच अधिकार सांगणे.

**दक्षिण कोरिया :** युआन घराण्याची सत्ता १२७१ ते १३६८ या कालखंडात आजच्या दक्षिण कोरियावर होती. हा भाग पूर्व चिनी समुद्राला लागून असल्यामुळेही चीन दक्षिण कोरियावर अधिकार सांगतो आहे.

**लाओस :** याच दोन्ही कारणास्तव चीन लाओसवरही अधिकार सांगतो आहे.

**ताजिकिस्तान :** किंग घराण्याच्या ताब्यात कधीकाळी (१६४४ ते १९१२) ताजिकिस्तानचा काही भाग होता, तो आता चीनला परत हवा आहे.

**कंबोडिया :** मिंग डायनेस्टीच्या १३६८ ते १६४४ या काळात कंबोडियाचा जो भाग चीनच्या ताब्यात होता, तो आता चीनला परत हवा आहे.

**मंगोलिया :** १२७१-१३६८ या काळात संपूर्ण मंगोलियावर चीनचा ताबा होता म्हणून जर आज मंगोलिया चीनला हवा असेल, तर मग त्या अगोदर मंगोलियाच्या चंगीजखानचा अंमल चीनवर होता; त्याचे काय करायचे?

**तिबेट :** १९१३ ते १९५० या कालखंडात १२ लाख चौ. किमी तिबेट एक स्वतंत्र राष्ट्र होते. चीनने १९५० मध्ये आक्रमण करून तिबेट पादाक्रांत केला. कारण काय तर म्हणे १३ व्या शतकात युआन राजवटीत तिबेटवर चीनचा अंमल होता. प्रदेश जिंकून गिळंकृत करणे. या शिवाय तुर्कस्तानचा १६ लाख चौ. किमी भाग, इनर मंगोलियाचा १२ लाख चौ. किमी भाग, तैवानचा ३६ हजार चौ. किमी, हाँगकाँगचा ११०० चौ. किमी व मकावचा ३३ चौ. किमी भाग चीनने जिंकून आपल्या देशाला जोडला आहे, ते वेगळेच. देशांच्या सीमा मानवनिर्मित असतात, परमेश्वरनिर्मित नसतात, हे ऐतिहासिक सत्य आहे, हे खरे असले तरी आजच्या चीनच्या व त्याने दावा केलेल्या भूभागांना गृहीत धरून जर सीमा निश्चित झाल्या, तर त्या मानवनिर्मित नव्हे; दानवनिर्मित असतील, असे म्हटले तर ते चुकेल का?

अशा या चीनने 'आशियन सगळे एक, इतर सगळे परके' असा नारा दिला आहे. आशियासारख्या महत्त्वाच्या खंडात हातपाय पसरण्यासाठी चीनने योजलेली ही युक्ती आहे. पण इतर आशियन देशांना आपल्याकडे वळविण्याचा हा एक कावा आहे, हे आता हळूहळू इतर राष्ट्रांच्या लक्षात आले आहे. अशावेळी आशियन देशांना मदतीसाठी अमेरिकेकडे पाहावे लागेल आणि अमेरिकेलाही उचित प्रतिसाद द्यावा लागेल. भारत संरक्षण उत्पादनासाठी अमेरिकेची मदत घेतो आहे, ती केवळ स्वत:साठीच, असे मानता येईल का? चीनची शस्त्रास्त्र क्षमता आणि फौजफाटा बराच मोठा आहे. मध्यंतरी लाओसमध्ये आग्नेय आशियातील संरक्षण मंत्री एकत्र आले होते. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी यावेळी एक महत्त्वाची माहिती सर्व आशियातील राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या कानावर घातली. भारताने हे करार ऑस्ट्रेलिया आणि जपानशी केले आहेत, असे त्यांनी जाहीर केले आहे. समविचारी आशियाई देशांना भारतासोबत सुरक्षाविषयक सहकार्य विकसित करण्यास भरपूर वाव आहे, असे ते म्हणाले. चीन आपली लष्करी क्षमता सतत वाढवत चालला आहे, याची संबंधितांना जाणीव करून देत राजनाथ सिंह म्हणाले की, आग्नेय आशियातील देशांनी आपापल्या संरक्षणविषयक उद्योगांचे आधुनिकीकरण केले पाहिजे. केवळ एवढेच करून भागणार नाही, तर सामायिक हितासाठी आपण एकत्र येऊन एक संरक्षण जाळे तयार केले पाहिजे.

संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता, एकात्मिक लष्करी कमांड, शस्त्रास्त्रांचे आधुनिकीकरण, नवतंत्रज्ञानावर भर आणि लष्करी करार यावर भारत भर देतो आहे. भारताने ऑस्ट्रेलियाशी केलेला करार भारतीय आणि ऑस्ट्रेलियन लष्करी विमानांमध्ये हवेतल्या हवेत (एअर-टू-एअर) इंधन भरण्याशी संबंधित आहे. या करारामुळे दोन्ही देशांच्या विमान दलांच्या मारक क्षमतेत लक्षणीय वाढ होणे अपेक्षित आहे. जपानसोबत भारताने केलेला करार स्टेल्थ उपकरणांच्या संयुक्त उत्पादनाशी संबंधित आहे. स्टेल्थ तंत्रज्ञानालाच 'लो ऑब्झर्व्हेबल टेक्नॉलॉजी' असेही म्हणतात. आपण भक्ष्याच्या नजरेला पडू नये म्हणून शिकारी काही क्लृप्त्या लढवतो; तसाच हा प्रकार आहे. जपानने हे तंत्रज्ञान विकसित करून ते आपल्या युद्धनौकांसाठी वापरण्यास प्रारंभ केलेला आहे. हे तंत्रज्ञान भारताला जपानसोबत केलेल्या करारान्वये उपलब्ध होईल. आता भारतीय युद्धनौका शत्रूच्या नजरेला न पडल्यामुळे त्यांची मारक क्षमता भरपूर वाढणार आहे.

प्रादेशिक वाद मनगटाच्या जोरावर सोडविण्यावर आताआतापर्यंत चीनचा भर होता. हा सरळ सरळ दंडेलीचा प्रकार होता. दुसऱ्या देशात पाच-पन्नास सैनिक घुसवायचे, फारच आरडाओरड झाली तर त्यातले काही मागे घ्यायचे आणि उरलेले तिथेच ठेवून आपण वाटाघाटीस तयार आहोत, असा साळसूदपणाचा आव आणायचा, हा चीनचा आजवरचा खाक्या राहिलेला आहे. पण आक्रमित देश आता सावध झाले आहेत. ते चीनविरुद्ध एकवटण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. आपली सैनिकी शक्ती वाढविण्याच्या प्रयत्नात दिसू लागले आहेत तर चतुर चीनने इकडेही लक्ष ठेवत लष्करी तयारीवरचा आपला खर्च सतत वाढता ठेवला आहे. आजच्या जगात 'बळी तो कान पिळी' हा नियम चालतो. कुणाची बाजू कायदेशीरदृष्ट्या अधिक मजबूत आहे, याला तेवढे महत्त्व मिळत नसते. आज अमेरिका सर्वच बाबतीत चीनच्या पुढे आहे, हे नक्की असले तरी चीन आपली कमतरता दिवसेंदिवस कमी कमी करीत चालला आहे, हेही खरे आहे. शिवाय असे की, अमेरिकेला फक्त चीनलाच आवरावयाचे आहे असे नाही. तशीच गरज निर्माण झाली तर रशिया, उत्तर कोरिया, इराण यांच्या बंदोबस्ताची जबाबदारीही मुख्यत: अमेरिकेवरच येऊन पडणार आहे. चीनचे तसे नाही. तो फक्त अमेरिकेवरच लक्ष ठेवून आहे तसेच चीनचे सामर्थ्य अमेरिकेसारखे जगभर विखुरलेले नाही. अशा परिस्थितीत भारतावर स्वत:शिवाय इतरांचीही काळजी करण्याची वेळ येऊ शकते. भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांची क्वाड संघटना आणि नुकतेच झालेले दोन करार पाहता या दृष्टीने भारताचे विद्यमान राजकर्ते पुरेसे जागृत आहेत, हे लक्षात येते.

९४२२८०४४३०

## वेध

प्रदीप वायचळ

# मानसिक समस्या विवेकाने हाताळण्याची गरज

जेव्हा मनाचा विचार मनात येतो, तेव्हा बहिणाबाईंची ती कविता आठवते. त्यांनी केवळ नऊ कडव्यांमध्ये मनाला वर्णिलेले आहे. शेवटी त्या म्हणतात 'देवा आसं कसं मन, आसं कसं रे घडलं'. तसं पाहता या मनाचा विचार अगदी वेदकालीन ऋषिमुनींपासून अलिकडच्या ज्ञानेश्वर, तुकाराम संतांनीही केलेला आहे. आधुनिक मानसशास्त्र केवळ शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी उदय पावले आहे. वर्तणूक, संज्ञानात्मक, मानवतावादी, मनोविश्लेषणात्मक आणि जैविक असे अनेक वेगळे प्रवाह या शास्त्राने अनुभवले. त्यात अलिकडे भर पडली आहे, ती म्हणजे विवेकनिष्ठ मानसशास्त्राची. जेव्हा हे शास्त्र अल्बर्ट एलिस यांनी मांडलं तेव्हा त्यांना विरोध झाला परंतु आता ही शाखा त्यातील मर्यादांसहित थोडी स्थिरस्थावर होते आहे. अनेक जण याचा वापर त्यांच्या मानसशास्त्रीय समस्या हाताळण्यासाठी करतात. काय आहे अल्बर्ट एलिसची विवेकनिष्ठ मानसोपचार पद्धती, हे आपण पाहू.

याचे मुख्य तत्त्व म्हणजे घडणारी घटना आणि त्याला आपल्याकडून भावना, विचार किंवा कृतीतून दिला जाणारा प्रतिसाद यांच्यामध्ये आपला दृष्टिकोन असतो. म्हणजे एकच घटना अनेक जण अनुभवतात, तेव्हा प्रत्येकाचा प्रतिसाद वेगवेगळा असतो. आणि त्याला कारण म्हणजे त्यांचा त्या समस्येविषयीचा किंवा सामान्य आयुष्य विषयीचा दृष्टिकोन! दोन सारख्याच बुद्धिमत्तेची मुले जेव्हा शिष्यवृत्तीच्या परीक्षेला बसतात आणि दोघांचाही नंबर येत नाही, तेव्हा त्या दोघांच्या पालकांची प्रतिक्रिया ही वेगवेगळी असू शकते. ते दृष्टिकोन कधी अविवेकी असतात तर कधी विवेकी असतात. आता ते कसे ओळखायचे? विवेकी दृष्टिकोन वस्तुनिष्ठ, तर्कनिष्ठ आणि आपल्याला हितकारक असतात. म्हणजे समजा मी कुठे चाललेलो आहे आणि माझी बस रद्द झाली आहे अशा वेळेला ज्याचा अविवेकी दृष्टिकोन आहे तो म्हणतो, ''मी जातो तेव्हाच बस रद्द होते, माझ्याच बाबतीत असं होतं, हे बस सर्व्हिसवाले सगळे कामचुकार आहेत.'' विवेकनिष्ठ माणूस बस रद्द झाल्यामुळे नाराज होतो परंतु आता काय करता येईल याचा विचार करतो. जसे की सर्वांना घेऊन बस कंट्रोलरकडे जाऊन काय झाले आहे याची चौकशी करणे, आणखी कुठली बस सोडता येते का हे पाहणे, कुठल्या वेगळ्या रूटवरून जाऊन आपल्या इच्छित स्थळी पोहोचता येते का हे पाहणे, वगैरे. म्हणजे आपण अविवेकी दृष्टिकोनामध्ये एखाद्या घटनेचे भयंकरीकरण करून टाकतो. विवेकनिष्ठ विचार पद्धतीमध्ये आपल्या दृष्टिकोनामधील अविवेकीपणा शोधून, त्याची छाननी, त्याचे विश्लेषण करून त्याचे रूपांतर विवेकीपणामध्ये केले जाते.

विवेकनिष्ठ विचार पद्धतीला एबीसीडीई थिअरी असेही म्हणतात. त्याचे कारण पुढे सापडेल. घडणाऱ्या घटना (A-Actuating Event) आणि आपल्याकडून दिला जाणारा प्रतिसाद (C-Consequence) याच्यामध्ये आपला दृष्टिकोन (B-Belief) आहे हे आपल्याला कधी कधी लक्षात येत नाही. एखाद्या घडणाऱ्या घटनेला लगेच आपला प्रतिसाद मिळतो. त्याच्या मागचा आपला दृष्टिकोन काय होता आणि तो आपल्याला नियंत्रित करता आला असता हे आपल्याला कळत नाही. म्हणजे मला कुत्र्याची भीती वाटत असेल तर कुत्रा बघितल्यावर लगेच मी तिथून पळायचा प्रयत्न करतो. कुत्रा दृष्टीस पडणे आणि एकदम भीती वाटून मी गर्भगळीत होणे याच्यामध्ये एक दृष्टिकोन आहे. तो समजण्यासाठी थोडे कष्ट घ्यायला लागतात आणि नंतर त्याच्यामध्ये बदल करण्यासही कष्ट लागतात. याला Disputing (D) म्हणतात. त्याद्वारे आपल्या दृष्टिकोनामध्ये योग्य ते बदल (E-Effective Change) होऊन समस्याचे निराकरण होऊ शकते. यासाठी अनेक वेगवेगळी तंत्रे विकसित केलेली आहेत. त्यातील मुख्य तंत्र म्हणजे सॉक्रेटिस प्रश्न पद्धती. त्यात आपण प्रश्न विचारून अविवेकी दृष्टिकोनातला फोलपणा जाणून घेतो आणि विवेकी विचाराकडे वाटचाल करतो. अविवेकी विचारामध्ये 'च' येतो. मला एखादी नोकरी हवी असते. परंतु नोकरी मिळालीच पाहिजे असा जेव्हा आपण 'च' जोडतो, तेव्हा आपण परिस्थिती बिकट बनवतो.

सामान्यतः आपल्या आयुष्यात येणाऱ्या अडचणी आपण या पद्धतीने सोडवू शकतो. माझा अनुभव असा आहे की सामान्य दृष्टिकोन विवेकी ठेवण्यासाठी आपण प्राचीन ग्रंथाचा, संत वाङ्मयाचा आधार घेऊ शकतो आणि तरीही आपल्याला एखाद्या अवघड प्रसंगाला तोंड द्यायला लागलो की जिथे दृष्टिकोन विवेकी राहत नाही, तिथे आपण विवेकनिष्ठ विचार पद्धतीचा वापर करू शकतो.

९८२०४३१४८२

(लेखक गुरुजी एज्युकेशन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आहेत.)

## दखल

विजय पांढरीपांडे

# अशा आत्महत्यांपासून धडा घेतला पाहिजे

बंगळुरू येथील अभियंता अतुल सुभाष या तरुणाची आत्महत्या जितकी चिंताजनक, त्याहीपेक्षा त्याने मृत्यूपूर्वी केलेला व्हिडीओ गंभीर अन् विचार करण्यालायक आहे. महिलांवरील अत्याचाराची सर्व क्षेत्रांकडून ताबडतोब दखल घेतली जाते. त्याकडे विशेष सहानुभूतीने पाहिले जाते. पण गेल्या काही वर्षांत महिलांकडून पुरुषावर होणाऱ्या अत्याचाराची, सूड भावनेची, बदला घेण्याची प्रकरणे वाढली आहेत. महिलांना पोलिसांकडून म्हणा किंवा कायद्याने न्यायालयाकडून म्हणा विशेष महत्त्व मिळत असल्याने, त्यांच्याकडे सॉफ्ट कॉर्नरने बघण्याची समाजाची भूमिका असल्याने अनेक प्रकरणांमध्ये पुरुषांवर अप्रत्यक्षपणे अन्याय होतो. अतुल सुभाषच्या प्रकरणामध्ये तर त्याची बायको, सासू एवढेच नव्हे, तर ज्या कोर्टात त्याची केस चालू आहे, त्या कोर्टातील महिला न्यायाधीश यांचाही छळ केलेल्या महिला वर्गात समावेश आहे.

या युगात शिक्षण घेतलेल्या तरुणी सक्षम झाल्या आहेत. त्यांच्या आशा-अपेक्षा वाढल्या आहेत. त्यांनाही त्यांची स्वतंत्र स्पेस हवी आहे. त्यांच्या स्वातंत्र्याच्या वेगळ्या व्याख्या आहेत. पूर्वीसारख्या त्या शरणागत नाहीत. पुरुषावर अवलंबून नाहीत. आजकालच्या मुलीची लग्न संबंधावेळची अपेक्षांची यादी बघितली तरी त्यांच्या बदललेल्या दृष्टिकोनाची सहज कल्पना येते. भावना, नाती जपणे याला महत्त्व राहिले नाही. कोरडेपणा आला आहे. स्वार्थ बोकाळला आहे. मटेरियलिजम वाढला आहे.

सर्वच नाही पण काही प्रकरणांमध्ये बाहेरून येणाऱ्या मुलीला नवऱ्याकडची नाती जपणे, सासर आपलेच समजणे हा भाव राहिलेला नाही. लग्न झाले तरी सासरी विरघळण्याऐवजी मुली माहेरचीच नाती गोंजारताना दिसतात. काही घरी तर माहेरच्या लेकीच्या संसारातील लुडबूड काही केल्या थांबत नाही. त्यातूनच संघर्षाच्या ठिणग्या पडतात. नवऱ्याच्या भावना जपण्यापेक्षा मुलीला लग्न झाल्यावरही आई-बाप जास्त महत्त्वाचे वाटतात. नाळ काही केल्या तुटत नाही म्हणतात ती अशी!

लग्न होऊन इंग्लंड-अमेरिकेत गेलेल्या मुलीचे हिशेबदेखील असेच व्यवहारी स्वरूपाचे असतात. सगळे काही मोठमोठ्या पॅकेजसाठी अन् तिकडच्या ऐशोआरामी आयुष्यासाठी! सर्वच नाही, पण काही प्रकरणांत तर नवऱ्याला पूर्ण लुबाडून काडीमोड देणाऱ्या अन् न्यायालयाच्या माध्यमातून वर पोटगी, हिस्सा बळकावणाऱ्या लुटारू वृत्तीत बरीच वाढ झाली आहे. इथे मुलीला सावरण्याऐवजी, तिला खडे बोल सुनावण्याऐवजी तिचे आई-वडील तिलाच साथ देतात. यामुळे एकूणच सांसारिक, सामाजिक वातावरण पार गढूळ झाले आहे. सोशल फॅब्रिक कमजोर झाले आहे.



अभियंता अतुल सुभाषचे प्रकरण अत्यंत केविलवाणे, हृदयद्रावक आहे. त्याला आर्थिकदृष्ट्या तर लुबाडले गेलेच; पण त्याचा क्रूर मानसिक छळही झाला. त्यात महिला न्यायाधीश सामील असावी, याचे अजून नवल वाटते. स्त्रियांकडून अनेकदा पुरुषांचे इमोशनल ब्लॅकमेलिंग होते. रडून, आरडाओरडा करून स्वतःचे खरे करून दाखवण्याचा नाटकी प्रयोग त्यांना चांगला जमतो. यूट्युबवर अशाच स्त्रियांकडून केवळ पुरुषाच्या होणाऱ्या छळाच्या केसेस घेणाऱ्या वकील महिलेचा इंटरव्ह्यू उपलब्ध आहे. त्यावरून स्त्रिया कशा प्रकारे पुरुषांना गंडवतात, त्यांचा भयानक मानसिक छळ करतात, याची कल्पना येते. आपल्या साहित्यात, पुराणात, इतिहासात स्त्रियांची जी शालीन, मायाळू, प्रेमळ, दयाळू प्रतिमा उभी गेली आहे, तिला छेद देणाऱ्या घटनांची संख्या आजच्या समाजात दिसून येते. पूर्वी नाटक-चित्रपटात खलनायक असायचेच. ते अत्याचार करताना दाखवले जायचे. नायिकेचा शील भंग करताना दिसायचे. आता हे प्राण, प्रेम चोप्रा, सदाशिव अमरापूरकर टाईप कॅरेक्टर गायब झाले आहेत. टीव्हीवरील मालिकात तर यांची जागा स्त्रियांनी घेतली आहे. प्रत्येक मालिकेत एक-दोन स्त्री पात्रे खलवृत्तीच्या भूमिका बजावताना दिसतातच. त्या मानाने पुरुष खलनायक आजकाल फार कमी प्रमाणात दिसतात. आश्चर्य म्हणजे हे स्त्री खलपात्र रंगविणाऱ्या लेखिका, दिग्दर्शिका, संवाद लेखिका स्त्रियाच असतात. बदललेल्या सामाजिक मानसिकतेचे, कुप्रवृत्तीचे हे जिवंत उदाहरण आहे.

वाढता चंगळवाद, त्यातून घरातील प्रत्येक घटकाला मिळालेले मुक्त स्वातंत्र्य अन् या स्वातंत्र्याचा दुरुपयोग या सर्वाला कारणीभूत आहे. पूर्वी आपल्याकडेच नव्हे, तर जागतिक पातळीवर स्त्रियांची गळचेपी व्हायची. त्यांना समाजात नेहमीच दुय्यम स्थान दिले जायचे. शिक्षणापासून त्यांना वंचित ठेवले गेले. विधवांची अवहेलना झाली. हे सगळे निश्चितच निषेधार्ह होते, यात दुमत नाही. अनेक कादंबऱ्यांतून, नाटकातून, सामाजिक चळवळीतून स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली गेलेली आपण पाहतो. परिणामस्वरूप गेल्या सात-आठ दशकात एकूणच जागतिक पातळीवर परिस्थिती पार बदलली. स्त्रियांसाठी खास कायदे, सोयी-सवलती झाल्या. प्रत्येक क्षेत्र त्यांच्यासाठी खुले झाले. आता तर असे कोणतेही क्षेत्र राहिले नाही, जिथे स्त्रियांना प्रवेश नाही. त्यामुळे त्यांचे बौद्धिक, शारीरिक सामर्थ्य दाखविण्याची संधी त्यांना मिळाली, हेही तितकेच खरे.

मिळालेले स्वातंत्र्य आपण किती जबाबदारीने सांभाळतो, उपयोगात आणतो यावर बरेच काही अवलंबून असते. संसारात नवरा-बायको दोघांनीही परस्परांना सन्मानाने वागविले, समजून घेतले तर अर्धेअधिक प्रश्न सुटतील. प्रश्न अहंकाराचा असतो. माझेच बरोबर या अट्टहासाचा असतो. दुसऱ्या पार्टनरला कमी लेखण्याचा असतो. मुख्य म्हणजे आजकालच्या धकाधकीच्या जीवनात संवाद कमी झाला आहे. दोघांनी एकत्र बसून, प्रसंगी वाडवडिलांचा सल्ला घेऊन अनेक प्रश्न सहज सुटू शकतात. पण आपण आपला हेका पुढे रेटत नेण्याचेच धोरण ठेवले तर मात्र संघर्षाच्या ठिणग्या उडून आग लागते. त्यात दोघांच्याही आयुष्याची राख होते. अतुल सुभाषच्या बाबतीत तेच झाले अन् तिला साथ देणाऱ्या स्त्रियांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या त्याने केली. आता तरी अशा प्रकरणांकडे बघण्याचा समाजाचा अन् न्यायालयाचा दृष्टिकोन बदलेल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. तशीही न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी आता उघडली आहे. न्यायालयाच्या खंडपीठात सर्व न्यायाधीशांचे अधिकार समान असतात. सर्वांचा अधिकार समान असतो. संसाराच्या बाबतीत नवरा-बायको समान पातळीवर जगले, वागले तर बरेच प्रश्न सहज सुटतील. घरातील सर्वांचे जगणे अधिक सुसह्य, सुंदर होईल. अशा घटनांपासून आपण सर्वांनीच धडा घेतला पाहिजे.

७६५९०८४५५५

### नायलॉन मांजावर बंदी असल्यावरही...

नायलॉन मांजा इतक्या प्रमाणात जप्त केला, तितका साठा पकडला अशा आशयाच्या बातम्या वृत्तपत्रांतून अलिकडे वाचायला मिळतात त्या मकरसंक्रांतीचा दिवस जवळ येण्याच्या काही दिवस आधी. माणसांना आणि आकाशात मुक्त संचार करणाऱ्या पक्ष्यांनाही जायबंदी करणाऱ्या या जीवघेण्या नायलॉन' मांजावर बंदी असताना तो मोठ्या शहरात तसेच लहान गावांमध्ये येतोच कसा? आमचे पर्यावरणप्रेमी मित्र 'फटाक्याच्या' धुराळ्याने प्रदूषणात वाढ होते म्हणतात तर 'पीओपी' मूर्तींमुळेही पर्यावरण समतोल साधणे कठीण असल्याचे बोलतात, पण नायलॉन मांजाविषयी ते तसे फारसे उत्साही वा सक्रिय दिसत नाही आणि जनजागृती हवी तशी होत नाही.



या नायलॉन मांजाची पोत अतिशय बारीक असते. शिवाय त्याच्या रंगामुळे तो वाहनचालकांना पटकन दिसत नाही. तो ओढल्यावर ताणला जातो व तुटता तुटत नाही. दरवर्षी मांजाच्या या सर्रास वापरामुळे कितीतरी नागरिक जखमी, जायबंदी होतात तर काहींच्या मानाही कापल्या जातात, पक्ष्यांचे बळी जातात, वीजपुरवठा अनेक वेळा खंडित होतो. त्यामुळे सार्वजनिक सेवा ठप्प पडतात. इतक्या घातक नायलॉन मांजावर कायद्याने बंदी घातल्यानंतरही तो लपूनछपून विकला जातो. यावरून प्रशासन या बाबतीत किती 'दक्ष' आहे तेच दिसून येते.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### राजकारण शुद्धीकरणाची नांदी?

काय नियतीचा खेळ आहे बघा! एके काळी महागड्या मोठ्या गाडीत फिरणारे, कमरेला पिस्तूल, गळ्यात सोन्याच्या लगडी, हातात सोन्याचे कडे आणि शुभ्र पांढरे कडक इस्त्रीचे कपडे घालून आपल्या 'आका'च्या भोवती पिंगा घालणारे तथाकथित समाजसेवक अटक वाचविण्यासाठी, पूर्वी मंदिराचा उंबरठा न ओलांडलेले बदमाश जेव्हा गिरनारसारख्या जागृत मंदिराचा आश्रय घेतात तेव्हा तळपायाची आग डोक्यात जाते. यांना आता देव आठवला का? पैशासाठी एखाद्याचा निर्घृणपणे खून करून सर्व कुटुंब देशोधडीला लावणाऱ्या या राक्षसांना आणि त्यांना संरक्षण देणाऱ्या 'अण्णा'ना तुरुंगात डांबले पाहिजे.

उजळ माथ्याने नेते म्हणून फिरणारे गुंड प्रत्येक लहान मोठ्या शहरात तयार झाले आहेत. स्थानिक पोलिसांशी हात मिळवून, काळा पैसा आणि दहशत दाखवून अमाप अवैध कृत्ये बेमालूमपणे सुरू आहेत. गृहमंत्र्यांनी आता कोणावरही दयामाया न दाखविता या दोषी राजकारण्यांना जेलची हवा खायला पाठवायलाच पाहिजे. ही नामी संधी समोरून चालून आली आहे. तपास अधिकाऱ्याचा सुद्धा रेकॉर्ड तपासून नेमणूक केल्यास अनेक लागेबांधे असलेली प्रकरणे बाहेर येतील. गृहमंत्र्यांनी या प्रकरणात जातीने लक्ष घालून अपराध्याना कठोर शिक्षा होईल असे बघावे. या मंडळींनी त्यांच्या राजवटीत अशा गुंडाना हाताशी धरून दहशतीखाली राज्य केले आहे. या एकाच प्रकरणाच्या प्रामाणिक तपासातून अनेक प्रकरणे बाहेर येतील. भाजपा सरकारने जरी यांचा पाठिंबा घेतला असला तरी उपकार घेतले नाही नाही असे दाखवून दिले पाहिजे, म्हणजे पुढे कोणी सरकारला गृहीत धरणार नाही.

**संजय पाठक**/नागपूर

### सार्वजनिक ठिकाणी तरुण, तरुणींचे अश्लील चाळे

नरगुंदकर उद्यान, नेहरू नगर, खामला रोड इथे मागील काही महिन्यांपासून आजूबाजूच्या भागातून तरुण मुले-मुली येऊन अश्लील चाळे करतात. त्यांची मजल इथंपर्यंत पोहोचली आहे की उद्यानाबाहेर गाड्या लावून ही मुले सकाळ, दुपार, रात्री नको ती कृत्ये करतात. त्यांनी निर्लज्जपणाचा कळस गाठला आहे. वारंवार हाकलून पण पुन्हा तेच सुरू असते, कुठल्याही प्रकारचा धाक राहिला नाही. इतर वस्तीतून येऊन स्थानिकांना त्यांचा त्रास ही रोजचीच बाब झाली आहे. त्यांना हटकले तर तेच चढ्या आवाजात समोरच्याला गप्प करतात. संध्याकाळी लहान मुले, महिलांना तेथे जाणेही कठीण झाले आहे. त्यांच्या बेताल वागण्याचा कहर म्हणजे रोज पार्कमध्ये दारूच्या बाटल्या, सिगारेटची पाकिटे आढळतात. एकमेकांशी भांडण, वाद ही नेहमीचीच गोष्ट झाली आहे. बेशिस्तपणे वाहन लावतात. बरेच वेळा त्यांच्याकडून नागरिकांनाच धमकवण्यात येते. प्रशासनाने लवकरात लवकर यावर त्वरित कडक कारवाई करावी, अथवा एखादी अप्रिय घटना घडण्याची शक्यता आहे. या भागात भरपूर ज्येष्ठ नागरिक फेरफटका तसेच लहान मुले पार्कमध्ये खेळायला येतात. त्यांना या उपद्रवी मुलांचा त्रास होतो आहे. प्रशासनाने यावर वेळीच उपाय करावे, अशी अपेक्षा आहे.

**हृषीकेश देशपांडे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवाव्यात : आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

रामप्रसाद कंठाळे

**जिंतूर,/प्रतिनिधी-:** नागरिकांना लोककल्याणकारी योजनांचा तत्परतेने लाभ मिळावा यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजना परभणी जिल्ह्यात प्रभावीपणे राबवाव्यात, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत श्रीमती बोर्डीकर यांनी आज विविध विभागांचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीस जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, महानगर पालिका आयुक्त धैर्यशील जाधव, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे आदींसह आरोग्य, सार्वजनिक बांधकाम विभाग, वीज वितरण कंपनी, महिला व बालकल्याण, महाऊर्जा, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

श्रीमती बोर्डीकर यांनी आरोग्य, महिला व बालकल्याण, वीज वितरण, महाऊर्जा, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा आढावा घेतला. जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था अद्यावत करण्यासाठी निश्चितपणे प्रयत केला जाईल, असे सांगून श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी रुग्णसेवा जबाबदारीने करावी. रुग्णांना कुठल्याही प्रकारे त्रास होऊ देऊ नये. वेळेवर उपचार देण्याबरोबरच नागरिकांना आरोग्य विषयक योजनांचा प्राधान्याने लाभ द्यावा. सर्व रुणालय, आरोग्य केंद्र स्वच्छ ठेवावीत. त्याा ठिकाणी पाणी व शौचालयाची पुरेशी व्यवस्था करावी. दिव्यांग रुग्णांना वेळेत उपचार द्यावेत. जिल्ह्यात एकही बालक कुपोषित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. बालविवाह होणार नाहीत, याबाबत खबरदारी घ्यावी. एचएमपीव्ही विषाणुबाबत बोलताना त्याा म्हणाल्या की, सध्या चिंतेचे कारण नसले तरी आरोग्य यंत्रणेने दक्ष राहावे. नागरिकांनी घाबरुन जाऊ नये, मात्र पुरेशी काळजी घ्यावी. श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, वीज वितरण विषयक तक्रारींचे तात्काळ निराकरण करावे. शेतकऱ्यांना अखंडित वीज द्यावी. प्रधानमंत्री सूर्य घर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. प्रलंबित पाणी पुरवठ्याच्या योजना तातडीने मार्गी लावाव्यात. विशेषत: ग्रामीण भाग, तांडा वस्तींवर पाणी पुरवठा प्राधान्याने करावा. शाळा, अंगणवाडी यांना नळ कनेक्शनव्दारे पाणी द्यावे. प्रारंभी संबंधित विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी सादरीकरणाव्दारे सविस्तर माहिती दिली. जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी प्रशासन दक्ष असून विविध योजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल, असे सांगितले. बैठकीनंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्ह्यातील केकर जवळा ता. मानवत, उखळी ता. सोनपेठ, पेठशिवनी ता. पालम, असोला ता. परभणी, भोगाव ता. जिंतूर, लोहगाव ता. परभणी येथे नव्याने सुरु करण्यात येत असलेले प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या रुग्णवाहिकांचे श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून उद्धाटन करण्यात आले. तसेच टीबीमुक्त भारत अभियान या जनजागृतीपर वाहनालाही हिरवी झेंडी दाखविण्यात आली.

## बालयोगी श्री.सुरज बाबा जन्मदिन महोत्सव सोहळयास उपस्थित राहण्याचे आवाहन

**जिंतूर,/प्रतिनिधी:** तालुक्यातील सावंगी (भां) येथील बालयोगी श्री.सुरेश बाबा जन्मदिन महोत्सव सोहळा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दि.१२ जानेवारी २०२५ रविवार रोजी आयोजित केला आहे. तरी या जन्म दिन महोत्सव सोहळयास हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री.सुरज बाबा संस्थान पंचकमिटी सावंगी (भां.) यांच्या वतीने करण्यात आले आहे.



सविस्तर वृत्तांत असे की, जिंतूर तालुक्यातील सावंगी (भां) येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बालयोगी श्री.सुरज बाबा जन्मदिन महोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या सोहळ्यास प.पू. तपस्वी श्री योगानंद महाराज यांचे प्रवचन होणार आहे. मागील १८ वर्षापासून बालयोगी श्री.सुरज बाबा संस्थान शिवधाम सावंगी (भां) येथे दि.१२ जानेवारी रोजी हा जन्मदिन महोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडतो. दरम्यान याही वर्षी दि. १२ जानेवारी २०२५ रविवार रोजी बालयोगी श्री.सुरज बाबा जन्मदिन महोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. तत्पूर्वी दि. ११ जानेवारी शनिवार रोजी सायंकाळी ७ : ०० वाजल्यापासून बंजारा भजन जागरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली.



## संघटन पर्व निमित्ताने भारतीय जनता पक्षाच्यावतीने पूर्णेत सदस्यता नोंदणी अभियानास सुरुवात

**पूर्णा,/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टी पूर्णा शहराच्या वतीने आनंदनगर चौक येथे पक्षाच्या वतीने स्टॉल उभारून सदस्यता नोंदणी करण्यात आली.

प्रदेश भाजपाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात ५ जानेवारी २०२५ रोजी रस्त्याावर उतरून २५ लाख सभासद नोंदणीचे उद्देश ठेवण्यात आले होते. त्याा उपक्रमाचा भाग म्हणून पूर्णा शहरात नुकतेच सदस्यता नोंदणी करण्याचे आवाहन करून अनेकांची स्टॉलमध्ये ८८०००२०२४ या क्रमांकावर मिस कॉल करून नोंदणी करण्यात आली. तसेच ठिकठिकाणी भेटी देऊन नोदणी करण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमास डॉ. केदार खटिंग , अॅड. शिवप्रसाद सोनी, लक्ष्मीकांत कदम, नरहरी ढोणे, प्रशांत कापसे, बळीराम कदम, हनुमान अग्रवाल, विलास कदम, मधुकर मुळे, राम चापके, आनंद बनसोडे, डॉ.अजय ठाकूर, विश्वनाथ होळकर, विजय कराड, सुनील डुबेवार, विनय कराड, राम पुरी, गोविंद ठाकर, रोशन एकलारे अडी कार्यकर्ते पदाधिकारी यांच्यासह कार्यकर्त्यांची देखील मोठी उपस्थिती होती.

## मोबाईलमुळे भावी पिढी उध्दवस्त होण्याच्या उंबरठयावर- प्रा.डॉ.विनोद बाबर

**जिंतूर,/प्रतिनिधी-** मोबाईलच्या अतिवापरामुळे भावी पिढी उध्वस्त होते की काय अशी शंका निर्माण झाली आहे. पालकांनी वेळीच आपल्या पाल्यांना सावध केले नाही तर भविष्यामध्ये याचे गंभीर परिणाम सोसावे लागणार असल्याचे प्रतिपादन कीर्तनकार व व्याख्याते प्रा डॉ विनोद बाबर यांनी केले.



जिंतूर येथे तालुका प्रेस क्लब व व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर अतिरिक्त पोलीस अधीक्षक जीवन बेनिवाल, सुंदरलाल सावजी अर्बन कॉपरेटिव बँकेचे अध्यक्ष मुकुंद सावजी कळमकर, उद्योजक ब्रिजभाऊ तोष्णीवाल, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रभाकर वाघीकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवरकर, ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर, ह.भ.प संदीप भाई शर्मा महाराज, सुनील भोंबे पाटील, गोविंद थिटे पाटील, धरमचंद अच्छा, सुधीर शहाणे, सत्यानारायण शर्मा, वैद्यकीय अधीक्षक रविकिरण चाडगे, किरण वट्टमवार, रवी घुगे ,अरुण शहाणे, अॅड गोपाळ रोकडे, डॉ देवराव कराळे, देवेंद्र भुरे, व्हाईस ऑफ मीडिया जिल्हा अध्यक्ष गजानन देशमुख, प्रिया देशमुख, गजानन घुगे, सुनील तोष्णीवाल, मनोज राजोतीया आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना बाबर यांनी मोबाईल पासून दूर राहण्यासाठी पालकांनी मुलांना परावर्त करावे स्वतःमध्ये असणारा इगो कमी करावा याशिवाय जवळच्या माणसांनी चुका केल्या असतील तर त्याकडे दुर्लक्ष करून जीवन जगावे असा मौलिक सल्ला दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय चोरडिया यांनी केले. कार्यक्रमांमध्ये सन्मान पत्राचे वाचन अॅड.मनोज सारडा, पाहुण्यांचा परिचय प्रा पांडुरंग निळे यांनी करून दिला. दरम्यान या कार्यक्रमास भागवत चव्हाण, मंचकराव देशमुख संदीप माहुरकर, सचिन रायपत्रीवार, दिलीप माघाडे, राम रेघाटे, प्रशांत मुळी, अतुल जगताप, राहुल वावळे, नितीन बंगाळे, नितीन रोकडे, दिलीप देवकर, शंकर जाधव, नागनाथ दाभाडे, संतोष तायडे, राजू गारकर, रामकिसन ठोंबरे, वैभव सोळंके, नेमिनाथ जैन, आबासाहेब जाधव, राजाभाऊ काळे, पद्माकर कौसडीकर यांनी परिश्रम घेतले.

ज्येष्ठ पत्रकार यांचा आगळावेगळा सन्मान ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर यांचा अमृत महोत्सव साजरा करताना चाळीस वर्षे त्यांनी पत्रकारिता केली त्यांचा आगळावेगळा सन्मान व्हाईस ऑफ मीडिया व जिंतूर तालुका प्रेस क्लबच्या वतीने करण्यात आला. यावेळी त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली संबळ वादक, भालदार, चोपदार, गुलाबाच्या पुष्पवृष्टी यामुळे नेत्रदीपक असा मराठमोळा सोहळा पार पडला.

विभागीय पातळीवर पुरस्कार वितरण दर्पण दिनाच्या औचित्या साधून दरवर्षी विभागीय पातळीवर देण्यात येणाऱ्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर सामाजिक वार्ता दर्पण पुरस्कार नामदेव खेडकर यांना तर आचार्य बाळशास्त्री जांभेकर विकास वार्ता पुरस्कार लोकमतचे वरिष्ठ संपादक विकास राऊत यांना उपस्थितांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



## सोनपेठातील प्रथमच विराज हॉस्पिटलमध्ये प्रसुती व शस्त्रक्रिया

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** शहरातील ईंडेन गॅस एजन्सी समोरील डॉ. चव्हाण यांच्या विराज हॉस्पिटल चे उद्घाटन रविवारी आमदार राजेश विटेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष चंद्रकांत राठोड, माजी नगरसेवक श्रीकांत विटेकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुभाष पवार, स्त्रिरोग तज्ज्ञ डॉ.सिद्देश्वर हालगे, सपोनी चव्हाण, बाजार समितीचे सभापती दसरथ पाटील सुर्यवंशी, उत्तमराव जाधव, पत्रकार शिवमल्हार वाघे, बाबासाहेब गर्जे, सिद्धेश्वर गिरी, आशिष मुंडे, सरपंच मारोती चव्हाण, पंडित चव्हाण, शिवसेना नेते जनार्दन झिरपे यांची उपस्थिती होती.

वर्षानुवर्षे अविकसित राहीलेल्या सोनपेठ तालुक्यात आता विविध प्रकारच्या सोयीसुविधा होतांना दिसत आहेत. त्याातच डॉ.रोहिणी चव्हाण व डॉ.भारत चव्हाण यांनी विराज मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची सुरुवात करुन देत माफक दरात व वेळेत तालुक्यातील रुग्णांना सोय करुन दिली आहे. पुर्वी तालुक्यातील नागरीकांना विविध शस्त्रक्रिया व खाजगी प्रसुती, कठीण व गुंतागुंतीच्या प्रसुतीसाठीच्या शस्त्रक्रिया, तसेच नवजात शिशू यांच्या अतिदक्षता विभाग साठी नागरीकांना परळी, परभणी, अंबेजोगाई येथे जावे लागत होते. त्याामुळे रुग्णाला वेळेत उपचार मिळत नव्हते.

परंतू आता हे सर्वच उपचार विराज मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मिळणार आहेत. यासाठी शैल्यचिकीत्सक डॉ. सोमनाथ मुंडे, स्त्रीरोग तज्ञ डॉ. अजय लोकडे, बालरोगतज्ज्ञ डॉ. भारत चव्हाण आणि जनरल फिजिशियन डॉ.रोहिणी चव्हाण यांची टिम २४ तास कार्यरत असणार असल्याचे यावेळी डॉ. भारत चव्हाण यांनी सांगितले. याप्रसंगी शहरासह तालुक्यातील अनेक नागरिक उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### हिंदू समाजाने धर्म संस्कृतीशी एकनिष्ठ होणे गरजेचे- सचिन पाटील

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतातील संपूर्ण हिंदू समाजाला अर्जुन विषाद योगाने ग्रासले आहे. त्यांच्यात स्वतःच्या धर्म संस्कृतीबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण करण्यात पाश्चात्या लोक यशस्वी झाले आहेत. उदारमतवाद आणि पुरोगामीत्व यांच्या नावाखाली हिंदू लोक धर्म संस्कृतीची निंदानालस्ती करीत आहेत. हे सारे थांबवून हिंदू समाजाने स्वतःच्या धर्म संस्कृतीशी एकनिष्ठ होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन इतिहास संशोधक व अभ्यासक सचिन पाटील यांनी केले. प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी कै. बकुळाबाई मुकुंदराव पेडगावकर यांच्या स्मरणार्थ कै. स्वा. सै. श्रीमती शांताबाई देशपांडे पेडगावकर यांच्यातर्फे देण्यात येणारा लोपामुद्रा पुरस्कार यावर्षी सोलापूर येथील समाजसेवक आतिश लक्ष्मण शिरसाट यांना रविवार ५ जानेवारी रोजी येथील गणेश वाचनालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, मानपत्र व पाच हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्काराचे हे चौदावे वर्ष आहे. लोपामुद्रा पुरस्कार प्राप्त झालेले अतिश सिरसाट सोलापूर येथे आपल्या 'संभव' या संस्थेच्या माध्यमातून मनोरुग्ण झालेल्या व्यक्तींवर उपचार करून पुनर्वसन करण्यासाठी मदत करतात. त्यांच्या या कार्याची दखल घेवूनच त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### दर्पणकार जांभेकर यांना पत्रकार भवनात अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी :** मराठी पत्रकारितेचे पितामह दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना दर्पण दिनानिमित्त सोमवार ६ जानेवारी रोजी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरातील पत्रकार भवनात पत्रकार बांधवांतर्फे भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

सकाळी १० वाजता आयोजित केलेल्या कार्यक्रमात दर्पणकार जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करुन भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. पत्रकार भवन ट्रस्टचे अध्यक्ष विजय जोशी हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार श्रीमती हेमा रसाळ, ज्येष्ठ पत्रकार संतोष धारासूरकर, ज्येष्ठ पत्रकार दिलीप माने, ज्येष्ठ पत्रकार आसाराम लोमटे, ज्येष्ठ पत्रकार रमाकांत कुलकर्णी, पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, प्रविण देशपांडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रभू दिपके, कार्याध्यक्ष लक्ष्मण मानोलीकर, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत डहाळे, अनिल दाभाडकर, माणिक शिंदे, विजय कुलकर्णी, रामचंद्र कोठेकर, प्रविण चौधरी, आनंद पोहनेरकर, प्रमोद बल्लाळ, चक्रधर मोरे आदी उपस्थित होते. यावेळी श्री. जोशी यांनी आपल्या भाषणातून पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. सामाजिक बांधिलकीचे ध्येय ठेवूनच पत्रकार हे सातत्याने समाजजागृतीचे काम इनामे-इतबारे करीत आले आहेत. पत्रकारिता म्हणजे एक व्रत आहे, मोठी सेवा आहे. आपल्या लेखनीच्या माध्यमातून समाजातील सर्वच क्षेत्राती विशेषतः तळागाळातील शेवटच्या व्यक्तीच्या व्यथांची मांडणी असो, अन्याय, अत्याचाराच्या प्रकरणात परखडपणे दोष दाखविण्याचे काम पत्रकार करत आला आहे, असे ते म्हणाले. पत्रकारिता क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत. वेगवेगळ्या माध्यमातून पत्रकार समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचण्याचे काम करीत आहेत. या क्षेत्रातील हे बदल निश्चितच स्वागतार्ह आहेत, त्यातून पत्रकारांची जबाबदारीसुध्दा वाढली आहे, असे ते म्हणाले. यावेळी धारासूरकर यांची प्रास्ताविक केले, नाईवाडे यांनी आभार मानले.

### जमीन वापरातील फेरबदलाचे ठराव जाहीर करा- स्वराज्य इंडियाच्या जिल्हा शाखेद्वारे मागणी


**परभणी,/प्रतिनिधी :** १ सप्टेंबर २०२२ पासून ते आजपर्यंत म्हणजे प्रशासक यांच्या कालावधीतील महापालिकेच्या जमीन वापरामध्ये केलेल्या फेर बदलाचे ठराव महापालिका प्रशासनाने जाहीर करावेत, अशी मागणी स्वराज्य इंडिया जिल्हा शाखेचे जिल्हाध्यक्ष गोविंद गिरी यांनी केली आहे.

महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक धैर्यशिल जाधव यांना स्वराज्य इंडियाचे जिल्हाध्यक्ष गोविंद गिरी यांनी सोमवारी एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, १ सप्टेंबर २०२२ ते आजच्या तारखेपर्यंत म्हणजे आयुक्त तथा प्रशासक यांच्या कार्यकाळात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये जमिनीच्या वापरामध्ये विकास फेरबदल करण्यावर व विकास निर्बंध मान्यतेबाबत मंजूर करण्यात आलेल्या जमिनीबद्दल खुलासा करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

महापालिकेच्या अत्यारीत राखीव जमिनी भूखंड यावर करण्यात येत असलेल्या विकास काम फेरबदल व विकास कामावर आणलेले निर्बंध हा विषय थेट शहरातील नागरिकांशी संबंधित असल्यामुळे, रोजगार निर्मिती व महानगरपालिकेच्या विकासाशी संबंधित असल्यामुळे प्रस्तावित फेरबदलाबाबत दर्शवणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनसाठी, माहितीसाठी महापालिका मुख्य कार्यालय, नगरचना विभाग, स्थायिक सहाय्यक आयुक्त अ-ब-क प्रभाग समिती कार्यालयातील दर्शनी भागात लावावा, तसेच या संबंधित आलेल्या हरकती, सूचना इत्यादींची माहिती तात्काळ सार्वजनिक करण्यात यावी, अशी अपेक्षा गिरी यांनी व्यक्त केली.

### मानवतमध्ये कापसास प्रतिक्वींटल ७३०० रुपये भाव

**मानवत,/प्रतिनिधी :** मानवत येथील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डात सोमवार ६ जानेवारी रोजी कापसाला सर्वाधिक म्हणजे ७ हजार ३०० रुपये प्रतिक्विंटल एवढा भाव मिळाला.



येथील मार्केट यार्डात कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कापूस विक्रीस आणण्यासाठी स्पर्धा सुरु केली आहे. विशेषतः कापसास दिवसेंदिवस चढ्या भावाने भाव मिळतो आहे, त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी कमालीचे सुखावले आहेत. सोमवारी येथील मार्केट यार्डात कापूस उत्पादकांना ७ हजार ३०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुणालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेसाठी खा.सोनवणेंनी घेतली पोलीस महासंचालकांची भेट

**खासदारांनी नोंदविली आभ्यासपूर्ण निरीक्षणे**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जानेवारी**



मागील काही वर्षात बीड जिल्ह्यात गुंडगिरी वाढलेली असून यास राजकिय नेत्यांचा वरदहस्त आहे. यामुळे जिल्ह्यात अनेक अवैध धंदे चालत असून याच अवैध धंद्यातून पैसा येतो, तथापी, याच पैशातून गुंडाराज फोफावत असून जिल्ह्यातील गुंडाराजचा खात्मा करावा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी राज्याचे पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) संजय सक्सेना यांची भेट घेवून केली. यावेळी सक्सेना यांनी कोणाचीही हयगय केली जाणार नाही, असे म्हटले.

सक्सेना यांना दिलेल्या निवेदनात बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था प्रभावित करणाऱ्या गंभीर मुद्यांवर आभ्यासपूर्ण निरीक्षणे निदर्शनास आणून दिली. यात पोलीस ठाण्याच्या स्तरावर राजकीय हस्तक्षेप खूपच जास्त आहे, ज्यामुळे प्रभावी आणि निष्पक्ष पोलीसिंगला अडचणीत येतात. गावगुंड, जे अनेकदा प्रभावशाली राजकीय नेत्यांच्या पाठिंब्यावर कार्यरत असतात, त्यांनी पोलीस ठाण्यांशी संगनमत करून जमीन बळकावणे, वाळू उत्खनन, बेकायदेशीर दारू उत्पादन, आणि जुगार अड्डे अशा बेकायदेशीर क्रियांना चालना दिली आहे. गोदावरी नदी पट्ट्यात, विशेषत: गेवराई, माजलगाव, आणि परळी तालुक्यांमध्ये वाळू माफिया सक्रिय आहे. ज्याचा काळा पैशामध्ये वार्षिक उलाढाल कोट्यावधींची आहे. वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक मोठ्या गाड्या राजकीय नेत्यांच्या निकटवर्तीयांच्या नावे नोंदणीकृत आहेत. वाळू माफियांकडे मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, बेकायदेशीर शस्त्रे, बनावट नंबर प्लेट असलेल्या वाहने, आणि महसूल विभागाशी मजबूत संबंध आहेत. वाळू माफियांकडून वापरली जाणारी काही वाहने पोलीस कर्मचाऱ्यांच्या वित्तपुरवठ्यावर चालतात, अशी माहिती मिळते. कांही सरकारी अधिकारी, विशेषत: पोलीस व महसूल विभागाचे, वाळू माफियांशी संबंधित असून, त्यांना धाडीबाबत आगाऊ माहिती पुरवतात, ज्यामुळे कायद्याची अंमलबजावणी कमकुवत होते. अनेक पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी त्यांच्या नियुक्त्या राजकीय नेत्यांच्या शिफारसीवरून मिळवतात, ज्यामुळे अंमलबजावणीत पक्षपातीपणा होतो आणि पारदर्शकतेचा अभाव दिसतो. बीड जिल्ह्यातील बेकायदेशीर कृतींमुळे दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा काळा पैसा निर्माण होतो, ज्यामुळे भ्रष्टाचार अधिक वाढतो आणि प्रशासन कमकुवत होते.

वरील सर्व प्रकार गेल्या कांही वर्षात कांही विशिष्ठ लोकांच्या कृतिमुळे जिल्ह्याची प्रतिमा डागाळली जात आहे. उद्योजक जिल्ह्यामधे नवीन उद्योग उभारण्यास तयार होत नाहीत. परिणामी बेरोजगारी वाढत आहे व त्यातून तरुणांचा कल बेकायदेशीर कृत्याकडे वाढत आहे. जिल्ह्यातील कांही राजकीय नेते, कायदा अंमलबजावणी यंत्रणा आणि बेकायदेशीर कृत्य करणारे यांच्यातील साखळीवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.



बीड : यंदा चांगला पाऊस असल्याने गव्हाचा पेरा वाढला असून वातावरण चांगले असल्याने पिकही चांगले आहे.आता गहू ओंब्यात आला आहे. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)

# एमकेसीएलतर्फे १०वी बोर्ड परीक्षेसाठी स्मार्ट टिप्स कोर्स अगदी मोफत उपलब्ध-विठ्ठल पांचाळ

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.५ जानेवारी**



एमकेसीएल कडुन नेहमी विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे संगणकीय शिक्षण देण्यासाठी व विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जातात त्याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) तर्फे १० वी बोर्ड परीक्षेची तयारी करण्यासाठी स्मार्ट टिप्स कोर्स सुरू करण्यात आला आहे. हा कोर्स मोफत आहे, या कोर्समध्ये इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत, गणित, विज्ञान, इतिहास आणि भूगोल यांसारख्या विषयासाठी मॉडेल उत्तरपत्रिका, उत्तर लेखन कौशल्य, वेळेचे नियोजन आणि सरावासाठी मार्गदर्शन दिले जाते. स्मार्ट टिप्स कोर्स विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवण्यासाठी धोरणात्मक अंतर्दृष्टी व प्रभावी टिप्स प्रदान करतो. यामध्ये प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, उत्तरलेखनातील सामान्य चुका, आणि अभ्यासाच्या आधुनिक पद्धतींवर भर दिला आहे.

विद्यार्थ्यांनी या कोर्सचा लाभ घेण्यासाठी नजीकच्या एमएस- सीआयटी केंद्राशी संपर्क साधावा, अधिक माहितीसाठी व या कोर्स साठी प्रवेश घेण्यासाठी एमएस- सीआयटी केंद्रांवर त्वरित भेट द्यावी. असे आवाहन बीड जिल्ह्याचे एमकेसीएलचे जिल्हा समन्वयक श्री विठ्ठल पांचाळ यांनी केले आहे.

# गोकुळ शिशुवाटिकेत व नानाजी देशमुख विद्या मंदिरात भरला भाजी बाजार व आनंद नगरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जानेवारी**



दीनदयाल शोध संस्थान संचलित, गोकुळ शिशु वाटिकेत व नानाजी देशमुख विद्या मंदिरात भाजी बाजार व आनंद नगरी उत्साहात भरवण्यात आली.

सर्वप्रथम नानाजी देशमुख व दीनदयालजी उपाध्याय यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर ध्रुव गटाच्या मुलांनी भाज्यांची गर्दी टोपलीत झाली हे गाणं म्हणून आनंदनगरीची सुरुवात केली. आनंदनगरीसाठी वेगवेगळे स्टॉल लावण्यात आले. भाजी बाजार मध्ये मेथी, चुका,शेपू, कोथिंबीर, टोमॅटो, वांगी, कांदे व फ्रुट सॅलड होते. व आनंद नगरीमध्ये कुल्फी, दही धपाटे, साबुदाणा वडा, वडापाव, ढोकळा, इडली सांबर, पॉपकॉर्न, खारीमुरे इत्यादी ठेवण्यात आले. अशाप्रकारे विविध ३५ प्रकारचे स्टॉल लावून पालकांनी व विद्यार्थ्यांनी तसेच खरेदी करणाऱ्या शाळेच्या परिसरातील व शाळेतील ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे मा गंगाधरजी देशमुख सर पालक प्रतिनिधी उषाताई गुजर तसेच शाळेच्या सचिव डॉ सीमाताई जोशी व गोकुळ समिती सदस्य सुनंदाताई कुलकर्णी व नानाजी देशमुख विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका सौ अर्चनाताई मोराळे व गोकुळ शिशुवाटिका प्रमुख स्नेहलताई देशपांडे या उपस्थित होत्या. सूत्रसंचालन रत्नमाला सुरवसे व आभार क्रांती ताई पोरवाल यांनी केले.

# शिक्षण व क्रीडा या एका नाण्याच्या दोन बाजू-जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जानेवारी**



भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय,गेवराई येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य, रा.स्व.सं.पश्चिम क्षेत्र कार्य, सदस्य श्री हरीशजी कुलकर्णी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर तालुका क्रीडा अधिकारी श्री कालिदास होसूरकर तालुका क्रीडा सहाय्यक श्री राठोड माजी उपनगराध्यक्ष श्री राजेंद्रजी राक्षसभुवनकर भजन सम्राट ह.भ.प.तुळशीराम महाराज आतकरे स्था.नि.मं.अध्यक्ष प्रमोदजी कुलकर्णी उपाध्यक्ष राधेश्यामजी झंवर शालेय शिक्षण समिती अध्यक्ष अक्षयजी कुलकर्णी अर्थ समिती अध्यक्ष नितीनजी डोळे प्राथमिक मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी माध्यमिक मुख्याध्यापक श्री अमोल गोरकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. प्रसंगी प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री प्रदीप जोशी तर पद्य गायन श्री अमृत गोले यांनी केले उद्घाटन प्रसंगी भाषणात श्री अरविंद विद्यागर यांनी शैक्षणिक क्षेत्रात क्रीडा या प्रकाराचे अनन्यसाधारण महत्व आहे असे प्रतिपादन केले व संपन्न होत असलेल्या स्नेहसंमेलन कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या श्री तुळशीराम महाराज आतकरे यांनी अबिर गुलाल..या अभंगांने वातावरण मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमात बाल वर्गापासून ते इयत्ता दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी स्वतःमधील सुप्त गुणांचे सादरीकरण केले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची शालेय प्रवेशद्वार ते व्यासपीठा पर्यंतचा अश्र्वावरून केलेला प्रवेश कार्यक्रमाचे आकर्षण ठरले उद्घाटन सत्राचे सूत्रसंचलन श्रीम.सारिका रामदासी तर आभार श्रीम.संघनी वक्ते यांनी केले. विविध गुणदर्शन या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शालेय विद्यार्थी यशराज बर्गे,अमर आगलावे,अभिषेक दाभाडे,अपूर्वा दिक्षीत,पूजा जवंजाळ,अंजली होंडे तर उपस्थित मान्यवरांचे आभार श्रीम.रेखा मोटे यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक विद्यासभा संयोजक श्री चंद्रकांत घोलप यांच्या नियोजनात अभ्यासपूरक मंडळ प्रमुख व विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# किल्ले धारूर तालुक्याच्या विकास कामांवर प्रश्नचिन्ह आमदार सोळंके यांची खरखरीत टीका

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.५ जानेवारी**

३ जानेवारी २०२५ : पंचायत समिती किल्ले धारूर येथे माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत तालुक्यातील विकास कामांचा सखोल आढावा घेण्यात आला. या बैठकीत शिक्षण, आरोग्य,एकात्मिक बाल विकास,पंचायत राज,बांधकाम विभाग, पशुधन, जलजीवन मिशन, लघु पाटबंधारे आणि कृषी अशा विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते.



शिक्षण क्षेत्रात कमतरता:

बैठकीची सुरुवात शिक्षण विभागाच्या आढाव्याने झाली. गटशिक्षणाधिकारी श्री कोल्हे यांनी धारूर तालुक्यातील शासकीय आणि खाजगी शाळांची सविस्तर माहिती सादर केली. विशेषतः मुलींच्या वस्तीगृहासाठी स्पेशल पाईपलाईन प्रकल्पाबाबत त्यांनी उपस्थितांना माहिती दिली. मात्र, शाळांमध्ये शिक्षकांचा अभाव, आणि शैक्षणिक साहित्याचा अभाव अशा अनेक समस्यांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. आमदार सोळंके यांनी शिक्षण विभागाच्या सर्व पदाधिकारी आणि कर्मचारी यांना त्यांच्या कार्यस्थळी राहण्याचे निर्देश दिले.

आरोग्य सुविधांचा अभाव:

तालुका आरोग्य अधिकारी श्री लोमटे यांनी ग्रामीण रुग्णालयाच्या उद्दिष्टांची अपूर्णता याबाबत आपली चिंता व्यक्त केली. आमदार सोळंके यांनी जिल्हा चिकित्सक डॉक्टर थोरात यांना फोन करून याबाबत आवश्यक सूचना दिल्या.

पशुधन विभागातील दुर्लक्ष:

पशुधन विभागाच्या आढाव्यात धारूर तालुक्यातील ७१ गावांमधील पशुदवाखान्यांची माहिती सादर करण्यात आली. मात्र, अनेक गावांमध्ये पशुवैद्यकांचा अभाव, पशुखाद्य उपलब्धतेची समस्या आणि पशुसंवर्धनाबाबत शेतकऱ्यांना पुरेसे मार्गदर्शन न मिळणे यासारख्या समस्यांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

**जलजीवन मिशनमधील गंभीर दोष:**

जलजीवन मिशनच्या कामांचा आढावा घेताना अभियंता मॅडम यांनी ६४ कामांपैकी केवळ २ कामे पूर्ण झाल्याचे सांगितले. या विलंबावरून आमदार सोळंके यांनी नाराजी व्यक्त केली आणि संबंधित एजन्सीवर दंड लादण्याची शिफारस केली. यासोबतच, अनेक ठिकाणी कामे अपूर्ण असल्याचे, काही ठिकाणी पाणीपुरवठा नियमित नसल्याचे आणि काही ठिकाणी पाण्याची गुणवत्ताही प्रश्नार्थाखाली असल्याचे निदर्शनास आले.

अन्य विभाग:

बैठकीत पंचायती विभाग, कृषी विभाग आणि नरेगा विभागाच्या कार्याचाही सखोल आढावा घेण्यात आला. या सर्व विभागांमध्येही काही न काही कमतरता आढळून आल्या.

या आढावा बैठकीतून धारूर तालुक्यातील विकास कामांचा सखोल आढावा घेण्यात आला. मात्र, यावेळी अनेक विभागांमध्ये कामे अपूर्ण असल्याचे, अधिकाऱ्यांची उदासीनता असल्याचे आणि नागरिकांना आधारभूत सुविधा मिळत नसल्याचे स्पष्ट झाले. आमदार सोळंके यांनी संबंधित पंचायत समिती गट विकास अधिकारी यांना आणि अधिकाऱ्यांना तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत.

# अखिल भारतीय जायस्वाल सर्ववर्गीय महासभेच्या दहाव्या महाधिवेशनाचे ११ व १२ जाने रोजी अंबाजोगाईत आयोजन

## देशभरातील विविध मान्यवर या दहाव्या महा अधिवेशनात होणार सहभागी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ जानेवारी**

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे दहावे दोन दिवसीय राष्ट्रीय महाधिवेशन दि ११ व १२ जानेवारी दरम्यान अंबाजोगाई शहरात संपन्न होणार असल्याचे संयोजक राजकिशोर मोदी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. शहरातील मोदी लर्निंग सेंटर येथे हे दोन दिवशीय महाअधिवेशन संपन्न होणार असून या महाधिवेशनास देशभरातून विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या महा अधिवेशनात पहिल्या दिवशी (दि ११) रोजी महासभेची विशेष महाबैठक संपन्न होणार असून दि १२ रोजी महा अधिवेशन व नूतन अध्यक्षांची घोषणा व त्यांचा शपथविधी होणार आहे. यासाठी मा.ना. श्रीपाद नाईक, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री,भारत सरकार मा.ना. आशिष जायसवाल, राज्य मंत्री (महाराष्ट्र राज्य) खासदार डॉ. संजय जायसवाल, (पश्चिम चंपारण - बिहार) खासदार मनीष जायसवाल, (हजारीबाग लोकसभा) ना.डॉ. दिलीप कुमार जायसवाल, प्रदेश अध्यक्ष, भाजपा बिहार तथा सह राजस्व व भूमि सुधार मंत्री, बिहार, ना.श्री. रविन्द्र जायसवाल, राज्यमंत्री, स्वतंत्र प्रभार (उ.प्र) , माजी मंत्री श्रीमती अनुपमा जायसवाल (उ.प्र), आ. पवन जायसवाल, ढाका बिहार तथा माजी राष्ट्रीय अध्यक्ष अ. भा. युवा जायसवाल महासभा, आमदार प्रदीप जायसवाल, संभाजीनगर (महाराष्ट्र राज्य) आमदार रमेश जायसवाल (मुगलसराय, चंदोला),आ. नविन जायसवाल, हटीया (झारखंड) मा.आ विजय शिवहरे, (विधान परिषद सदस्य ,आगरा- फिरोजाबाद) यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दहाव्या दोन दिवसीय अधिवेशनाचा प्रारंभ शनिवार दि ११ रोजी दुपारी तीन वाजता राष्ट्रीय कार्यसमितीच्या विशेष सर्वसाधारण बैठकीने होईल. अखिल भारतीय जायसवाल महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न होऊन यामध्ये देशभरातील महासभेचे पदाधिकारी आपले विचार मांडतील. त्यानंतर संध्याकाळी सात वाजता अखिल भारतीय जायसवाल महिला महासभेची बैठक राष्ट्रीय महिला अध्यक्षा श्रीमती अनुपमा जायसवाल यांच्या अध्यक्षतेखाली तर रात्री आठ वाजता युवा अध्यक्ष राजा चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली युवा महासभेची बैठक संपन्न होईल.

दुसऱ्या दिवशी म्हणजेच रविवार दि १२ रोजी सकाळी दहा वाजता मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन भगवान सहस्त्रार्जुन यांच्या प्रतिमेचे पूजन तथा दीपप्रज्वलन झाल्यानंतर प्रथमतः भव्य रक्तदान शिबीर या सामाजिक उपक्रमाने या महाधिवेशनाची सुरुवात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होईल. यावेळी देशभरात उल्लेखनीय समाजकार्य करणाऱ्या विविध मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यानंतर जायसवाल महासभेचे मावळते राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल हे आगामी २०२५-२०२८ या काळासाठी अखिल भारतीय जायसवाल महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून राजकिशोर मोदी यांच्या नावाची सर्वानुमते घोषणा करतील. त्यानंतर लगेचच नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी त्याचबरोबर महासभेचेच्या अन्य पदाधिकाऱ्यांचा मुख्य अतिथी द्वारे शपथविधी संपन्न होईल. नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी हे कुठलेही हार,तुरे व सत्कार न घेता समाजातील होतकरू शालेय विद्यार्थ्यांसाठी वह्या, पुस्तके, व इतर शैक्षणिक साहित्य देण्याचे आवाहन करणार आहेत. जेणेकरून त्या विद्यार्थ्यांला आपले शिक्षण पूर्ण करून तो समाजमनात ताठ मानेने उभा राहील असेही राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी नमूद केले.

शपथविधी समारोहानंतर नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष हे आपले मनोगत व त्यांच्या आगामी योजना व आपल्या कार्याची रूपरेषा जाहीर करतील. मुख्य अतिथींच्या समाजप्रबोधनानंतर राजकिशोर मोदी हे महासभेच्या दहाव्या महाधिवेशनास उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार व्यक्त करून महाधिवेशन संपन्न झाल्याची घोषणा करतील. भोजन अवकाशानंतर दुपारी दोन ते सहा या दरम्यान समाजाच्या युवक व युवतींचे परिचय संमेलन होऊन या कार्यक्रमाची सांगता होईल. या संपूर्ण महाधिवेशनाची जय्यत अशी तयारी मोदी लर्निंग सेंटरच्या निसर्गरम्य वातावरणात संयोजक राजकिशोर मोदी तथा त्यांच्या संपूर्ण सहकार्यांच्या वतीने अतिशय काटेकोर व नियोजन बद्धतेने केल्या जात आहे. हे महा अधिवेशन व्यवस्थित संपन्न होण्यासाठी विविध समित्या गठीत केल्या असून या समित्या देखील आपापली जबाबदारी अतिशय चोखपणे पार पाडत आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र प्रदेश जायसवाल संघटना, मराठवाडा जायसवाल समाज संघटना व अंबाजोगाई जायसवाल समाज संघटना हे महाअधिवेशन सुरळीतपणे संपन्न होण्यासाठी मेहनत घेत आहेत.

## डीग्री प्रमाणपत्र हरवले

नामे स्वप्निल गोरक्ष भोसले सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथील विद्यार्थी असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची बी.कॉम. ची डिग्री खेर्डा खुर्द ते तालखेड दरम्यान हरवली आहे.डिग्री सापडल्या संपर्क साधावा
संपर्क
७७७६८२२५८६

# गावठी पिस्टल बाळगणाऱ्या श्रीकांत भोसले यास अंबाजोगाई पोलिसांनी ठोकल्या बेडया

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ जानेवारी**

अंबाजोगाई शहरात गावठी पिस्टल बाळगणाऱ्या श्रीकांत भोसले यास अंबाजोगाई पोलिसांनी आज बेड्या ठोकल्या असून शहरात आणखी काही जणांकडे गावठी पिस्टल असल्याने याचा शोध पोलिसांनी घ्यायला हवा.

संतोष देशमुख हत्ये नंतर बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले होते. जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा संभाळल्यापासुन कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्या साठी शर्तीचे प्रयत्न चालविले आसून अंबाजोगाई सह जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा एक्शन मोड वर आली आहे. बीड जिल्हयातील गुंडगीरीचे व गुन्हेगारीचे समुळ उच्चटन करण्याच्या उदात्त दृष्टीकोण डोळयासमोर ठेवून भविष्यात अवैद्य शस्त्र, वाळुचा चोरटा व्यापार करणारे तसेच जिवन आवश्यक वस्तुचा काळा बाजार करणारे व्यक्ती व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहादर, धोकादायक गुंडावर जास्तीत जास्त चझऊ-, मोक्का, हद्यपार, कायद्याअंतर्गत कठोर कार्यवाही करण्यात येईल असा इशारा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी दिलेला आहे.

पोलीस अधिक्षक श्री नवनीत काँवत, श्रीमती चेतना तिडके अप्पर पोलीस अधिक्षक अंबाजोगाई, श्री अनिल चोरमले उप विभागीय पोलीस अधिकारी उपविभाग अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री विनोद घोळवे पोलीस निरीक्षक अंबाजोगाई शहर यांनी निरीक्षक अंबाजोगाई शहर यांनी अंबाजोगाईतील कायदा व सुव्यवस्था आबाधित राहवी या करीता शर्तीचे प्रयत्न चालविले असून दिनांक ०४/०१/२०२४ गोपनिय बातमीदार मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे पाण्याची टाकी लातुर पॉईट येथे एक इसम गावठी पिस्टल कमरेला लावुन फिरत आहे अशी माहीती मिळाल्यावरुन पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहरचे पथक या ठिकाणी जाऊन अचानक छापा मारला असता हा इसम पळून जात असल्याने त्याचा पाठलाग करून पकडला.



पकडलेल्या इसमास त्यांचे नाव गाव विचारता त्याने त्यांचे नाव श्रीकांत ऊर्फ बबलु पांडूरंग भोसले वय ४१ वर्षे रा. यशवंतराव चव्हाण चौक अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड असे सांगितले. त्यांचे ताब्यात गावठी बनावटीचे सिल्वर कलरचे पिस्टल एकुण ४०,०००/- रुपयाचा माल मिळुन आलेला आहे. त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर येथे गुन्हा क्रमांक ०९/२०२५ कलम ३/२५ आर्म क्ट प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदरची कामगिरी ही, पोलीस निरीक्षक व्हि.यु. घोळवे, सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे, पोह/१४७९ आवले, पोह/१४८५ वडकर, पोअं/२०२० नागरगोजे, पोअं/१७० काळे यांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माजी आमदार घाटे , गोजेगावकर , माधव पावडेसह अनेकांचा राष्ट्रवादीत प्रवेश

## आ. चिखलीकर यांच्या पुढाकारातून मुंबईत रंगला पक्षप्रवेश सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ जानेवारी**

माजी आमदार अविनाश घाटे , माजी सभापती तथा भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर , उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख माधव पावडे यांच्यासह अनेकांनी आज आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकारातून मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.



आ. प्रतापराव पाटील चिखलीकर ज्या पक्षात काम करतात त्या पक्षाचे काम निष्ठेने आणि तो पक्ष वाढवण्यासाठी प्रामाणिकपणे काम करतात याची असंख्य उदाहरणे मराठवाड्याच्या राजकारणाने पाहिलेले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून लोहा -कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून निवडून आल्यानंतर प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पक्ष वाढीसाठी ही विशेष लक्ष दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा विस्तार करत शेवटच्या घटकापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसची ध्येय धोरणे पुरवण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत . याच अनुषंगाने पक्षाला बळकटी देण्यासाठी आ. चिखलीकर यांच्या पुढाकारातून माजी आमदार अविनाश भाटे , भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हा अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख माधव पावडे , जिल्हा संघटक नेताजीराव भोसले , महानगरप्रमुख पप्पू जाधव , तालुका प्रमुख गणेश शिंदे , युवा सेना जिल्हाप्रमुख बालाजी शिंदे, युवती सेना जिल्हाप्रमुख रोहिणी कुलकर्णी , जिल्हा परिषदेचे माजी सदस्य साहेबराव धनगे , युवा सेना जिल्हा उपप्रमुख संतोष पावडे , दर्यापूरचे सरपंच विलासराव सूर्यवंशी , युवा सेना शहरप्रमुख अभिजीत भालके , ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष योगेश शिंदे यांच्यासह अनेकांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित दादा पवार आणि आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी स्वागत करून आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सत्कार सोहळे टाळून राजेश पवार यांचा विकासात्मक कामाचा कृती आराखडा तयार!

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. ०७ जानेवारी**

नायगाव विधानसभा २०२२च्या निवडणुका संपन्न होऊन जवळपास दीड महिन्याचा कार्यकाळ संपत आहे. नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी, राज्यातील मंत्रिमंडळ, खाते वाटप, त्यातच आलेले हिवाळी अधिवेशन या दीड महिन्यांच्या सोपस्कारानंतर आमदार राजेश पवार पुन्हा आपल्या मतदार संघात सत्कार समारंभ टाळत मूलभूत विकास कामे घेऊन सक्रिय होत आहेत. त्यासाठी त्यांनी तब्बल १०० दिवसांचा मूलभूत विकासाचा आपल्या मतदारसंघासाठी कृती आराखडा तयार केला आहे.



सन २०१९च्या निवडणुकीच्या विजयानंतरही त्यांनी आपल्या सत्कार समारंभा संदर्भात आवाहन करीत त्यामध्ये जास्तीचा वेळ जातो तेव्हा ते सत्कार समारंभ टाळा असे सांगितले व विकास कामावरच भर दिला तोच पायंडा पुढे राखत त्यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या २०२४च्या विधानसभा निवडणुकीत विक्रमी विजय मिळवल्यानंतरही सत्कार समारंभास टाळत त्यांच्या मूलभूत विकासाकडेच लक्ष केंद्रित केले असून २०१९ च्या विजयानंतर कोरोना ह्या वैश्विक महामारीच्या पार्श्वभूमीवर आमदारकीची फक्त अडीच वर्ष काम करण्यास मिळाली त्यामध्ये आमदार राजेश पवार यांनी आपल्या मतदारसंघात रस्त्यावर अधिक भर दिला होता. गेल्या पन्नास वर्षात मतदार संघाचा विकास झालाच नव्हता विकास कसा असावा याचे उदाहरण आमदार राजेश पवार यांनी दिले असले तरी बरेच विकास कामे राहून गेली आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कामाचा जसा शंभर दिवसाचा कार्यक्रम बनवला त्याचप्रमाणे आपल्या नायगाव मतदार संघातील मूलभूत सुविधांसाठी ज्या मध्ये प्रामुख्याने पिण्याचे पाणी, पानंद रस्ते, स्मशानभूमी, घरकुल योजना, महावितरण कंपनीच्या सुरळीत विद्युत पुरवठ्यासह इतर अनेक समस्या याबाबत त्यांनी आपला कृती आराखडा हा शंभर दिवसांचा बनवला असून जी कामे आतापर्यंत ठप्प राहिली आहे ती कालबद्ध पद्धतीने पूर्णत्वास नेण्याचा मानस त्यांनी दैनिक तरूण भारत प्रतिनिधी जवळ बोलून दाखवला. यासाठी गेल्या तीन दिवसापासून संबंधित सर्वच विभागांच्या प्रमुखांची प्रशासकीय बैठकीचा धडाकाच त्यांनी लावला व आपल्या मतदारसंघातील उपरोक्त पार्श्वभूमीवरच्या सर्व समस्या समजून त्यावर शीघ्र गतीने उपाययोजना कशा करता येईल या संदर्भात मार्गदर्शन घेतले व केले.

निवडणूक विजयानंतर आमदार राजेश पवार पहिल्यांदाच दैनिक तरूण भारत पुढे प्रदीर्घकाळ बोलताना म्हणाले की माझा विजय सर्वसामान्य मतदार व कार्यकर्त्यांच्या विश्वासाचे प्रतीक आहे, त्यामुळे सत्कार सोहळ्यासाठी मतदार संघातील प्रत्येक गावातून मला फोन येत आहेत, माझ्यासाठी ती आनंदाची बाब असली तरी त्याची जाण मला आहे त्यांचे हे सत्कार सोहळे माझ्यासाठी कौतुकांची थाप असून त्यांना मी कधीच विसरू शकत नाही त्यांचे कामे मार्गी लावणे हे माझं मी आद्य कर्तव्य समजत असून शंभर दिवसांचा कृती आराखडा आटोपूनच मी प्रत्येक गावातील मतदार संघाचे आभार मानण्यासाठी भेट देणार आहे तेव्हाच त्यांचा प्रेमपूर्वक सत्कार मी स्वीकारेल त्या अगोदर त्यांची कामे मार्गी लावणे माझे कर्तव्य असून आज घडीला देशात योगायोगाने देशात व राज्यात भाजपा व मित्र मंडळ पक्षांची सरकार असल्यामुळे त्याचा पुरेपूर फायदा मतदार संघातील विकासासाठीच झाला पाहिजे असं माझं स्पष्ट मत आहे असे त्यांनी सांगितले.

आमदार राजेश पवार यांनी २०१४ पासूनच नायगाव विधानसभा मतदार संघात आपल्या कार्यकाळात भारतीय जनता पक्षाचे विचार खोलवर रुजवण्यामध्ये कमालीचे यश मिळवले असून त्या जोरावर विक्रमी मतदानाद्वारे नुकतेच विजय झाल्यावर सुद्धा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष सदस्य मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यास चालू केली असून उद्या दिनांक ८ जानेवारी रोजी ते तीनही तालुक्यातील बैठका घेऊन त्याबाबत आपल्या कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.

नायगाव मतदार संघातील जवळपास तीन लाख मतदार हे माझ्यासाठी सारखेच असून कोणत्या जातीचे किती मतदान पडले याचा मी आता विचारही करणार नाही,जातीपातीचे राजकारण न करता सर्वच जाती धर्माच्या सर्वांगीण विकासावरच आपण भर देणार असून सूडबुतीचे राजकारण कधीच करणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली. उपरोक्त पार्श्वभूमीवर त्यांनी मॅरेथॉन बैठका घेत जलसंपदा विभाग यामध्ये कोलंबी उपसा जलसिंचन योजना, अप्पर पैनगंगा योजना, बारूळ प्रकल्प, उमरी पट्टी भागात उपसा जलसन योजना कार्यवाहीत करणे, वीज वितरण कंपनीच्या बाबतीत सोलार फीडरच्या कामाचा प्रगतीचा आढावा, तद्वतच घरकुल योजना,आरोग्य, शिक्षण, जलजीवन मिशन,पानंद रस्ते व स्मशानभूमीसाठी तहसीलदार यांची भेट, पाणीपुरवठा व रोजगार हमी साठी पंचायत विभागाच्या भेटी, परिवहन विभागातील एस.टी. बसेसच्या सुरळीत व सुनिच्छतेचे बाबत सर्वच विभाग प्रमुखाच्या गेल्या तीन दिवसापासून ते बैठका घेत आहेत. व येणाऱ्या १०० दिवसा च्या अनेक टप्प्यात उपरोक्त सर्वच मूलभूत सुविधा आपल्या मतदार संघातील आपल्या मतदारांना मिळाव्यात यासाठी ते कालबद्ध प्रामाणिक प्रयत्न करण्यास सुरुवात केली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### जिम्नॅस्टिक राष्ट्रीय स्पर्धेत कृतिकाने रोप्य पदक पटकावले

**नवीन नांदेड**-जिम्नॅस्टिक फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील जिम्नॅस्टिक स्पर्धा २०२४-२५ यांचे वतीने सर्व वयोगटातील वेगवेगळ्या प्रकारातील ओपण जिम्नॅस्टिक मेला दि.२४ डिसेंबर ४ ते ४ जानेवारी २०२५ रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय स्टेडियम सुरत गुजरात या ठिकाणी पार पडल्या .या राष्ट्रीय जिम्नॅस्टिक स्पर्धेतील जूनियर टंबलिंग या प्रकारात कु. कृतिका रंजीत नरवाडे या मुलीने रोप्य पदक पटकावले आहे.



या यशाबद्दल नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिनांक ६ जानेवारी रोजी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छ दिल्या. राष्ट्रीय स्पर्धामध्ये नांदेडची जिम्नास्टिक खेळाडू कृतिका रंजित नरवाडे हिने जुनियर टम्बलिंग या खेळ प्रकारात वैयक्तिक सिल्वर मेडल प्राप्त करून आपला राष्ट्रीय स्पर्धे मध्ये दबदबा कायम ठेवला आहे. हे तिचे सलग दुसरे मेडल आहे या अगोदर केरळ मध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले होते. तसेच या स्पर्धे मध्ये नांदेड ची सब जुनियर गटात वैष्णवी थोरात हिने सुद्धा सहभाग घेऊन आपले कौशल्य पणाला लावले आहे. सदर खेळाडू ला महाराष्ट्र हौशी जिम्नास्टिक संघटनाचे पदाधिकारी शेटे, मकरंद जोशी यांचे सह नांदेड जिल्हा हौशी जिम्नास्टिक संघटनाचे पदाधिकारी तसेच किरण स्पोर्ट असो.चे मार्गदर्शक लक्ष्मण फुलारी, रोहन गायकवाड, सचिन, अमोल,पूजा मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

### वाचन संकल्प महाराष्ट्राचा

**मुक्रमाबाद**-येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत सामूहिक वाचन घेण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. जी. इनामदार हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. डॉ. मा. म. गायकवाड (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) यांनी केले तर आभार ग्रंथपाल डॉ. व्ही. बी. पवार यांनी मानले. या वेळी मंचावर प्राचार्य मुकुंदराज जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक तथा मुख्य लिपिक संतोष पाटील, डॉ. के. वाय. पवित्रे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात ग्रंथ प्रदर्शननाचे उद्घाटन प्राचार्य इनामदार यांच्या हस्ते करण्यात आले. उपक्रमात सहभाग घेऊन एन. एस. एस. चे विद्यार्थी व सेवक बालाजी सादगिरे यांनी परिश्रम घेतले.

### पत्रकार प्रशांत गवळे पुरस्काराने सन्मानित



**नांदेड**-मीमांसा फाऊंडेशन, दै. समीक्षा, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, पत्रकार प्रेस परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा अत्यंत महत्वाचा असलेला वृत्तपत्र क्षेत्रातील जाहिरातीचा आधारस्तंभ हा पुरस्कार दै. लोकपत्रचे उपसंपादक प्रशांत गवळे यांना मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करून देण्यात आला. नांदेड शहरातील शासकीय विश्रामगृह दि. ५ जानेवारी रोजी दर्पण दिनाच्या पुर्वसंध्येला पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. हा पुरस्कार दै. लोकपत्रचे उपसंपादक प्रशांत गवळे विधान परिषदेचे सभागृहनेते तथा आमदार हेमंत पाटील, खा. प्रा. रविंद्र चव्हाण, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बाबुराव पाटील कोहळीकर, हिंदुस्थान टाईमचे सुरेंद्र गंगण, मॅक्स महाराष्ट्राचे मनोज भोयर, नांदेड जिल्हा माहिती अधिकारी प्रविण टाके, दै. समीक्षाचे संपादक तथा आयोजक रूपेश पाडमुख यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन पुरस्कार सन्मानीत करण्यात आला.

# हिमायतनगरात भाजपच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. ०७ जानेवारी**

हिमायतनगर शहरामध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने सदस्या नोंदणी अभियानाला सुरुवात झाली असून त्या अनुषंगाने हिमायतनगर शहरात दिनांक ७ जानेवारी रोजी परमेश्वर मंदिर प्रांगणात सकाळी १० वाजता सदस्य नोंदणी अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाजपाचे प्रदेश प्रतिनिधी शिवराज पाटील कवेकर तसेच युवराज पाटील चाकूरकर हेही उपस्थित होते.



भारतीय जनता पक्षाच्या वतीने पूर्ण राज्यभर नवीन सदस्य नोंदणी अभियान चालू असून हिमायतनगर शहरांमध्ये कार्यकर्त्यांनी आपल्या घरापासून सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात केली असून हे अभियान अधिक व्यापक करून जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करण्याचा एक विक्रम हाती घेतला आहे.

यावेळी गजानन तुप्तेवार, आशिष सकवान, रामभाऊ सुर्यवंशी, स्वप्निल करके ,परमेश्वर सूर्यवंशी, अमोल पळसपुरकर वामन मिराशे, अभिलाष जयस्वाल ,दुर्गेश, गजानन, अजय जाधव, नितीन मुधोळकर, रामु पाकलवाड यासह या अभियानात अनेक उपस्थित होते.



किनवट-गेल्या तीन दशकापेक्षा जास्त काळापासून भक्तिभावाने किनवट शहरात चालु असलेलेअय्यपा दिक्षा यंदाही उत्साहात साजरा करण्यात आले. यंदा तीनशे पेक्षा जास्त लोकांनी अय्यपा स्वामी ची दिक्षा घेतली होती.

## सिंदखेड पोलीस ठाण्याच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि.०७ जानेवारी**

पत्रकार दिनानिमित्त माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलीस स्टेशनच्या वतीने पत्रकारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून पोलिस स्टेशनच्यावतीने सपोनि.आर.बि.जाधवर व पोऊनि. आर.एम.गिरी यांचे हस्ते शाल व लेखणी देऊन पत्रकारांचा सत्कार, सन्मान करण्यात आला.

# प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांनी घेतली दिवंगत प्रदीप नाईक कुटुंबीयांची सांत्वन भेट!

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.०७ जानेवारी**

राष्ट्रवादी काँग्रेस श.प. पक्ष माजी आमदार दिवंगत प्रदीप नाईक हे हयात असताना त्यांच्या सोबतच होता आणि आता त्यांच्या आकस्मिक दुःखद निधनानंतरही त्यांच्या कुटुंबासोबतसुद्धा कायमच राहील अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटिल यांनी दिली.येणाऱ्या काळात पक्षाचं नेतूत्व हे त्यांच्या पत्नी बेबीताई नाईक यांनी स्वीकारलं तर हा निर्णय पक्षासाठी निश्चितच जमेची बाजू ठरेल! असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.



आज सोमवार दिनांक ०६ जानेवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांचे सकाळी ११ वाजता माहूर येथील शासकीय विश्रामगृहावर आगमन झाले. यावेळी त्यांच्या समवेत जिल्हा अध्यक्ष आलेगावकर, सरचिटणीस जांभ्रूणकर हे उपस्थित होते. तदनंतर, दुपारी १२ वाजता ते माहूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या सोबत दहेली तांडा येथे पोहोचले. परीवाराचे सांत्वन करत त्यांची आस्थेवाईकपणे जयंत पाटील यांनी विचारपूस केली.यावेळी आयोजित शोकसभेला त्यांनी संबोधित करतांना दिवंगत प्रदीप नाईक यांच्या संपूर्ण परीवारासोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष खंबीरपणे उभा असल्याची ग्वाही दिली.परीवारातील सदस्यांसह जमलेल्या नागरिकांना व कार्यकर्त्यांना या अतिव दुःखातून सावरण्यासाठी धैर्याने सामोरे जाण्याचे विनंतीवजा आवाहन केले. यावेळी किनवट,माहूर तालुक्यातील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व दिवंगत प्रदीप नाईक व त्यांच्या कुटुंबावर प्रेम आणि विश्वास करणारी माणसे मोठ्या संख्येने उपस्थित होते..दुपारी ०१ वाजता दिवंगत प्रदीप नाईक यांच्या कुटुंबीयांची सांत्वन भेट घेवून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांनी माहूर मार्गे नांदेड करिता प्रयाण केले.

## संस्कृती डिजिटल इंग्लिश स्कूलच्या वतीने पत्रकारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०७ जानेवारी**

शहरातील संस्कृती डिजिटल इंग्लिश स्कूल येथे पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

यावेळी देगलूर पंचायत समितीचे चे गटशिक्षणाधिकारी कृष्णा तोटावर व देगलूर शहरातील वरिष्ठ पत्रकार यांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या छायाचित्रा समोर दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यावेळी देगलूर शहरातील व तालुक्यातील अनेक पत्रकार बांधव तसेच संपादक व विविध पत्रकार संघटनाचे अध्यक्ष,उपाध्यक्ष तसेच सर्व पदाधिकारी यांचा पत्रकार दिनानिमित्त संस्कृती डिजिटल इंग्लिश स्कूलचे संस्थापक बोडके यांच्या हस्ते पत्रकार बांधवांचा पुस्तक,शाल, पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

# फुलवळ पत्रकार संघाकडून पत्रकारितेच्या जनकाला अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**फुलवळ,दि. ०७ जानेवारी**

मराठी पत्रकारितेचे जनक म्हणून ओळखले जाणारे दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा ६ जानेवारी हा जन्मदिवस सर्वत्र पत्रकार दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्याच प्रमाणे कंधार तालुक्यातील फुलवळ मराठी पत्रकार संघानेही तो आज मोठ्या उत्साहात साजरा करून पत्रकारितेच्या जनकाला नम्रपूर्वक अभिवादन केले. या आयोजित सोहळ्यात प्रथमतः दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी भाषणं झाली . तसेच फुलवळ पत्रकार संघाकडून एकजुटीचा सामुदायिक संकल्प करत निर्भीड पत्रकारिता करतांना लेखणीच्या माध्यमातून वंचितांना न्याय मिळवून देत गाव व समाज विकासासाठी सकारात्मक बातम्या छापून लेखणीची धार कायम तेज ठेवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा संकल्प ही करण्यात आला .

यावेळी फुलवळ पत्रकार धोंडीबा बोरगावे , विश्वाम्भर बसवंते , परमेश्वर डांगे , होनाजी शेळगावे , चेअरमन दत्ता डांगे आदीसह अरुण वडजे , आनंदा पवार , परासराम पटणे , विठ्ठलराव तुप्पेकर , रंगनाथ पांचाळ , शिवानंद मंगनाळे , बालाजी देवकांबळे राजीव राठोड , रामू बोरगावे व ग्रामस्थांची प्रमुख उपस्थिती होती

# पी.एम.पी.एल. कंपनीचे हदगाव तालुक्यात रेल्वे मार्गाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०७ जानेवारी**

वर्धा- यवतमाळ- नांदेड रेल्वे मार्गाचे काम हदगाव तालुक्यात अत्यंत संथ गतीने व संबंधित कंपनीच्या मनात आल्याप्रमाणे आपण जे म्हणल ती पूर्व दिशा याप्रमाणे ही पी. एम. पी. एल. कंपनी काम करत असून याचा फटका मात्र शेतकरी बांधवांना गावातील नागरिक शालेय- विद्यार्थी विद्यार्थीनी यांना मोठ्या प्रमाणावर बसत असून यांच्या क्षमतेपेक्षा जास्त मुरूम वाहतूक करणाऱ्या वाहनांद्वारे उडणाऱ्या धुळीमुळे सुद्धा मोठा त्रास होत असल्याचे बोलले जात असून या मुजोर कंपनीकडे आमदार व खासदार यांनी त्वरित लक्ष देऊन यांच्या कामात पारदर्शकतापणा आणावी अशी मागणी या निमित्ताने होत आहे.



वर्धा- यवतमाळ - नांदेड ही बहु चर्चित व विदर्भ मराठवाड्याला जोडणारी एक अत्यंत महत्त्वपूर्ण रेल्वे प्रकल्पांपैकी एक असून सध्या हदगाव तालुक्यात या प्रकल्पाचे काम अत्यंत संथ गतीने चालू आहे. या कंपनीचे बामणी फाटा व इतर काही ठिकाणी प्लांट कार्यरत असून सुद्धा संबंधित कंपनीच्या हलगर्जीपणामुळे म्हणा किंवा काम चुकार कर्मचारी अथवा साधनसामग्रीची कमतरतेमुळे हदगाव तालुक्यात या रेल्वे मार्गाचे कामाचे अक्षरशा तीन तेरा वाजले असून संबंधित कंपनी वेळ मारून नेत असल्याची तक्रार मोठ्या प्रमाणावर नागरिकांमधून होत आहे. रेल्वे मार्गाचे ठिकाणी लागणाऱ्या मुरूम साठी कंपनीने तर अक्षरशः नियमांना पायदळी तुडवीत आपले हित जोपासले होते यांच्या ओव्हरलोड वाहतूक करणारे मुरुमाच्या वाहनांमुळे उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांना व शेतातील पिकांचा अतोनात नुकसान होत असून या मुजोर कंपनीच्या कारभाराविरोधात लोकप्रतिनिधींनी त्वरित लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. विकास म्हटला की थोडाफार त्रास सहन करावा लागत असते अशी काही नागरिकांची प्रतिक्रिया आहे पण या कंपनीचा कारभार सध्या लोकांना त्रास देण्यातच जात असल्याचे सुद्धा नागरिक आरोप करत आहेत.

# दिवंगत नाईक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शोकसभा ; आ. केराम यांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०७ जानेवारी**

किनवट/माहूर चे माजी आमदार दिवंगत प्रदीप नाईक यांच्या हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिकपणे झालेल्या दुःखद निधनानंतर संपूर्ण माहूर तालुका शोकमग्न अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे.अनेक ठिकाणी शोकसभेचे आयोजन करण्यात येत असून,आज मंगळवार दिनांक ०७ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, माहूर येथे दिवंगत प्रदीप नाईक यांच्या पावण स्मृतीप्रित्यर्थ त्यांना अभिवादन करण्यासाठी एका शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आदरांजली वाहण्याकरिता आमदार भिमराव केराम यांच्या समवेत माजी जि. प. व पं. सदस्य,कृ.ऊ.बा.समिती सभापती, संचालक मंडळ, सरपंच, नगरसेवक सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते,पत्रकार यांनी उपस्थिती दर्शवून दिवंगत प्रदीप नाईक यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण केली.यावेळी स्व.प्रदीप नाईक यांच्यावर प्रेम करणाऱ्या समर्थकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था
ता. माहूर यांचे कार्यालय, कपिलनगर, वर्गारोड, माहूर
(E-mail ID-aresmahurgmailcom)

जा.क. सहानि/कक्ष-३/निवडणुक/क-वर्ग/प्रा.मयाप्र./२०२५ दिनांक : ७/०१/२०२५

व्यवस्थापक समिती पंचवार्षीक निवडणूक कार्यक्रम सन २०२५-२०३०

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० सुधारणा २०१३ चे कलम ७३ फव ब त्याखालील नियम २०१४ चे नियम ६ ते १० मधील तरतुदीनुसार सहयाद्री मागासवर्गीय महिला सहकारी पतसंस्था, मर्या. माहूर संस्थेच्या प्रारुप मतदार याद्या दिनांक ०१/०१/२०२५ या अर्हता दिनांकावर तयार केलेल्या असून सहयाद्री मागासवर्गीय महिला सहकारी पतसंस्था, मर्या. माहूर संस्थेच्या प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

संस्थेचे नांव :- सहयाद्री मागासवर्गीय महिला सहकारी पतसंस्था, मर्या. माहूर

| अ. क्र. | तपशील | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | ८.१.२०२५ | स.११.०० | सहाय्यकनिबंधक, सहकारी संस्था ता. माहुर व संबंधीत संस्थेच्या सुचना फलकावर |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती स्वीकारणे | ८.१.२०२५ ते १४.१.२०२५ | स.१०.०० ते सा.४.०० | सहाय्यकनिबंधक, सहकारी संस्था ता. माहुर |
| ३ | प्राप्त हरकतीवर सुनावणी | १५.१.२०२५ ते १६.१.२०२५ | दु.२ वाजता | सहाय्यकनिबंधक, सहकारी संस्था ता. माहुर |
| ४ | प्राप्त हरकतीवर निर्णय देणे | २०.१.२०२५ | सा.४.०० वाजता | सहाय्यकनिबंधक, सहकारी संस्था ता. माहुर |
| ५ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | २८.१.२०२५ | सा.४.०० वाजता | सहाय्यकनिबंधक, सहकारी संस्था ता. माहुर व संबंधीत संस्थेच्या सुचना फलकावर |

( योगेश बाकरे)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी
तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता.माहूर

# दर्जेदार आरोग्यविषयक सुविधा पुरवण्यावर भर द्या- जिल्हाधिकारी

## जिल्हाधिकारी कार्यालयात आरोग्य यंत्रणेचा घेतला आढावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

जिल्ह्यातील प्रत्येक रुग्णाला तातडीची आणि दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यावर ज्लिहा आरोग्य यंत्रणेने भर देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी संबंधित यंत्रणेच्या प्रमुखांना आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी नुकताच जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा आरोग्य यंत्रणेचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस, शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सुनील देशमुख, प्रभारी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. गोपाल कदम यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

रुग्णांना दर्जेदार सुविधा मिळण्यासाठी वैद्यकिय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहणे आवश्यक आहे. आरोग्य संस्थेत नियुक्त वैद्यकिय अधिकारी २४ तास कर्तव्यावर असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना कायाकल्प उपक्रमात सहभागी करून घेण्याचे निर्देश दिले.

जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य यंत्रणा अधिक दर्जेदार, आणि उत्तम आरोग्यविषयक सोयीसुविधा, वेळेत औषधोपचार मिळा- वेत. रुग्णांसाठी अत्यावश्यक आरोग्य साहित्य ठेवावे, तसेच स्वच्छता व इतर निकष पूर्ण करून सर्व आरोग्य केंद्रांना पारितोषिक मिळेल, याकडे लक्ष देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी दिल्या.

एनकॉसमध्ये निवडलेल्या संस्थाचाही आढावा घेण्यात आला. जिल्ह्यामध्ये संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढले पाहिजे. महिलांची हेळसांड होणार नाही याकडे स्थानिक डॉक्टर व कर्मचारी यांनी लक्ष द्यावे, अशा सूचना दिल्या. माता बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत गरोदर माता व बालक यांची आरसीएच पोर्टलवर १०० टक्के नोंदणी करणे, जोखमीच्या गरोदर माता यांचा पाठपुरावा करून आवश्यक सेवा सुविधा देणे, तीव्र रक्तक्षय असलेल्या गरोदर मातांचे अपडेशन करणे, त्याचबरोबर सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील शस्त्रक्रिया गृह चालू करून घ्यावे व पुढील दोन महिन्यात कुटूंब कल्याणचे काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. एनसीडीअंतर्गत उच्च रक्तदाब व मधुमेह रुग्णांची पोर्टलवर नोंदणी करून त्यांची १०० टक्के तपासणी करून निदान झालेल्या रुग्णांना उपचाराखाली आणावे. क्षयरोग मुक्त टी कार्यक्रमांतर्गत रुग्णांची तात्काळ तपासणी करून नियमित लसीकरणातील गळती कमी करण्यावर भर देण्याच्या सूचना दिल्या. तसेच आरसीएच पोर्टलवर रियल टाईम डाटा १०० टक्के अद्यावत करावा. माता मृत्यू नोंदणी अद्यावत करून मृत्यूची कारणे शोधणे, माता मृत्यूदर, बाल मृत्यूदर कमी करणे, यासह रुग्णांच्या आरोग्याच्या विविध तपासणी करण्यावर भर देण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले.

रुग्णांची आभा कार्ड काढण्याची संख्या वाढवावी. बालस्वास्थ कार्यक्रमात सर्व बालकांची आरोग्य तपासणी करून आवश्यक त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाल्या पाहिजेत. ग्रामीण भागातून आलेल्या नेत्ररुग्णांवर ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व शासकिय रुग्णालयात शस्त्रक्रिया व्हाव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

आरोग्य यंत्रणेने चांगले काम करून रुग्णांना आरोग्य सेवा दिल्यास जिल्ह्यातील आरोग्य संस्थाच्या बळकटीकरणासाठी जिल्हा नियोजनमधून जास्तीत जास्त निधी देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

या बैठकीला सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग फोपसे, डॉ. मंगेश टेहरे,डॉ. शैलेजा कुपास्वामी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री शंकर तावडे, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्रीपाद गारुडी, डॉ. सुवर्णा महाले, डॉ. प्रकाश जाधव यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# पालिकेच्या पथकांकडून मांजा विक्री दुकानाची तपासणी

## नायलॉन मांजाच्या विक्रीवर निर्बंध



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

नायलॉन मांजामुळे होणारे धोके टाळण्यासाठी नगर पालिकेचय पथकांनी मंगळवारी शहरातील मांजा व पतंग विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी केली. यावेळी नायलॉन मांजा विक्री तसेच साठवणूक केल्यास कायदेशीर कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या कर्मचारी मार्फत वेळोवेळी नागरिकांमध्ये प्लास्टिक बंदी जनजागृती करण्यात येत आहे. प्लास्टिक/सिंथेटिक पासून बनविलेल्या नायलॉन मांज्याचा वापर व विक्रीमुळे पक्षी तसेच मानवी जीवितास गंभीर धोका निर्माण होतो. पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत अशा प्रकारच्या मांज्याच्या विक्री व वापरावर प्रतिबंध लागू करण्यात आलेला आहे. त्या करिता नगर परिषदेच्यावतीने कोणीही अशा धोकादायक व जीवास हानी होणाऱ्या मंज्याचा वापर करणे टाळावा करिता जनजागृती देखील करण्यात येत आहे. नगर परिषद पथकाने हिंगोलीतील मांजा विक्री दुकानांवर तपासणी करून त्यांना नोटीस बजावली. नायलॉन मांज्याचा साठा किंवा विक्री आढळल्यास तो तातडीने जप्त केला जाईल तसेच उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सर्व नागरिक व विक्रेत्यांना पर्यावरण संरक्षणासाठी सहकार्य करण्याचे आवाहन नगर परिषद मार्फत देण्यात आले. यावेळी नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, शाम माळवटकर, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, लेखा- पाल अनिकेत नाईक, किशोर काकडे, देवीसिंग ठाकूर, पंडित मस्के, विजय रामेश्वरे, संघपाल, पवीन चव्हाण, बाबुराव काळे, दिनेश वर्मा, नरवाडे शेख साजिद, संदीप गायकवाड, गजानन जगताप, आकाश गायकवाड, रवी जोंधळे, चेतन भूजवने, कुणाल कांबळे, नगर परिषद अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# नांदुरा देवी येथील जलजीवन मिशन कामाची चौकशी करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**



तालुक्यातील नांदुरा येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत होत असलेल्या गैरकारभारामुळे येथील गावकऱ्यांना पाणीपूरवठा होत नसल्याने मंगळवारी गावांतील महिला, पुरूषांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करीत जिल्हाधिकारी यांना या कामाची चौकशी करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

नांदुरा येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत काम सुरू आहे. जलजीवन मिशन सिंचन विहीरीची रजिस्ट्री गट नं ५१ ची करण्यात आली मात्र शेतकरी व कंत्राटदार यांनी संगनमत करून गट नं ५२ मध्ये सदर सिंचन विहीरीचे खोदकाम केले. गट नं ५२ मधील विहीरीमध्ये शेतकरी मालक हे मोटार टाकून पाणी शेतीला देत आहेत. त्यामुळे विहीरीत पाणीसाठा शिल्लक राहत नसल्याने गावाला पाणी चार दिवसापासून गावाला पाणीपुरवठा बंद आहे. विशेष म्हणजे शेतकरी व कंत्राटदार यांनी ग्रामपंचायत नांदुरादेवी या नावाने खरेदीखत करण्याऐवजी कडती ग्रामपंचायत नावाने खरेदी खत केले आहे. या प्रकरणाची तत्काळ दखल घेत सखोल चौकशी करून गावाला जलजीवन मिशनयोजनेतून पाणीपूरवठा करावा अशी मागणी केली ग्रामीण पाणी पुरवठाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडे केली होती परंतु अद्याप कोणतीच कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदन सादर केले आहे. निवेदनावर सुरेश तनपुरे, ओमकार तनपुरे, विश्वनाथ पोहकर, रामप्रसाद कोल्हे, विशाल पडोळे, संतोष गिरी, संदीप तनपुरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी मोठ्या संख्येने महिलाही उपस्थित होत्या.



**हिंगोली- येथील अकोला बायपास येथे स्व अनुप लुंगे यांच्या स्मरणार्थ भव्य रेड्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी दोन रेड्यामध्ये चित्तथरारक लढत पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक जमा झाले होते. यावेळी हनुमान व्यायाम शाळेचे वस्ताद पांडुरंग लुंगे, आ. संतोष बांगर, ॲड मनीष साकळे, माजी नगराध्यक्ष गणेश लुंगे आमेर आली आदींची उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### बहिर्जी विद्यालयात गांधी चित्र प्रदर्शनी

हिंगोली- येथील जिल्हा परिषद बहुविध प्रशालेत ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी तथा सर्वोदय विचारवंत गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त दि . ७ जानेवारी मंगळवारी महात्मा गांधी चित्र प्रदर्शनी पार पडली. सत्य, अहिंसा, अस्तेय या नैतिक मूल्यांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र सर्वोदय मंडळाच्या वतीने गांधी चित्र प्रदर्शनी पार पडली . यावेळी समर्पित सर्वोदय कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांची उपस्थिती होती. चित्र प्रदर्शनीस शिक्षक शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती . प्रारंभी ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी तथा सर्वोदय विचारवंत गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त प्रशालेच्या मुख्याध्यापिका विशाखा सोनवणे यांच्या हस्ते प्रतिमेस खादीचा सूत्रहार अर्पण करण्यात आला. यावेळी सुरेश वानखेडे, शिवलिंग साखरकर, अनिस शहा, विजय खिल्लारी, अशोक डोणे, मोहम्मद खुदुस, सुनिता झाडे, मंगला वाघमारे यांची उपस्थिती होती. महात्मा गांधीजींच्या जीवन कार्यावर आधारित चित्र प्रदर्शनीची माहिती समर्पित सर्वोदय कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांनी विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना दिली.

### श्री नंदवंशी अहीर गवळी समाजाचा छत्रपती संभाजी नगर येथे सामूहीक विवाह सोहळा



हिंगोली- श्री नंदवंशी अहीर गवळी समाजाच्यावतीने छत्रपती संभाजी नगर येथे दि ३० एप्रील २०२५ रोजी सामुहीक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सामुहीक विवाह सोहळ्याचे निमंत्रण देण्यासाठी अध्यक्ष सुंदरलाल बागवाले यांच्यासह पदाधिकारी हिंगोली येथील माजी नगरसेवक बिरजू यादव यांचे निवासस्थानी आले होते. या विवाह सोहळ्यास जास्तीत जास्त समाजबांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बिरजू यादव यांनी केले आहे. यावेळी माजी उपनगराध्यक्ष बिरजू यादव यांनी संभाजीनगर येथील पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला.

### १० लाखांची अवैध दारू पोलिसांकडून जप्त

हिंगोली- दारूबंदी कायद्यांतर्गत हिंगोली पोलिसांनी मंगळवारी १७ ठिकाणी अवैधदारू विक्रेत्यांवर छापे मारले. यावेळी पोलिसांनी तब्बल १० लाख ४ हजार ३०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

# शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपनीची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**



दिग्रसवाणी येथील दहा शेतकऱ्यांची सन २०१९ ते २०२४ या कालावधीत नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत निवड झाली होती. या शेतकऱ्यांना शेडचे काम गुजरात येथील एका कंपनीला देण्यात आले होते. परंतु यातील दहापैकी पाच शेडचे काम अपूर्ण ठेवण्यात आले आहे. एका शेडसाठी ४० लाख रूपये मंजूर करण्यात आले. महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे १२ते १८ लाख अनुदान देण्यात आलेले आहे मात्र संपूर्ण रक्कम उचलून घेत पाच शेडचे काम अपूर्ण ठेवण्यात आले आहेत. शेड उभारल्यानंतर महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे हप्ते भरण्यात येणार होते मात्र शेडच उभारले नाहीत. कंपनीकडे पाठपुरावा केला असता कंपनी उडवाउडवीची उत्तरे देत आहे. त्यामुळे सदरील कामांची चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याची मागणी मनसेचे जिल्हाध्यक्ष बंडू कुटे यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी शेतकरी उपस्थित होते.

# मानवतेसाठी स्मार्ट एअर प्युरिफायर प्रयोगाचा तालुक्यात प्रथम क्रमांक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

वसमत तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला माळवटा येथील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मानवतेसाठी स्मार्ट एअर प्युरिफायद प्रयोगाचा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक आला आहे.

वसमत येथे नुकतचे तालुकास्तरीय विज्ञान व शैक्षणिक साहीत्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेसह खाजगी शाळांनीही सहभाग नोंदवला होता. जिल्हा परिषद शाळा माळवटा येथील सातवीच्या विद्यार्थ्यांनी ऋतुजा कदम आणि अनुष्का नादरे या दोन मुलींनी मानवतेसाठी स्मार्ट एअर प्युरिफायर हा विज्ञान प्रयोग सादर केला. यावेळी निरीक्षकांनी केलेल्या निवडीमध्ये या प्रयोगाचा तालुकास्तरावर प्रथम क्रमांक आला आहे. विज्ञान शिक्षीका श्रीमती घाटोळे यांनी मार्गदर्शन केले.

# अमृत महोत्सवी संविधानाच्या रूपाने विकासाचा भ्रम- डॉ दिलीप चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**



राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊ व्याख्यानमाला ही २६ व्या वर्षात पदार्पण करत असताना सरकारने ७५ वर्ष हॉयजॉक केले असून विकासाचा भ्रम निर्माण संविधानाच्या रूपाने केला जात आहे. यामध्ये मराठवाड्याला सर्वकाही संघर्षानेच मिळाले असून अद्यापही टोकदार जातीय अस्मिती ही आपला नाश करत आहे. तसेच शेतीचा सकल उत्पन्नाचा वाटा आता केवळ पंधरा टक्यावर आला असला तरी ८५ टक्के लोक शेतीवर अवलंबुन आहेत. असे मत व्याख्याते प्रा.डॉ. दिलीप चव्हाण यांनी मत व्यक्त केले.

हिंगोली येथील शिवाजीराव सभागृहात स्मृतीशेष ॲड. ग्यानबाराव शिरसाट विचारमंच येथे ५ जानेवारी पासून जिजाऊ व्याख्यानमाला सुरु आहे. द्वितीयपुष्पाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीपराव चव्हाण हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य शिवाजी मुटकुळे, राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बि.डी. बांगर, भाजपा जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, युवा सेना जिल्हा प्रमुख रामभाऊ कदम, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवाजी ढोकर पाटील, बाबाराव शृंगारे आदींची उपस्थिती तर व्याख्यानमालेचे उद्घाटन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर.आर. मगर यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख व्याख्याते म्हणून भाषा वाङ्मय व संस्कृतीचे अभ्यासक स्वारातीचे संचालक प्रा.डॉ. दिलीप चव्हाण हे होते.

प्रमुख व्याख्याते प्रा. डॉ. दिलीप चव्हाण यांना अमृत महोत्सवी संविधान आणि आजचा भारत हा विषयी व्याख्यानाचा दिला होता. या प्रसंगी व्याख्याते प्रा.डॉ. दिलीप चव्हाण पुढे म्हणाले की, आपल्या देशात आजही कमालीचे दारिद्रय आहे. भारतातील पंतप्रधान शिधा वाटप ८२ टक्के लोकांना दिल्या जातो. त्यामुळे या देशातील १५ टक्के नागरिकांची स्थिती चांगली असली तरी १०० टक्क्यापैकी ४२ टक्के नवजात बालके कुपोषित असल्याचे या अमृत महोत्सवी वर्षात दिसून येते. मराठवाडा हा संतांची भुमी असूनही राजा जेवढा श्रीमंत तेवढी जनता कंगाल असल्याचे चव्हाण यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले. सन २००० सालीच वाजपेयी सरकारने संविधान पुनरावलोकन समितीच्या आयोगाची स्थापना केली. भारतीय संविधानाविषयी असंतोष वारंवार दिसून येत आहे. या अमृत महोत्सवी वर्षात असंविधानाचे कोणते कलम आहे याची १०० टक्के अंमलबजावणी झाली असून स्त्री-पुरुष समता, अस्पृश्यता, शिक्षण हे २०११ च्या जणगणनेनुसार अस्तित्वात आल्याचे दिसून येत नसल्याचेही सांगितले. भारतीय स्वातंत्र्याच्या २५ वर्षा नंतरचेही प्रश्न आजही कायम असून सध्या स्त्रीचे अस्तित्व, साक्षरता, मागासलेपणा यावर प्रकाश टाकला. या अमृत महोत्सवी वर्षात मराठवाड्याचे अमृत महोत्सवी वर्ष हे एकूण दुर्लक्षीत असल्याचे असून मराठवाड्याची सामाजिक स्थिती, जातीयवाद हा आजही असल्याचे दिसून येत आहे. तसेच मराठवाड्यातील उद्योग स्थिती व विकास स्थिती ही अत्यंत मागासले जिल्हे असल्याचेही परिस्थिती समोर आली आहे. भारतीय संविधान हे पुस्तक सर्वांनी वाचले पाहिजे. सध्या कायदा -सुव्यवस्था व सुरक्षिता वाटत नाही, अनेक मराठवाड्यातील जिल्हे हे जातीय द्वेषाने ग्रासले गेले असल्याचेही सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी काळे, प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष पंडित अवचार यांनी केले. तर आभार प्रदर्शन जिल्हा सचिव राजकुमार वायचाळ यांनी केले. या प्रसंगी मोठ्या संख्येने शिवप्रेमीची उपस्थित होती.